# महाभारत

## खंड १० : वनपर्व २

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड १०वा : वनपर्व खंड दुसरा

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# महाभारत


## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**



©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**प्रकाशन : १० नोव्हेंबर २०१८**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत तीस खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा

आहे. त्यात मूळ आदिपर्वाचे पांच खंड केले आहेत, त्यातील हा दहावा खंड आपण आता वाचणार अहात. वनपर्वातील दुसरा खंड आहे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहे म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.



ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

## – महाभारत वनपर्व खंड दुसरा –

वनपर्वातील ह्या दुसर्या खंडातील भाग – किराट पर्व, इंद्रलोकागमन पर्व, नलोपाख्यान पर्व,

## वनपर्व भाग अडतिसावा

## किराट पर्व सुरु

जनमेजय विचारतो, "अहो महर्षी, मला, निष्पाप अशा अर्जुनाने महादेवाकडून शस्त्र विद्या कशी प्राप्त केली तो सगळा इतिहास सविस्तरपणे ऐकावयाचा आहे, तरी तो आपण सांगण्याची कृपा करावी. मला सांगा, तो जिगरबाज योद्धा त्या एकांत असलेल्या अरण्यात कसा बेडरपणे शिरला. आपण वेदाचे जाणकार अहात मला सांगा, तेथे वस्ती करून असतांना धनंजयांने आणखीन काय केले? तेथे असलेले स्थानु जे देवतांचे प्रमुख होते अर्जुनावर कृपा कशी करतात"? मला हे सगळें तुमच्या तोंडून ऐकावयाचे आहे. तुम्ही सर्वज्ञ अहात, तुम्ही मनुष्य व देव ह्यांबद्दल सगळे जाणता. अहो ब्राह्मण, फार प्राचीन काळी ती लढाई झाली, ज्यात धनंजय व भव द्वंद्व करतात पण त्यात कोणीही हरत नाही ज्यावेळी भव अद्वितीय ठरले होते. असें सांगतात, जो त्या द्वंद्वाची कहाणी ऐकतो त्याच्या अंगावर शहारे उठते, इतकी ती लढाई जबरदस्त होती. त्या कथेच्या श्रवणांने सर्वांना आनंद मिळतो जरी ते ती ऐकतांना घाबरून थरथरतात. ती लढाई ऐकल्यानंतर कित्येक योद्धे स्वताच्या कमीपणाबद्दल शरमिंदे सुद्धा होतात. असें बरेच मी त्या बद्दल ऐकले आहे म्हणून ती कथा मला तुमच्या तोंडून ऐकावयाची आहे.

वैशंपायन बोलतात, अरे कुरुवंशाच्या सिंहा, मी ती सगळी प्राचीन काळी होऊन गेलेली कथा कांहीं न चुकवता जशी घडली तशी तुला सांगणार आहे. तरी ती तू नीट ऐक. प्रथम त्या निष्पाप योद्ध्याचे बद्दल सांगतो, ज्या प्रसंगी तो त्या महान त्रिनेत्र देवाला भेटतो. त्यावेळी अर्जुन महेंद्रला त्याच्या मानव रुपात पहात असतो. आता सुरुवाती पासून ऐक, युधिष्ठीराकडून प्रतिस्मृति मंत्र शिकून तो बलाढ्य योद्धा आपल्या ध्येयाने प्रेरीत असा शक्रला म्हणजे देवांच्या देवाला शोधण्यासाठी निघतो. तो त्याची दैवी धनुष्यबाण आणि सोन्याची मुठ असलेली तलवार असें शस्त्रयुक्त होऊन हिमालयाच्या दिशेंने प्रवास करू

लागतो. तो पांडव राजा जो इंद्राचा मुलगा आहे, स्वताचे मन शांत ठेवून आपले ध्येय सदैव ध्यानात ठेवून श्रद्धापूर्वक असा पायी चालत जात असतो. असें जात असतांना तो एका काटेरी वृक्ष असलेल्या भयंकर अशा जंगलात शिरतो. त्या जंगलातील वृक्षांना फुलं व फळं लागलेली होती. त्या वनात विविध प्रकारचे लहान मोठे पक्षी वावरत होते. त्याशिवाय इतर श्वापदंसुद्धा तेथे होती. अशा अरण्यात बरेच सिद्ध आणि चरण आपापली साधना करत होते. जसें अर्जुन त्या वनात शिरला तसें आकाशातून शंखू आणि ढोलकी ह्यांचा मोठा आवाज ऐकू येऊ लागला. त्याशिवाय फुलांचा पाऊस पडू लागला. आकाशात पसरलेल्या काळ्या ढगांमुळें सर्वत्र जऊळ (ढगांची सावली) पसरले होती. ते अरण्य एका अवाढव्य पहाडाच्या पायथ्याशी पसरलेले होते. अर्जुन मात्र झपाझप पावले टाकत त्याचा प्रवास करत होता. कांहीं काळानंतर तो हिमावताच्या चढावा पर्यंत पोहोचला. तेथे तो कांहीं काळ विश्रांति घेतो तेव्हां त्याचे तेज उजळून निघू लागले. तो पहातो कीं, तेथील झाडी विशेष अशा हिरवळीनी भरलेली होती. त्या झाडांवर चिव चिव करणारे असंख्य छोटे पक्षी वावरत होते. तेथे वहाणार्या नदीच्या मध्ये नीलमणीचे खडक पसरलेले होते आणि त्यावर त्या नदीचे पाणी आदळत फेसाळत असें वहात होते. त्या नयनरम्य प्रदेशांत अनेक राजहंस आणि करकोचे बागडत होते. त्यांचे ओरडणे ज्यात कोकीळांची गोड धून ऐकवयाला मिळत होती. त्याशिवाय मोर, लांडोर, बदकं असे बरेच तेथे स्वच्छंदपणे बाळगत होते. आपला योद्धा, धनंजय ते पाहून अतिशय आनंदीत झाला. तेथे तपस्या करण्यासाठी योग्य वातावरण आहे असें लक्षात आल्यावर तो तेथेच ध्यानासाठी बसला. तो वल्कलं आणि काळ्या हरणाच्या कातड्याचा अंगरखा घातलेला असा होता. तो तेथे गवतांवर पडलेली सुकी पानं खाऊन राहू लागला. नदीचे चवदार पाणी पिण्यासारखे होते. अशारितीने तो तेथे एक महिना रहातो. अधून मधून तेथे मिळणारी फळं तो चाखत होता. खाण्यात तो एक व्रत पाळत होता. त्याप्रमाणें, दर तीन दिवसांच्या अंतराने तो फलाहार करत होता. त्यानंतर दर सहा दिवसानंतर फलाहार करत होता आणि तिसरे म्हणजे पंधरा दिवसानंतर फलाहार करत होता. अशी व्रतस्थता त्याचे राखली होती. असे सहा महिने गेल्यावर तो केवळ हवेवर राहू लागला. त्या काळात एका पायावर उभे राहून कशाचाही आधार न घेता तो दिवसभर तसांच उभा रहात असें. असें तपश्चर्या पूर्वक तो साधना करत

होता. त्याच्या वाढलेल्या जटांचा रंग पिंगट झाला होता. त्याचे ते व्रत पाहून सगळे श्रेष्ठ ऋषी एकत्रितपणे पिनाकाच्या देवाला भेटण्यासाठी निघतात त्याच्यावतीने विनंती करण्यासाठी. तेथे जाऊन ते महर्षी शंकराला अर्जुनाच्या घोर तपस्येची कल्पना देतात. ते देवाला सांगतात, "अहो देवादिदेवो, हा पृथाचा पुत्र मोठ्या ताकदीने हिमालयाच्या पठारावर मोठी तपस्या करत बसला आहे. त्याच्या त्या उग्र तपस्येमुळें समस्त पृथ्वी गरम झाली आहे. आम्हाला माहित नाही कशासाठी तो ही घोर तपस्या करत आहे. परंतु त्याच्या अशा उग्र तपश्चर्येमुळें आम्हाला त्रास होत आहे तरी कांहीं करावे. त्याला तपश्चर्या करण्यापासून परावृत्त करावे". त्या महर्षींची अशी विनंती ऐकल्यावर तो उमापति त्यांना सांगतो, "ऋषी जनहो, तुम्हाला त्या फाल्गुनीच्या तपश्चर्येची काळजी करण्याचे कारण नाही. तुम्ही मजेत आपल्या जागी परत जा. मला त्या धनंजयाला काय पाहिजे ते माहीत आहे. त्याला स्वर्गाची अभिलाषा नाही. किंवा दीर्घायुष्य सुद्धा मांगत नाही, किंवा संमृद्धीसुद्धा त्याला नको, त्याला योग्य समई मी त्याची इच्छा पूर्ण करणार आहे. तेव्हां तुम्ही त्याच्या तपश्चर्येची चिंता करू नये. सत्यांवेषी असें ते महर्षी महादेवाचे ते उद्गार ऐकून संतुष्ट होतात व आपापल्या घरी निघून जातात.

अशारितीने वनपर्वातील किराट पर्वाचा अडतिसावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकोणचाळीसावा
## (किराट पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, ते सगळे ज्ञानी बैरागी त्यांच्या घरी गेल्यावर पिनाकाधारी महेंद्र जो सर्व पापांचा नाश करतो, किराटाचे रुप (शिकार करणारा भिल्ल) धारण करतो, त्यात तो सोनेरी चमकत असतो. साक्षात मेरु वाटावा असा तो त्या रुपात दिसत असतो. हातात एक सुंदर तिरकमटा व कांहीं बाण, ज्यांच्यातून सर्प व कांहींतून ज्वाळा येत आहेत, घेऊन तो जेथे अर्जुन तपश्चर्या करत होता तेथे हिमालयाच्या पठारावर येतो. त्याच्या बरोबर त्याची अर्धांगिनी उमा पार्वती किराट बाईच्या रुपात असते. त्यांच्या बरोबर आणखीन भरपूर छोटी मोठी पिशाच्च गमत्या करणारी सुद्धा काय होते ते पहाण्यासाठी जातात. महादेव अर्जुनाची कशी भंबेरी उडवतो ते त्या गमत्या भूतांना पहावयाचे असते. त्यातील कांहीं स्त्रीयांची पिशाच्चे भिल्लीणीच्या वेषात त्यांच्या सह निघतात. जसें ते येतात तेथील शांतता नाहीशी होते. पक्षांचा चिवचिवीट, नदीच्या पाण्याचा झरझराट सगळें थांबते. जणू स्मशान शातता पसरते. किराटाच्या वेषातील महादेव अर्जुनाच्या जवळ येतो. त्याला विलक्षण दृष्य दिसले, एक मुक नावांचा दानव रानडुक्कराच्या रुपांत धनंजयाला मारण्यासाठी आला होता. अर्जुन त्या दानवाला रानडुक्कराच्या रुपातील पहातो, तोंच तो त्याचे गांडीव काढून त्याच्यावर असंख्य विषारी बाण फेकतो व त्याला जायबंदी करतो. त्यानंतर त्या दानवाला बोलतो, "मी येथे तुला त्रास द्यावयास आलो नाही तरी तू कां मला मारण्यासाठी आला आहेस"? "मी तुला यमाकडे पाठवून देतो", असें बोलून अर्जुन आणखीन एक बाण फेकणार एवढ्यात किराटाच्या रुपातील महादेव तेथे येतात व अर्जुनाला बोलतात, "थांब, ह्या डुकराला मी प्रथम माझा बाण मारला आहे तेव्हां तो माझा आहे". तरी त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करत धनंजय एक लावलेला बाण मारून त्या डुकराला ठार मारतो. ते पाहून किराट त्याचा एक बाण जो विजेच्या चमचमाटासारखा त्या डुकराला मारतो. ते दोनही बाण एकाच वेळी त्या अवाढव्य शरीर असलेल्या रानडुक्कराच्या शरीरात एकाच ठिकामी घुसतात. त्यांचा खूप मोठा ध्वनी होतो. जणूकाय इंद्राचे वज्र कोसळावे. त्या मुक नांवाच्या दानवाच्या अंगात त्या बाणांमुळें असंख्य बाण घुसल्या प्रमाणे छेद

होतात. त्या मारामुळें तो दानव मृत्यू मुखी पडतो. मेल्याबरोबर त्याचे खरे रुप तेथे दिसू लागते तेव्हां अर्जुनाला समजते कीं तो एक राक्षस होता. जिश्नु त्याचे सोनेरी चमकणारे रुप पाहून चकित होतो. तेथे तो किराट त्याच्या असंख्य महिला सोबत्यांबरोबर पुढे होतो. ते दृष्य पाहून अर्जुनाला गंमत वाटते व तो त्यांना विचारतो, "आपण कोण लोक अहात व इतक्या बाया घेऊन ह्या अशा अरण्यात काय करत अहात? आपण एवढे सोने अंगावर नेसून फिरताना आपल्याला भिती वाटत नाही? दुसरे असें किं, ह्याला मी प्रथम बाण मारला असतांना तू उगाचच तुझा बाण कां व्यर्थ घालवलास? हा राक्षस मला खाण्यासाठी आला होता हे उघड असतांना तू उगाचच आगावूगिरी कां केलीस"? "मी तुला सोडणार नाही तुला तुझ्या ह्या आगावूगिरीसाठी अद्दल घडलीच पाहिजे. म्हणून अरे गिरीजना मी आता तुला मारणार आहे, त्यासाठी तयार हो". असें बोलून अर्जुन त्याच्यावर बाण मारतो. त्या एका बाणातून असंख्य बाण निघतात व ते सगळे किराटाच्या अंगावर जातात. ते पाहून तो महादेव किराटाच्या रुपात तेथे उभा होता ते पाहून स्मित करतो. त्यापैकीं एकही बाण त्याला लागत नाही. नंतर बोलतो, "तू माझी फिकीर करू नकोस. हे अरण्य माझे वस्तीस्थान आहे. आम्ही नेहमी अशा जंगलातच रहातो. आता तू येथे आमच्या जागी कां आला आहेस ते सांग. अशा त्रासदायक ठिकाणी जेथे साधारण गोष्टी ज्या तुझ्यासारख्या क्षत्रियांला नेहमी हव्या असतात त्या मिळण्याची शक्यता नसते, सांग तुझा उद्देश काय आहे? तू दिसायला राजबिंडा आहेस, तू अशा ठिकाणी कोणती तपश्चर्या करण्याचा प्रयास करत आहेस? आम्ही बैरागी नेहमी अशाच वनात रहातो पण तुझे तसे दिसत नाही तरी खरे कारण सांग. तू इतका नाजूक अंगकाठीचा आहेस, आयुष्याची मौज करण्याचे सोडून हे काय आरंभले आहेस"? त्याला उत्तर न देता अर्जुन गांडीवाकडे पहात बोलतो, "मी ह्या जंगलात दुसरा पावक (अग्नी) आहे. तू आत्ताच पाहिलेस मी ह्या प्रचंड आकाराच्या राक्षसाला कसे ठार मारले आहे". ते ऐकल्यावर किराट त्याला गम्मत करावा अशा प्रकारे बोलतो, "ह्या राक्षसाला मी पहिला बाण मारला त्यामुळें तो मेला आहे, तुझ्या बाणामुळें नाही! मी त्याला मारले आहे, तुझे फालतु बाण नंतर त्याला लागले हे लक्षात घे. तुला खोटा अभिमान वाटतोय तुझ्या तिरंदाजीचा ते थांबव. अरे नीचा, खोटे बोलू नकोस, नाहीतर मी तुला मारून टाकीन, जर शक्य असेल तर माझ्या बरोबर द्वंद्व करून दाखव".

ते किराटाचे आव्हान ऐकल्यामुळें अर्जुन चिडतो. आणि त्याच्या गांडीवातून झराझर विषारी बाण किराटाच्या दिशेंने मारण्यास सुरुवात करतो. किराट ते पहात गमतीने हसत रहातो, त्यामुळें जिश्नुला आणखीन राग येतो व जोराने बाणांचा वर्षाव करू लागतो. ते सगळे बाण नेम चुकावा असें आजूबाजूला जाऊन पडत असतात. त्यामुळें अर्जुन जास्तच संतापतो कारण त्याचा नेम चुकतो हे मानायला तो तयारच नसतो. किराट मात्र त्याचे शरसंधान गमतीने पहात असतो. आपल्या बाणांची ह्याच्यावर कांहींच परिणाम होत नाही ह्याचे धनंजयाला आश्चर्य वाटते. एकही बाण किराटाला लागत नाहीं हे कसे शक्य आहे असे विचार त्याच्या मनात येऊ लागतात. त्याला क्षणिक त्याचे कौतुक वाटते कीं, तो वनवासी फार चतुर आहे, पण नंतर त्याला लक्षात येत असें चातुर्य केवळ अशक्य आहे, मग हा आहेतरी कोण? आता त्याला शंका येते किं हा कोणी सामान्य किराट नाही व ह्या त्याच्या बरोबर असलेल्या बायकासुद्धा कोणी सामान्य नाहीत, मग तो इंद्र तर नाही? अशाप्रकारच्या विचारात तो गढून जातो. कां हा कोणी यक्ष कां असुर असेल कां? त्याला कांहींच कळत नाही. माझ्या बाणांना दाद न देण्याची क्षमता फक्त महादेवातच असू शकते. असा विचार करत तो निश्चय करतो कीं ह्याला यमाकडे पाठवलेच पाहिजे! असा विचार करत अर्जुन पुनः त्याचे विषारी बाण किराटाच्या दिशेने मारण्यास सुरुवात करतो. पुन्हा तो पहातो किं, त्या बाणांचा त्याच्यावर यत्कींचिही प्रभाव होत नाही. शेवटी त्याच्या भात्यातील सगळे बाण संपतात. त्याला आता मात्र भितीने प्रथमच ग्रासले. तो अग्नीदेवाची आठवण करू लागला. जेव्हां त्यांने खांडववनात अग्नीला मदत केली तेव्हां त्यांने दोन न संपणारे भाते दिले होते त्यांची आठवण येते. त्याच्या कडे ते नसतात. आता आपल्याकडील बाण संपले आहेत तेव्हां ह्या धनुष्यानेच ह्या किराटाला मारण्यास तो सुरवात करतो. त्या माराने अर्जुन किराटाशी लढू लागतो. त्याकडे पाहून तेथे जमलेल्या सगळ्या किराटाच्या बायका व इतर पिशाच्च अर्जुनाकडे पहात हसू लागतात. किराट ते धनुष्य त्याच्या कडून खेचून घेतो व दूर फेकून देतो. आता धनंजय त्याची तलवार काढतो व त्यांने किराटाला आव्हान देतो. त्याची खास बनवलेली ती तलवार जी दगडाला कापू शकते ती तो त्या किराटाच्या डोक्यावर जोरांने हाणतो. त्याने त्या किराटाला कांहीं होत नाही पण तलवार मुठीजवळ तुडून पडते. फाल्गुन हार मानणारा नव्हता, तो आजुबाजूचे

दगड फेकून मारू लागतो, जे हातात येईल ते तो मारू लागतो पण कशाचाच परिणाम त्याच्यावर होत नाही. विशेष म्हणजे तो किराट अजिबात उलटवार करत नव्हता. त्याचे नवल अर्जुनाला वाटत होते. एवढ्या लढाया त्यांने केल्या होत्या परंतु, हा अनुभव विरळा होता. सगळे संपल्यावर अर्जुनाने त्या किराटाला त्याच्या मुठीने गुद्दे मारावयास सुरुवात केली. ते पाहून त्या बायका आणखीन हंसू लागल्या जसें एकाद्या लहान मुलांने मोठ्या माणसाला गुद्दे मारावेत व तो मोठा माणूस गमतीने व कांहींशा कौतुकांने ते सहन करावे असा तो सगळा प्रकार होता. थोड्या वेळांनी किराटसुद्धा त्याला जोरांने गुद्दे मारू लागला. त्या फटक्याने अर्जुनाला इजा झाल्या व तो थकू लागला. त्या मुष्ठीयुद्धामुळें तेथे मोठे ध्वनी उत्पन्न होऊ लागले. प्राचीन काळी झालेल्या वृत्र आणि वसवाच्या मुष्ठीयुद्धाची आठवण ते पहाणार्या ऋषीमुनीना झाली. त्यानंतर अर्जुनाने किराटाला घट्ट मिठी मारली अशी किं, त्याचा श्वास बंद व्हावा, पण त्याचा कांहींच परिणाम दिसेना. त्या दबावामुळे त्यांच्या अंगातून कोळशातून निघावा असा धूर येऊ लागतो. त्यानंतर मात्र तो किराट रुपातील महादेव रागावून अर्जुनाला एक जोरदार फटका मारतो, त्यामुळें धनंजय बेहोष होऊन पडतो. महादेवाने दाबल्यामुळें त्याची सगळी गात्र चुराडा झाल्यासारखी होतात व अर्जुन म्हणजे एक मांसाचा गोळा असे झालेले असते. तो बहुतेक मरणप्राय झाला होता पण मेलेला नव्हता. थोड्याच वेळात तो सावध होतो व उभा होतो. त्याला प्रचंड त्रास झालेला होता, त्याच्या अंगातील सगळी शक्ति संपुष्टात आली होती. त्याचे शरीर त्याच्या रक्ताने माखलेले होते. अंगाला सर्वत्र जखमा झाल्या होत्या. तो शरण आल्यासारखा किराटापुढे लोटांगण घालतो. तेथे तो एक मातीची मुर्ती बनवतो व त्या मुर्तिची फुलं व पान वाहून पुजा करतो. त्याने जी फुलं त्या मुर्तीला हार करून घातली ती त्या किराटाच्या गळ्यात पडली होती. तो प्रकार पाहून अर्जुन समजला कीं, किराट म्हणजे प्रत्यक्ष शीवदेव आहे. ते समजल्यामुळें अर्जुनाचा आनंद गगनात मावेना. त्याच्या सगळ्या जखमा भरून गेल्या व तो पुर्ववत झाला. आता पुनः जाणीवपूर्वक तो महादेवाच्या पाया पडतो. किराटाच्या रुपातीव महादेवसुद्धा त्याच्यावर प्रसंन्न झालेले असतात. त्याचे शरीर घोर तपस्या केल्यामुळें अशक्त झालेले असते ते त्याला जाणवते. त्यानंतर महादेव धनंजयाला ढगांचा गडगडाट व्हावा अशा घोघर्या आवाजात बोलतात, "मी अरे अर्जुना, तुझ्यावर

प्रसन्न झालो आहे. तू खरोखरच अजिंक्य आहेस. तुझ्या योग्यतेचा क्षत्रिय पृथ्वीवर नाही. तुझे धाडस, हिम्मत अतुलनीय आहेत. तुझे सामर्थ्य माझ्या एवढेच आहे. माझ्याकडे पहा, तू कमलनयना, मी तुला ते नेत्र देतो ज्यामुळें तू मला पाहू शकशिल. तू प्राचीन काळी गेल्या कल्पात मोठा ऋषी होतास, ह्या जन्मात तू तुझ्या सगळ्या शत्रूंचा नाश करशिल. स्वर्गात जरी ते लपले तरी तू त्यांना हुडकून काढून ठार करशिल. मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे म्हणून तुला तीन आयुध अर्पण करतो ज्यांच्यामुळें तू सदैव अजिंक्य रहाशिल".

वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुन त्या देवाकडे पहात रहातो. त्याचे तेज अवर्णनीय होते, त्याच्या हातात त्याचे धनुष्य पिनक होते, तो कैलासावर रहात आहे, त्याच्या बाजूला त्याचे अर्धांग उमा आहे, असें पाहून अर्जुन खाली वाकून त्या दर्शनाला लवून नमस्कार करतो आणि प्रार्थना करतो, "अहो कपर्दीन, देवांच्या देवा, भगाचे नेत्र काढणारा, अहो महादेवा, अरे निलकंठा, जटाधारी, सर्व कारणांचे कारण असा, त्रिनेत्री, परमेश्वरा, ह्या विश्वाचे उगम स्थान असा, जो देव, असुर आणि माणूस ह्यांना नियंत्रित करतो. तूंच शीव, तूंच विष्णू, तूंच प्राचीन दक्षाचा नाश करणारा, तूंच हरी, कुद्र, मी तुला शरण जातो. तुझ्या भाळी एक नेत्र आहे, अहो शर्व, अहो सर्व कामना पूर्ण करणारा, त्रिशूळधारी, पिनाकधारी, अहो सुर्य, भद्रदेवा, गणांच्या देवा, अहो शुभंकरो, सर्व नरात श्रेष्ठ, तूंच सुक्ष्मता, तूंच स्थुलता, अहो शंकरा, मला माफ करा, मी जे कांहीं तुमच्या बरोबर केले त्याबद्दल मला क्षमा करा कारण मी ते अज्ञानात केले होते. मी हिमालयात, येथे तुमचे दर्शन घेण्यासाठी आलो होतो जे विरक्तांचे माहेरघर आहे. तुमच्या कृपा प्रसादासाठी प्रार्थना करत आहे. माझ्या आगावूपणाबद्दल मला क्षमा करावी. ते माझे अज्ञान होते. मला तुमच्या संरक्षणाची गरज आहे".

वैशंपायन नंतर सांगतात, ज्याचे चिन्ह आहे वृषभ, अर्जुनाचा हात स्वताच्या हातात घेऊन बोलतो, "मी तुला सर्वस्वी क्षमा केले आहे". असें बोलून तो हरहर अर्जुनाला पुन्हा सांगतो.

अशारितीने वनपर्वातील किराट पर्वाचा एकोणचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग चाळीसावा

## (किराट पर्व पुढे चालू)

महादेव बोलतात, "अरे नरा, तू तुझ्या आधीच्या कल्पातील काळात नारायणाचा मित्र होतास. त्याकाळात तू एक महा अवघड अशा तपश्चर्येत गुंतला होतास. त्यात तू हजारो वर्षे मस्त होतास. त्याकाळात तू आणि तुझा मित्र विष्णू जे पहिले पुरुष होतात, मोठे बलवान होता. तुम्ही तुमच्या बळाने सगळे विश्व धरून ठेवले होते. तुमचे ते भारी धनुष्य, ज्याच्या टणत्काराने, जो ढगांच्या गडगडाटासारखा होता, घेऊन तुम्ही दोघे दानवांचे पारिपत्य करत होतात. तेव्हां इंद्राचा राज्याभिषेक होणार होता. हेंच ते गांडीव आहे. ते तुझ्या हातात शोभते. ते मी तुझ्या हातातून खेचून घेतले ते केवळ माझ्या भ्रम सिद्धीने करू शकलो. वस्तुतः ते एरवी शक्य नाही. ते न संपणारे भाते सुद्धा मी माझ्या भ्रमसिद्धीने रिकामे असल्याचा आभास करून तुला घाबरवले होते. खरेतर ते रिकामे झालेले नव्हतेच. अरे कुंतीपुत्रा , तुझ्या देहाला ज्या जखमा झाल्या आहेत व जे इतर प्रकारचे दुःख होत आहे ते सर्व संपेल व तू पुर्ववत होशिल. तुझी हिम्मत अतुलनीय आहे. मी तुझ्यावर संतुष्ट झालो आहे. तुला माझ्याकडून काय पाहिजे ते बोल, मी ते तुला देण्यास तयार आहे. मांग काय तुला पाहिजे. तुझ्या शिष्टाचार संपन्न वागण्याची पृथ्वीवर आणि स्वर्गातसुद्धा कोणी बरोबरी करू शकणार नाही. कोणीही क्षत्रिय तुझ्या बरोबरीचा नाही". ते ऐकल्यावर अर्जुन महादेवाला सांगतात,

"ज्याचे चिन्ह वृषभ आहे अशा नटराजा, जर तू माझी मागणी पूर्ण करण्याचे वचन देत आहेस तर मला तुझे ब्रह्मास्त्र पाहिजे ज्याच्यापुढे कोणीही टिकत नाही. ज्याचा वापर करून तू युगाचा अंत करतोस ते प्रभावी शस्त्र मला माझ्या शत्रूशी लढण्यासाठी आवश्यक आहे. कांहीं वर्षानंतर जे महायुद्ध होणार आहे ज्याची तुला कल्पना असेल त्यात ते मला उपयोगी येणार आहे. त्या युद्धात महाबली भिष्म, द्रोण, त्यांचा पुत्र अश्वत्थामा आणि कर्ण ह्यांच्याशी लढतांना ते मला वापरावे लागेल त्यासाठी ते तुम्ही मला प्रदान करावे. त्याच्या वापराने मी त्या लढाईत लढणारे दानव आणि राक्षस मारणार आहे. त्याशिवाय जर पिशाच्च, गंधर्व, यक्ष, नांग असें कोणीही माझ्या आडवे आले तर मी त्यांना पुरून उरलो पाहिजे. तुझे ते ब्रह्मास्त्र फेकल्यावर त्यातून असंख्य विषारी बाण, शरं, अग्नीबाण असें

निघतात, त्याच्यापुढे कोणीही उभा राहू शकत नाही. त्याची मला फार गरज आहे जेव्हां मी भिष्म, द्रोण, कृपाचार्य, सतत शिवीगाळी करणारा कर्ण आणि अश्वत्थामाशी लढतांना उपयोगी येईल. भगाचा वध करणार्या विश्वनाथा ही माझी प्रमुख मागणी आहे. मला त्या योद्ध्याशी लढण्यात यश आले पाहिजे ही आणखीन एक मांगणी आहे".

ते ऐकल्यावर भव (महादेव) त्याला बोलतात,

"अरें शक्तिमान कुंतीपुत्रा , मी तुला ते माझे खास शस्त्र देत आहे. त्याचे नांव आहे, पशुपत. अरे पंडुच्या पुत्रा, तुझ्यात ते धरणे, फेकणे, आणि परत घेणे असें सगळे करण्याची क्षमता आहे. ती क्षमता अजून मृत्यूदेव यम, यक्षांचा राजा (कुबेर), जलदेव वरुण आणि वायू अशा कोणामध्येही नाही. त्यामुळें तू ज्या माणसांशी मुकाबला करणार आहेस त्या लढाईत त्यांना त्या शस्त्राला अडवणे केवळ अशक्य आहे. परंतु, ते विनाकारण उपयोगात येणार नाही ह्याची दक्षता तुला बाळगावी लागेल. कारण, जर ते कमी क्षमतेच्या लक्ष्यावर फेकले तर ते सगळी पृथ्वी नष्ट करून टाकेल. ह्या शस्त्राने तिनही जगातील सगळी चर व अचर सृष्टी नष्ट होऊ शकते. ते मनाने, डोळ्याने, शब्दाने, आणि तिरकमट्याने असें अनेक साधनाने फेकता येते".

ते सांगितल्यावर पुनः वैशंपायन बोलतात, ते ऐकल्यावर पृथाचा मुलगा, स्वतःला शुद्ध करण्याचे सुरु करतो, (शौंच, लघवी उरकून नंतर तोंड धुणे, हात पाय धुणे, नाक, कान, डोळे व जिभ त्यावरील मळ काढून स्वच्छ करणे, ह्या विधीला शरीराच्या शुद्धीची विधी असें म्हणतात. त्यालाच इस्लाम परंपरेत उजू करणे असें म्हणतात. त्यानंतर मनाची शुद्धी करावयाची असते, त्यात मनातून सगळे विचार काढून टाकून मन विचारशून्य अवस्थेत न्यावयाचे आणि तशा अवस्थेत इष्ट देवतेचे स्मरण करावयाचे असते. ह्या विधीला विपाशना विधी असें म्हणतात.) त्यानंतर तो शीवाला भेटतो, आणि बोलतो, "अहो महादेव, आता मला आज्ञा द्या". त्यानंतर महादेव त्याला पशुपत शस्त्राची विधी शिकवतात. त्या विधीनंतर ते शस्त्र अर्जुनाचे होते. ते धनंजय स्वीकारतो व तो विधी संपन्न होतो. त्या क्षणी संपूर्ण पृथ्वीवरील जमीन, समुद्र, गांव, शहरं, जेथे जेथे मानव वस्ती आहे तेथे तेथे धरणाकंप होतात. आकाशातून असंख्य शंखू, नगारे, हजारोंनी वाजू लागतात. त्याच वेळी वादळे, वावटळी जागोजागी उठतात. ते ध्वनी देव आणि दानव दोघेही

ऐकतात. ते पशुपत शस्त्र मानवी रुपात अर्जुनाच्या बाजूला येऊन उभे रहाते. त्यानंतर त्रिनेत्र देवाच्या हस्त स्पर्शाने अर्जुनातील जे हीणकस होते ते सगळे नष्ट होते. ते झाल्यानंतर तो त्रिनेत्र देव अर्जुनाला बोलतो, "आता तू स्वर्गात जा आणि इंद्राला भेट". त्यानंतर धनंजय नम्रपणे वाकून नमस्कार करतो महादेवाला, त्याच्याकडे त्या स्थितीत पहात रहातो. उमापति, कैलासवासी, पूर्ण संयमी, असा तो देवादिदेव महादेव दानव आणि पिशाच्चादि उपद्रवकारी शक्तिंचा नाश करणारे पशुपत शस्त्र अर्जुनाला देऊन आपल्या निवासस्थानी जेथे अनेक गुहा, दर्या आहेत व जे त्याचे आवडते आहे आणि जेथे ईशीस देवता आनंदात रहात असतात, तेथे, त्यांच्या सगळ्या गणां बरोबर आकाशात उडून निघून जातात.

अशारितीने वनपर्वातील किरात पर्वाचा चाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकेचाळीसावा

## (किराट  पर्व संपले)

वैशंपायन पुढे सांगतात, पिनाक धारण करणारा ज्याचे चिन्ह वृषभ आहे, अशा रितीने तेथून अर्जुनाच्या समोर अंतर्धान पावतात. जसें सूर्य मावळतो. ते पाहून अर्जुन विस्मय चकित झालेला असतो. तो स्वगत बोलतो, "मी माझ्या ह्या डोळ्यांनी महादेवाला पाहिले. त्याला मिठी मारली त्याचा शरीर स्पर्श मला मिळाला, मी किती भाग्यवान आहे! त्याना मी आशिर्वाद त्यांच्या मुखातून देतांना पाहू शकलो किती मोठे माझे भाग्य आहे. मी निश्चितच कौरवांशी लढण्यात यशस्वी होणार. असें समजावयाला हरकत नाहीं कीं मी जिंकलो आहे. त्या युद्धात आमचा विजय होणार ह्याबद्दल आता शंका नको. युधिष्ठीराला असलेल्या भितीचे कारण आता उरलेले नाही". अशाप्रकारे तो विचार करत असतो. त्यावेळी तेथे वरुण देव, जलदेवता येते. त्याच्या बरोबर विविध प्रकारचे जलचर प्राणी सोबतीला असतात. त्याचा रंग नीलमणी सारखा गर्द नीळा असतो. त्याच्या सोबत नर व मादी असें नांग, दैत्य, साध्य आणि कित्येक सामान्य उपदेवता असतात. त्यांच्या नंतर साक्षात कुबेर येतो, त्याचे शरीर सोनेरी रंगाचे असते. त्याच्या सोबतीला अनेक यक्ष असतात. त्याच्या येण्याने सर्व आकाश प्रकाशाने झगमगून निघते. ते सगळे अर्जुनाला भेटण्यासाठी व आपल्या शुभेच्छा देण्यासाठी आलेले होते. त्यानंतर साक्षात यमदेव, मृत्यूची देवता जी नेहमी दक्षिणेकडे असते, तेथे धनंजयाला भेटण्यासाठी आलेली असते. त्याच्या सोबत पितर असतात. त्यातील कांहीं पितरांना देह असतो व कांहींना नसतो. यमाच्या हातात त्याची गदा असते व तो त्याच्या रथातून आलेला असतो. त्याच्या येण्याने तीन जगं ज्यात गुह्यक, गंधर्व आणि नाग रहातात ती उजळून निघतात. तो सूर्याचा मुलगा आहे. तो अर्जुनाला सांगतो, फार लांबून तो त्याच्या सोबत्याबरोबर अर्जुनाची घोर तपश्चर्या पहात होता. तो असें सांगत असतांना त्याच वेळी साक्षात शक्र तेथे अवतरतो. त्याच्या ऐरावत वाहनावरून तो आलेला असतो. त्याच्या भोवती असंख्य देवता असतात. त्यात अनेक गंधर्व, अप्सरा, ऋषी असतात. त्याच्या डोक्यावर शुभ्र रंगाची छत्री असते त्यामुळे तो ढगाळ आकाशातून डोकावणार्या चंद्रासारखा भासत होता. तो तेथील एका शिखरावर उतरतो. तो अर्जुनाला सांगतो त्याच्या घोगर्या आवाजात, "अरे अर्जुना आम्हाला पहा,

आम्ही ह्या दुनियेचे कर्ते व संरक्षक आहोत, पुढे होणार्या युद्धात महान गुणी कुरु वंशातील भिष्माशी तुला लढावे लागणार आहे, जो एका वसुचा मुलगा आहे, तू भारद्वजाच्या मुलाच्या सेनापतित्वात लढणारे सगळे क्षत्रिय मारणार आहेस. तू त्या सगळ्या शक्तिमान दानवांनासुद्धा मारणार आहेस जे कौरव म्हणून मानव देहधारी बनून आले आहेत. त्याशिवाय नवतकवच नांवाचे दानवसुद्धा तू मारणार आहेस. तू कर्णाचा वध करणार आहेस. जो सूर्याचा अंशावतार आहे. तू आणखीन बरेच स्वर्गातून पृथ्वीवर उतरलेले दानव, राक्षस जे मानव रुपात वावरत आहेत त्यांनासुद्धा ठार मारणार आहेस. ते मारल्यानंतर पुन्हा त्याच्या ठरलेल्या स्थानी निघून जातील. तुझी किर्ती जगात अनंतकाळ गाजत राहील. तू साक्षात महादेवाचा हस्तक झाला आहेस. तू त्या समरात पृथ्वीवरील पापाचा बोजा कमी करण्यात साक्षात विष्णूला मदत करणार आहेस. यमदेव पुढे सांगतो, "हे माझे आयुध, गदा तू घे आणि त्याचा वापर करून मोठी कामगिरी करावीस".

वैशंपायन सांगतात, अरे जनमेजया, कुंतीपुत्र ती गदा यमदेवाकडून घेतो. त्याबरोबर त्याचे मंत्र व तंत्रसुद्धा घेतो. त्यानंतर जलदेवता, वरुण पुढे होते व सांगते, जी नेहमी पश्चिमेकडे रहाते, ती देवता बोलते, तू क्षत्रियांत सर्वश्रेष्ठ आहेस. माझे फांसे कधीही चुकत नाहीत. त्यांच्या मदतीने तू अनेक दैत्यांना मारू शकशिल. ह्यांच्या मदतीने प्राचीन काळी होऊन गेलेल्या लढाईत जी बृहस्पतीच्या बायकोमुळें सुरु झाली होती, तू अनेक दैत्यांना बांधून ठेवले होतेस. ते आता तू घे. ह्याच्या मदतीने तू साक्षात यमालासुद्धा बांधू शकतोस. अशा आयुधांच्या मदतीने तू सगळी पृथ्वी भ्रष्ट क्षत्रियांपासून मुक्त करू शकशिल".

वैशंपायन पुढे सांगत असतात, यम आणि वरुण ह्यानी त्याची आयुधे त्याला दिल्यावर तेथे धनसंपत्तीचा देव कुबेर ज्याचे स्थान कैलास पर्वतावर आहे, पुढे होतो व अर्जुनाला बोलतो, "अरे पंडुपुत्रा, तू खूप हुशार आहेस, मी तुझ्यावर खूष झालो आहे, तुला येथे भेटण्यात मला तोंच आनंद होत आहे जो मला कृष्णाला भेटतांना होतो. डाव्या हाताने तिरंदाजी करणार्या सव्यसाची अर्जुना, गेल्या कल्पात तू एक देव होतास. तुझी बैराग्यपूर्ण तपस्या फार मशहूर होती. मी तुला दिव्य दृष्टी देणार आहे. त्यामुळें तू न दिसणारे दैत्य, दानव पाहू शकशिल व त्याना मारू शकशिल. ती दिव्य दृष्टी त्वरित स्वीकार, ते एक विलक्षण आयुध आहे. ह्याच्या मदतीने तू धृतराष्ट्राचे सगळे योद्धे नष्ट करू शकशिल. ह्याला

अंतर्धान असें म्हणतात. ह्या आयुधाच्या प्रभावामुळें शत्रू झोपी जातो. जेव्हा महादेवांने त्रिपुर राक्षसाला मारले तेव्हा त्यांने हेंच आसुध वापरले होते. ह्या आयुधाचा उपयोग शंकराने अनेक राक्षसांना ठार मारण्यासाठी ह्या आधी केला आहे. ते मी तुला आता देत आहे, त्याचा तुला खूप उपयोग होणार आहे त्या महायुद्धात. तू हे वापरण्यास योग्य आहेस". ते ऐकल्यावर अर्जुन ते आयुध कुबेराकडून स्वीकारतो. त्यानंतर तो स्वर्गीय देव अर्जुनाशी बराच वेळ गप्पा मारतो. त्याचा आवाज ढगांच्या गडगडाटासारखा होता. तो त्याला पुनः सांगतो अरे तू फार प्राचीन देवतांपैकी एक आहेस. ज्यांनी गेल्या युगात मोठी कामगिरी केली होती. परंतु, अजून कांहीं राहून गेले आहे, त्यासाठी तुला आता स्वर्गात जावे लागेल आणि ते पूर्ण करावे लागेल. म्हणून तू आता त्या तयारीला लागावेस असे मला वाटते. माझा रथ लवकरच पृथ्वीवर येणार आहे त्याच्या सारथ्याचे नांव आहे, मताली. तो तुला स्वर्गात घेऊन जाईल. तेथे गेल्यावर मी माझी सगळी आयुधं तुला देणार आहे. त्या सगळ्या दैवी देवतांना तो त्याच्या भोवती पहात असतो. त्याला त्याचे आश्चर्य वाटत असते व खूप मजासुद्धा वाटत असते. त्यानंतर तो तेथे  त्याच्या भोवती जमा झालेल्या लोकपालांना वंदन करतो. त्यासाठी तो फळं फुलं आणि पाणी वापरतो. ती पुजा घेऊन ते लोकपाल (यमदेव, वरुणदेव, कुबेर, इंद्र ह्या लोकपाल देवता आहेत. त्यांच्या सोबतीला त्यांचे गण असतात) त्यांच्या ठिकाणी मनाच्या वेगांनी निघून जातात. अर्जुनाचा आनंद गगनात मावत नव्हता. त्याला केल्या तपश्चर्येचे अपेक्षित फळ मिळालेले होते. जणू त्याच्या डोक्यावर यशाचा मुकूट आला होता.

अशारितीने वनपर्वातील किराट पर्वाचा एकेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग बेचाळीसावा

## (इंद्रलोकागमन   पर्व सुरु)

वैशंपायन सांगतात, लोकपाल त्यांचा मान घेऊन निघून गेले. त्यानंतर एकंदर जे कांहीं घडले त्याचा आढावा धनंजयाने घेण्यास सुरुवात केली. आता अर्जुन इंद्राने पाठवलेल्या रथाने स्वर्गाकडे निघाला होता. इंद्राने दिलेला रथ त्याच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. गुडाकेश विचार करत होता, त्यावेळी रथाचा चालक, मताली तो रथ घेऊन लिलया ढगं ओलांडून झपाट्याने आकाशात शिरत होता. त्यामुळें सगळे अवकाश त्याच्या तेजांने उजळून निघाले होते. त्याच्या उडण्यामुळें ढगांतून गडगडाट होत होता. त्या रथामध्ये असलेले तलवारी, अग्नीबाण, विचित्र आकाराच्या गदा, पंख असलेली शरं (छोटे बाण) ह्यांचा आवाज होत होता. त्याशिवाय भयंकर फणा असलेले नाग सुद्धा त्या रथात होते. त्या रथाला खेचण्यासाठी दहाहजार घोडे होते. त्या घोड्यांचा रंग सोनेरी होता. रथ वार्याच्या वेगांने प्रवास करत होता. त्या रथामध्ये भ्रम दृष्य उत्पन्न करण्याची किमयासुद्धा होती. नजरेपुढे थरणार नाही असा त्या रथाचा वेग होता. अर्जुन त्या रथाची पहाणी करत असतो, त्याला रथावर एक ध्वज दिसला, वैजयंता नांवाचा. रंगाने तो दाट नीळ्या रंगाचा होता जसें निलमणी पासून तो बनवला आहे असें वाटावे. त्यावर सोनेरी नक्षी होती. ध्वजाचा दांडी सरळ बांबूचा होता. त्या रथाचा सारथीसुद्धा सोनेरी जरी असलेले कपडे नेसला होता. त्यावरून तो समजतो कीं, हा रथ स्वर्गातीलच आहे. अशारितीने तो कुंतीपुत्र विचारात मग्न असतांना मताली, रथाचा चालक आपल्या स्थानातुन उठत अर्जुनाला बोलतो, "अहो, तुम्ही शक्रसुत, फार भाग्यवान अहात. शक्र स्वतः तुम्हाला भेटण्यासाठी उत्सुक आहेत. कारण, हा रथ साक्षात इंद्रदेवांनी आपल्यासाठी पाठवला आहे. अमर लोकांचा राजा, आपले पिता, त्यांनी मला आज्ञा केली आहे किं, कुंतीच्या सुपुत्रास माझ्याकडे घेऊन ये. ते सहस्त्र यज्ञाचे आणि हजार नेत्र असलेले देवांचे राजे म्हणाले कीं, त्याना सगळ्या देवांना तुमचा परिचय करून द्यावयाचा आहे. ते स्वतः त्यांच्या सगळ्या परिवारासह ज्यात अप्सरा, गंधर्व, ऋषी असें सगळे दैवी लोक आहेत आपल्या येण्याची वाट पहात आहेत. तेथे गेल्यावर ते तुला विविध आयुध देणार आहेत जी मंत्रानेच चालवता येतात. ती घेऊन तुम्ही परत पृथ्वीवर जाणार अहात". ते मतालीचे बोलणे ऐकल्यावर

अर्जुन त्याला विचारतो, "अहो मताली, तुम्ही ह्या रथाचे चालक अहात, जो शंभर राजसुय आणि अश्व यज्ञ करूनही मिळणार नाही. ब्राह्मणांना मोठ मोठ्या भेटवस्तु व दानं करूनही असा रथ त्या राज्यांच्या भाग्यात येणार नाही. देव, दानव, अशा रथातून प्रवास करण्यास लायक समजले जात नाहीत. मोठे तपस्वीसुद्धा असा रथ साधा पाहू शकत नाहीत, त्यात बसण्याची गोष्ट राहिली बाजूला. अशा रथाचे सारथ्य तुम्हाला मिळाले हे तुमचे मोठे भाग्य आहे. त्यातून मी तो रथ जेव्हां थांबेल तेव्हां उतरेन, तेव्हां मी स्वताला मोठा पुण्यवान समजेन".

वैशंपायन नंतर सांगतात, अर्जुनाचे ते बोलणे ऐकून मताली आपल्या चालकाच्या जागी बसतो व घोड्यांना थांबवतो. तो रथ गंगेच्या तटावर थांबलेला होता. धनंजय रथातून उतरतो व गंगेत स्नान करून स्वताला शुद्ध करतो. त्या नंतर तो पार्थ हात जोडून नेहमीची प्रार्थना मोठ्या आवाजात करू लागतो. त्यानंतर तो शास्त्रात दिलेल्या रिवाजानुसार पितरांना अर्घ्य देतो. शेवटी तो मंदार पर्वताला आवाहन करतो, "अहो पर्वतांच्या राजा, तू नेहमीच श्रेष्ठ मुनीजनांचा यजमान राहिला आहेस, तुझ्या कृपेमुळें ते अनेक ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य स्वर्गाला जातात. त्यांची सगळी दुःख तुझ्यामुळें संपतात. ते स्वर्गात देवांबरोबर राहू शकतात, तू अनेक महामुनींचा आधार आहेस, तुझ्यावर त्यांचे आश्रम बांधलेले आहेत, मीसुद्धा तुझ्या पठारावरच हे सर्व मिळवले आहे. आता मी तुझी रजा घेत आहे. तुझ्या पठारावरील झरे मी पाहिले, दरीकंदर पाहिले, अनेक ऋषींचे आश्राम पाहिले, तुझ्या वनांत वाढलेल्या झाडांवरील फळं मी खाल्ली आहेत, तुझ्या कडील झर्यांचे पाणी पिऊन माझी तहान भागली आहे, तुझ्या कातळातील पाझरणारे सुगंधी पाणी जे अमृतासारखे आहे ते मी अनुभवले आहे, जसे लहान मुल त्याच्या पित्याच्या मांडीवर निजते तसा मी तुझ्या जमिनीवर झोपून दिवस काढले आहेत. अप्सरांच्या गाण्याने व वेदांच्या पठणाने जे वातावरण गुंजत आहे अशा तुझ्या पठारावर मी मजेत माझे दिवस काढले आहेत. आता मी ह्या सगळ्या आठवणी घेऊन जात आहे. अशी प्रार्थना करून तो सुर्यासारखा तेजस्वी योद्धा इंद्राच्या रथात जाऊन बसतो. त्यानंतर तो रथ पुन्हा आकाशात झेपावतो. जसा तो पंडुपुत्र स्वर्गा जवळ येतो, तो मर्त्य लोकांना दिसेनासा होतो. आता तो स्वर्गवासी झालेला असतो. त्याला स्वर्गातील गोष्टी दिसू लागतात. तेथे सूर्य आणि चंद्र नसतात. तेथे

प्रकाशासाठी कोठल्याही अग्नीची आवश्यकता नव्हती. कारण तेथे एक अद्भूत मंदसा प्रकाश सर्वत्र जाणवत होता. तेथे कोठेही अंधार नव्हता. तो प्रकाश तेथे असलेल्या पुण्यवान रहिवाशांच्या पुण्याईचा होता. तेथे अजब प्रकारच्या रचना असलेले रथ ठिकठिकाणी उभे होते. आकाशात तेथे विविध तारका जसें दिवे ठेवलेले असावेत असें ठेवलेले दिसत होते. त्यांचा मंद प्रकाश अर्जुनाला भावला. ते सगळे अतिशय प्रसन्न करणारे होते. त्याला राजर्षी, महर्षी आणि अनेक महायोद्धे वावरत होते, ज्यानी युद्धात वीरगती प्राप्त केली होती. त्याशिवाय असंख्य गंधर्व, गुह्यक, ऋषी आणि अप्सरा त्याच्या विलक्षण तेजांने उजळून निघालेल्या अशा दिसत होत्या. ते सगळे पाहून अर्जुनाला विलक्षण आश्चर्य वाटले व तो मतालीला विचारतो, त्याच्या सगळ्या चौकशांची सविस्तरपणे मताली उत्तरे देतो. तो सांगतो, ते वावरतांना दिसत आहेत ते सगळे पुण्यवान लोक आहेत, येथे पृथ्वीवर पराक्रम गाजवणारे पुण्यवान लोक तुम्हाला पहावयास मिळतील. त्यातील कित्येक तुला माहित असतील. असें पहात ते अखेरीस इंद्राच्या वाड्याकडे येतात. तेथे प्रवेशद्वारावर ऐरावत, इंद्राचे वाहन झुलत डुलत उभा होता. त्याला चार मोठाले दांत होते. कैलास पर्वतासारखा तो अवाढव्य वाटत होता. त्यानंतर एका वाळणावर ते सिद्धांच्या वस्तीत येतात. त्यानंतर ते त्या राजांच्या वस्तीत येतात जेथे महान राजे त्यांच्या पुण्यकर्मामुळें असतात. असें जाता जाता शेवटी त्यांचा रथ अमरावतीकडे येतो अमरावती, स्वर्गाची राजधानी.

अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा बेचाळीसावा भाग संपला.

## वनपर्व भाग त्रेचाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, अर्जुन अमरावती पहातो, त्याला आनंद होतो कारण, ती असतेच तशी, तिच्यात सिद्ध आणि चरण ह्यांची वस्ती असते. तिच्या सजावटीत विविध पवित्र वृक्ष लावलेले होते व त्यांत अनेक सुंदर फुलं देणार्या वेली व इतर झाडे होती. तेथे नंदनवन नांवाचे उद्यान होते. जेथे स्वर्गातील अप्सरा वेळ घालवण्यासाठी जात असतात. त्या उद्यानात सुगंधी फुलाच्या वरून वहाणार्या झुळूकीमुळें संपूर्ण परिसर सुगंधमय झालेला असतो. जणूकाय ते त्याचे स्वागत करत आहेत. तो सगळा परिसर असा होता कीं, तेथे फक्त अध्यात्मिक दृष्ट्या उच्च स्थितीत गेलेलेच जाऊ शकत होते. तो परिसर फक्त पवित्र लोकांसाठी होता. त्याचप्रमाणे जे तत्त्वासाठी लढले व वीरगतीने मेले त्यांच्यासाठी होता. ह्या परिसरार वावरणे व ते पहाणे फक्त त्या लोंकांना शक्य असते ज्यांनी योग्य प्रकारे यज्ञविधी संपन्न केले आहेत व जे सत्त्वशिल आणि व्रतस्थ जीवन जगले होते. ज्याना वेद माहीत नाहीत, ज्यांना पवित्र जलात स्नान केलेले नाही, ज्यानी दानं व भेटी ब्राह्मणांना दिल्या नाहीत, ज्यांनी इतरांना चांगले कार्य करण्यात मदत केली नाही किंवा तशा कामात विघ्न केली, जे सत्त्वशिल नाहीत आणि जे व्रतस्थता पाळत नाहीत, जे देवांचा उपमर्द करतात, जे देवांना प्रसाद म्हणून न देता स्वतः मांस खातात, मांसाहार करतांना ते मांस प्रथम देवांना प्रसाद म्हणून देऊन मग तो प्रसाद समजून ते मांस खाण्याचा प्रघात होता. वस्तुतः सगळेंच खाद्य प्रथम देवांना अर्पून मग त्यांचा प्रसाद समजून खावं असा परिपाठ असतो. अशा नयनरम्य उद्यानात तो पंडुपुत्र फिरत होता. त्यानंतर तो इंद्राच्या नगरीत प्रवेश करतो. त्या वाड्याच्या बाहेर असंख्य दैवी रथ तयारीत असें उभे होते. त्याशिवाय असंख्य तसलेच रथ ये जा करत होते. तेथे मंद झुळूकी वातावरणात होत्या त्यांच्यामुळें विलक्षण सुख देणारे सुगंध सर्वत्र पसरत होता. तेथे त्याचे स्वागत अप्रतिम सौंदर्य असलेल्या अप्सरांनी व गंधर्वांनी केले. त्यांच्या सोबतीला सिद्ध आणि ऋषी होते. मोठ्या आनंदाने अर्जुनाचे तेथे त्या सगळ्यांनी अभिनंदन केले. त्याच्यावर विविध प्रकारे शुभेच्छांचा ते वर्षाव करतात. त्या परिसरात सुमधूर संगीताच्या धून त्याला ऐकू येत होत्या. त्याच वेळी त्याला शंखूचे आणि ढोलक्याचे संगीत ऐकू येऊ लागले. त्यानंतर

इंद्राच्या आदेशानुसार तो सुरविथी नांवाच्या चमचमणार्या तारकांच्या मार्गांने पुढे चालू लागतो. तेथे त्याला अनेक साध्य, विवस्वात, मरुत, अश्विनी द्वय, वसु, रुद्र, तेजस्वी ब्रह्मर्षी, त्याशिवाय अनेक राजर्षी भेटतात. त्यांत राजा दिलीप सर्वात पुढे होते. त्यांच्या मागे तुंवरु व नारद होते. त्यांच्या मागे ते प्रसिद्ध गंधर्व होते ज्यांना हह व हुहु अशा नांवाने ओळखतात. त्यांना भेटल्यानंतर तो त्या सर्वांना अधिवादन करतो. सरते शेवटी तो सहस्त्र नेत्र असलेला देवांचा राजा शक्र ह्यांच्या पर्यंत पोहोचतो. तेथे तो पांडव रथातून उतरतो व आपल्या जन्मदात्याला भेटतो. इंद्राच्या डोक्यावर शुभ्र रंगाची छत्री जीचा दांडा सोन्याचा होता धरलेली होती. त्याच्या भोवती अप्सरा चरव्यांनी त्यांना वारा घालत होत्या. त्यांतून स्वर्गीय सुगंध दरवळत होता. त्याचे अनेक गंधर्व स्तुतीगान करत होते. त्यात गंधर्वांचा भाट विषीवावसु प्रमुख होता. त्यामध्यें कांहीं प्रमुख ब्राह्मण ऋचा आणि सुयोग्य यजु कवन गांत होती जसे वेदाचे पठण करतात तसें. तो महाप्रतापी पांडव इंद्राला लवून जमिनीला डोके लावून प्रणिपात करतो. त्याला उठवून त्याचा जन्मदाता इंद्र त्याला छातीशी घट्ट धरून आलिंगन देतो. त्याचा हात आपल्या हातात घेऊन तो त्याला आपल्या गादीच्या उरलेल्या भागात बसवतो. ज्या गादीची पुजा सगळें ऋषी, देव, देवता करतात त्यावर त्याला तो देवांचा राजा सन्मानपूर्वक बसवतो. त्यांनंतर जसें बाप आपल्या मुलाचे कपाळ हुंगतो तसे तो अर्जुनाचे कपाळ हुंगतो. त्यासाठी तो देवांचा राजा प्रेमांने अर्जुनापुढे झुकतो. त्यानंतर तो त्याचा पिता जिश्नुला त्याच्या मांडीवर बसवतो. तेथे त्या आसनावर बसल्यानंतर अर्जुन त्याच्या पित्यासारखा तेजांने चमकू लागला. प्रेमाने इंद्र अर्जुनाच्या देखण्या चेहर्यावरून त्याचा हात फिरवतो. इंद्र त्याच्या वज्र फेकणार्या हातांनी अर्जुनाच्या तिरंदाजी करून राकट झालेल्या हातांना पकडतो. पिता जसे प्रेमांने आपल्या पुत्रास बोलतो तसे तो त्याच्याशी त्याचे क्षमकुशल विचारतो. इंद्र त्याच्या मुलाकडे एकटक पहात रहातो. त्याचे समाधान होत नव्हते किं काय तो सारखा अर्जुनाकडे पहात रहातो. त्यामुळें त्या इंद्रसभेत एक वेगळेच तेज पसरलेले दिसत होते. जसें चतुर्दशीच्या दिवशी सूर्य व चंद्र एकत्र नभात दिसतात. दुसरी कडे एक गंधर्वांचा समुह टुंवरुच्या नेतृत्वात सुमधूर संगीत वाजवण्याची तयारी करत होते. त्यांच्या साथीला अप्सरा आल्या होत्या. त्यात प्रमुख्याने धृताची, मेनका, रंभा, पुर्वचित्ती, स्वयंप्रभा, गोपाली, सहजन्या, कुंभयोनी , प्रजागरा,

चित्रसेना, चित्रलेखा, सहा, मधूरस्वना होत्या व त्यांना मदत करण्यासाठी आणखीन बर्याच होत्या. त्या सगळ्या अप्सरा, इंद्र तपश्चर्या करणार्या ऋषींचा तपोभंग करण्यासाठी वापरत असतो. त्या तेथे एकत्रितपणे नृत्य करून अर्जुनाचे मनोगंजन करत होत्या. त्या अप्सरा त्यांचे गोल भरपूर असें नितंब खुबीने हलवून आणि त्याचवेळी उरोज उडवून बघणार्याची वासना जागवण्याचे काम करू लागतात. त्याला भर म्हणून गंधर्वांचे मादक संगीत होते.

अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा त्रेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग चव्वेचाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगतात, देव आणि गंधर्व इंद्राची इच्छा ओळखून पृथाचे उत्तम अर्घ्य देऊन घाईघाईने पुजा करतात. त्यानंतर त्याला त्याचे पाय धुण्यासाठी पाणी देतात. त्यानंतर ते अर्जुनाला इंद्राच्या राजवाड्यात नेतात. अशारितीने मानसन्मान घेत तो कुंतीपुत्र त्या दिमाखदार वाड्यात कांहीं काळ रहातो. त्या काळात तो पांडव त्याला मिळालेल्या शस्त्रांचा सराव करत होता. त्यावेळी इंद्र त्याला त्याचे खास आयुध, वज्र देतो. त्यांबरोबर इतर तशींच भयंकर आघात करणारी शस्त्रे वापरण्याची आयुधे सुद्धा देतो. अशा प्रकारे अर्जुन युद्धाच्या कामाची शस्त्रास्त्रे मिळवत असतो व ती कशी हाताळावयाची त्याचे तंत्र सुद्धा शिकत असतो. ती आयुधे आत्मसात केल्यावर त्याला त्याच्या भावंडांची आठवण येते. इंद्राच्या आज्ञेने तरीसुद्धा अमरावतीत पूर्ण पांच वर्षे वस्ती करून असतो. तेथे सर्व स्वर्गाची सुख तो भोगत असतो. कांहीं काळांनी जशी सगळी आयुधं त्याच्या कडे आली इंद्र त्याला बोलावतो, बोलतो, "अरे कुंतीपुत्रा , आता तू संगीत विद्यासुद्धा शिकले पाहिजेस. ती तुला अप्सरा चित्रसेना शिकवेल. त्याबरोबर सगळी संगीताशी निगडीत वाद्ये सुद्धा शिकले पाहिजेस. स्वर्गात प्रचलित असलेले सर्व संगीत शास्त्र तू शिकून त्यात पारंगत हो. त्या ज्ञानाचा तुला पुढे मोठा उपयोग होणार आहे". त्याने त्यासाठी चित्रसेनाला अर्जुनाची स्वर्गातील मैत्रीण म्हणून नेमले. अशारितीने पार्थ मोठ्या मजेत तेथे नृत्य, संगीत अशा स्त्रैण विद्या शिकत होता. असें सुखाचे दिवस असूनही अर्जूनाला कौरवांच्या कृष्ण कृत्यांचा विसर अजिबात पडला नव्हता. तो दुर्योधनाच्या, दुःशासनाच्या आणि कर्णाच्या कृत्यांचा प्रतिवाद कधी करता येतो त्याची प्रतिक्षा करत होता. त्या बेचैनीमुळें तो शकुनीलासुद्धा विसरला नव्हता. त्याच प्रमाणे त्याची चित्रसेनाशी असलेली दोस्ती विशेष घनिष्ट होत होती. तिच्या कडून तो गंधर्वांचे संगीत व नृत्य शिकत होता. ह्या विद्या ज्या प्रामुख्याने स्त्रैण आहेत त्या मला इंद्र का शिकवू इच्छितात ते मात्र त्याला समजत नव्हते.
अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा चव्वेचाळीसावा भाग संपला.

## वनपर्व भाग पंचेचाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगत असतात, एके दिवशी, वासवाला समजते किं, अर्जुनाची नजर इतर अप्सरांवर सुद्धा पडत आहे. तो चित्रसेनाला जवळ बोलवून सांगतो, "मी तुझ्या कामावर संतुष्ट आहे परंतु, मी तुला एक वेगळे काम देणार आहे, माझा संदेशक म्हणून तू उर्वशीकडे जा आणि तिला अर्जुनाची सेवा करण्याचे काम करावयाचे आहे असा संदेश दे. तिला अशा शब्दात माझा हा निरोप दे, "इंद्राच्या मार्गदर्शनाखाली अर्जुनाने सगळी शस्त्रविद्या आत्मसात केली आहे आता त्याला स्त्रियांच्या बरोबर कसे वावरावे ते शिकवायचे आहे". तो निरोप घेऊन तो गंधर्वांचा राजा उर्वशीकडे जातो. त्याला पाहून ती अग्रेसर अप्सरा त्याचे स्वागत करते व विचारते, "काय काम निघाले"? दिलेल्या आसनावर तो आरामात बसत तिला बोलतो, "स्वर्गाच्या राजांना तुझ्याकडून कांहीं खास काम करून घेण्यासाठी मला तुझ्याकडे धाडले आहे". पुढे तो सांगतो, "एका अशा व्यक्तीला तू स्त्रैण वर्तणूकीचे शिक्षण द्यावयाचे आहे जो आधीच देव आणि माणसांत त्याच्या स्वाभाविक पुण्यईबद्दल ख्यातनाम आहे, ज्याच्या उच्चते बद्दल, चांगल्या वर्तणूकी बद्दल, त्याच्या देखणेपणा बद्दल, त्याच्या व्रतस्थते बद्दल, संयमा बद्दल, वाक्चातुर्याबद्दल, त्याच्या बुद्धीमत्तेबद्दल, त्याच्या उर्जेबद्दल, त्याच्या क्षमाशिलते बद्दल, त्याच्या शौर्याबद्दल, त्याच्या धाडसाबद्दल, त्याच्या हिम्मतीबद्दल, त्याच्या निष्पाप वागण्याबद्दल, त्याच्या वेद, उपनिषद, वेदांगं, पुराणं ह्यांच्या अभ्यासाबद्दल, त्याच्या ज्येष्ठांशी वागण्याच्या नम्रतेबद्दल, त्याच्या सत्त्वशिलते बद्दल, त्याच्या जन्माबद्दल, तपश्चर्येबद्दल, त्याचे वय, घराणे अशामुळें जो स्वर्ग सांभाळण्यास योग्य ठरतो म्हणून जो स्वतः मेघावतासारखाच आहे, त्याच्यात दर्पोक्ती नाही, त्याचे सगळ्यांची वागणे उत्कृष्ट असते, जो लहान व मोठ्या गोष्टींचे यथायोग्य मुल्यमापन करून निर्णय घेतो, ज्याची वाणी मधूर आहे, ज्याची शिष्टाचार पद्धती अवर्णनीय आहे, जो सत्यवादी आहे, जो शरणागताला प्रेमांने वागवतो, जो उच्च कुलिन क्षत्रिय आहे, ज्याची इतरांशी वागण्याची रीत वाखाणण्यासारखी आहे, जो शब्दाचा पक्का आहे, जो महेंद्र आणि वरुणाच्या बरोबरीचा आहे अशा अर्जुनाला तुला स्वर्गाचे सुख म्हणजे काय ते दाखवावयाचे आहे. तू त्याला नांवाने ओळखतेसच. इंद्राची आज्ञा आहे

कीं, तू त्याचे स्वागत करावे. असें करावे कारण धनंजयाला तुझी इच्छा झाली आहे". ते ऐकल्यावर ती अप्सरा स्मित करते. त्या गंधर्व राजाचे ते शब्द ती आदरपूर्वक स्वीकारते. ती त्याला उत्तर देते, "अशा विविध गुणांनी पूर्ण असलेल्या माणसास मी अवश्य भेटेन व त्याचे स्वागत करीन. जो असा गुणवान आहे त्याच्या सहवासात मी खरोखरच खूप मजेत काळ घालवीन. अशा मनुष्याचे जर प्रेम मला मिळणार असेल तर ते चांगलेच होईल. मी त्याच्या कडे जाण्यास आता उत्सुक आहे".

अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा पंचेचाळीसावा भाग संपला.

## वनपर्व भाग सहेचाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत असतात, गंधर्व राजाला ती उच्च श्रेणीची अप्सरा परत धाडल्यावर अर्जुनाला जिंकण्यासाठी तयार होण्यास सुरुवात करते. ती प्रथम स्नान करते, त्यानंतर अशा पुरुषास कसे आकर्षीत करावयाचे त्या प्रमाणें ती साज श्रुंगार करून तयार होते. स्वर्गीय दागिने, सुगंधी पुष्पमाला असें लेवून ती सतत त्या देखण्या अर्जुनाचाच विचार करत असते. ती त्याच्या सहवासाची स्वप्नं पाहू लागते. त्यासाठी आपली शय्या कशी असावी ह्याची ती कल्पना करण्यात दंग होते. जसें संधीप्रकाश येतो व चंद्र उगवतो, ती मोठे नितींब असलेली जिचे उरोज मोठे आहेत व जिचे चालणे आकर्षक आहे अशी उर्वशी अर्जुनाच्या वाड्याकडे निघते. तिचा पेहराव असा होता की, त्यात ती आणखीनच जास्त सुरेख दिसत होती. तिच्या चेहर्यावरील हावभाव, भुवयांची हालचाल, चालण्याची तर्हा, देहावर घातलेले पुष्पाहार, तिची बोलण्याची मधूर वाणी, ती चालतांना हलकेंच उडणारे स्तन, मादकपणे हलणारे नितंब, तिच्या चालण्याच्या पद्धतीने आकर्षकपणें हेलकावे घेणारे लांब परंतु, कुरळे काळेभोर केस, हे सगळें कोणालाही अडकवण्यासाठी पुरेसे होते. तिच्या अंगातून विशेष मादक गंध निघत होता जो पुरुषास खेचून ठेवण्यासाठी पुरेसा होता. तिचे मुख चंद्रासारखे सुंदर होते. जणू चंद्राला ती आव्हान देत आहे. तिने गळ्यात सोन्याच्या माळा घातल्या होत्या. अंगाला चंदनाचे लेपण केले होते. तिचे उरोज भरलेले होते त्यामुळें ती थोडी वाकून चालत आहे असें वाटत होते. तिच्या चालण्यात जे डुलणे होते त्यामुळें तिचे सगळे शरीर एका आगळ्या वेगळ्या थरथराने कंप पावत होते. तिचे ढुंगण मोठे होते त्यामुळें असा भास होत होता. चालतांना तिच्या हातांचे पुढे मागे हलणे सुद्धा विशेष आकर्षक वाटत होते. तिचे वस्त्र पातळ आणि झिरझिरीत होते त्या नितळ वस्त्राच्या हलण्यात सुद्धा वेगळाच मादकपणा होता. तिच्या पावलात लाल रंगाच्या नक्षीदार सपाता होत्या. तिच्या कमरेला नक्षीदार कमरपट्टा होता व त्यात रुणझुण आवाज करणार्या लहान घंटा बसवलेल्या होत्या. ती थोडी सुरा प्याली होती त्याचा प्रभाव तिच्या सगळ्याच हालचाली, हावभाव ह्याच्यावर दिसत होता. त्यामुळें तीचे लाब कुरळे केस वेगळ्या प्रकारे ती चालताना झटके घेत हलत होते जसें पाण्यातील लाटा हलतात. स्वर्गात बर्याच सुंदर

गोष्टी आहेत परंतु, जेव्हां उर्वशी रस्त्याने चालते तेव्हा वेगळीच हवा वाहू लागते, त्याने तेथे वस्तीला असलेले सिद्ध, चरण, गंधर्व त्यात ती सर्वश्रेष्ठ मानतात. तिचे वरचे कपडे झिरझिरीत व तलम असल्यामुळें त्यातून तिचे उभे घट्ट उरोज विशेष उठून दिसत होते. एकंदर तिचे जे स्वरुप होते ते मदन देवाच्या कामासाठीच आहे असें समजत होते. तिचे मंद हास्य त्या सगळ्यात भर घालत होते. ती खाली मान घालून डुलत डुलत चालत होती. अशारितीने ती सर्वश्रेष्ठ अप्सरा धनंजयाच्या घरात येते. तेथे प्रवेशद्वारात असलेल्या द्वारपालाला ती निरोप देते. त्यानंतर ती आत प्रवेश करते, तो वाडा तिला चांगलाच परिचित होता. अशारितीने अनाहूतपणे ती लावण्यवती आपल्याला भेटायला आली आहे हे समजल्यावर तो निष्पाप पांडव जरा बावचळतो. त्याच्या छातीचे ठोके वाढतात जे त्याला जाणवल्याने तो आणखीनच शरमिंदा होतो. तरी तो तिचे आदरपूर्वकपणे स्वागत करतो. इंद्राचा हा डाव त्याला माहित नव्हता म्हणून तो समजत नाही, कीं हि सुंदरी अशा रात्रीच्या प्रहरी त्याच्या कडे कां आली आहे? तिच्याकडे तो सरळपणे पाहू शकत नाही. उच्च दर्जाच्या व्यक्तिस जसे वागवतात तसें त्याचे तिच्याशी वागणे होते. अर्जुन तिला सन्मानपूर्वक बोलतो, "अहो श्रेष्ठ अप्सरा, मी आपले स्वागत करतो". असे बोलून तो वाकून तिला प्रणिपात करतो. बोलतो, "आपल्याला काय पाहिजे म्हणून माझ्याकडे येणे केलेत ते सांगा. मी आपली सेवा करण्यास तयार आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, त्याचे ते मृदू बोलणे ऐकल्यावर उर्वशी तिचे अंदाज चुकल्यामुळें बेभान होते. तिला समजते किं, अर्जुनाला तिच्या येण्याची साधी कल्पनासुद्धा नाही. ते लक्षात आल्यावर ती शंका घेते कीं, काय गंधर्वराजाने माझी गंमत केली कीं काय? त्यामुळे बावचळलेली ती अप्सरा धनंजयला ते सगळे सांगते जे गंधर्व राजा आणि तिच्यात घडले होते. ती अर्जुनाला सांगते, "अहो पुरुष श्रेष्ठ, मी तुम्हाला सगळे सांगते जे आज सकाळी घडले, म्हणजे तुम्हाला माझ्या येण्याचा अर्थ लक्षात येईल. पुढे ती सांगते, महेंद्र तुमच्या प्रित्यर्थ एक मोठी सभा आयोजित केली होती. त्यामध्ये पुष्कळ दैवी सोहळे साजरे झाले. त्यात भाग घेण्यासाठी श्रेष्ठ पुरुष जे त्यांच्या पराक्रमासाठी ख्यातनाम आहेत, त्याशिवाय अनेक रुद्र, आदित्य. अश्विनी आणि वसु आले होते. त्याशिवाय महान ऋषी, राजर्षी, सिद्ध, चरण, यक्ष आणि नाग आले होते. अहो तुम्ही, सगळें आमंत्रित येऊन

आपापल्या स्थानावर बसल्यावर अहो शक्रपुत्रा, गंधर्व त्यांचे सुमधूर गायन सुरु करतात. त्यात महत्वाच्या अप्सरासुद्धा नाचू लगतात. त्यानंतर अहो पृथापुत्रा, तुम्ही माझ्याकडे एकटक पहात बसला होता. जेव्हां  ती सभा विसर्जित झाली व सगळे आमंत्रित आपापल्या ठिकाणी गेले, सगळ्या अप्सरा व गंधर्वसुद्धा गेले, त्यानंतर तुमच्या पित्यानी गंधर्वांच्या राजाला माझ्याकडे पाठवले. तो माझ्याकडे आल्यावर तो सांगू लागला, किं, त्याला इंद्राने पाठवले आहे अशासाठी किं, मी त्याच्या आज्ञेनुसार कांहीं काम करावे. त्यात त्यांनी सांगितले कीं, मी तुमची सेवा करावी असें त्यांचे सांगणे आहे. तो म्हणाला कीं, तुम्ही शक्रासाखेच तेजस्वी अहात व सर्वदृष्टीने उत्कृष्ट अहात, जसें किं मी तुमची सेवा करावी. त्यासाठी त्याने तुमची अशी स्तुती केली कीं, मी ते ऐकल्यावर पुर्ती भारावून गेले. त्या प्रमाणे मी आपल्याला भेटावयाला आली आहे. तुमच्या विविध गुणांच्या वर्णनामुळें मी इतकी प्रभावित झाली आहे कीं, मी तुमच्या प्रेमात पडली आहे कामदेवांनी माझा ताबा घेतला आहे कारण उत्तम गुण मला आकर्षित करतात जे तुमच्या मध्ये ओतप्रोतपणे भरलेले आहेत.

वैशंपायन सांगत असतात, स्वर्गात तिचे ते ऐकून अर्जुनाला लाज वाटली. तो त्याचा सुंदर चेहरा त्याच्यी ओंजळीत छाकून तिला सांगतो, "मला तुम्ही जे सांगता ते ऐकतांना खूप शरम वाटते. तुम्ही खूप सुंदर अहात ज्या माझ्या वरिष्ठांच्या बरोबरीच्या अहात. जशी माझी आई कुंती जशी इंद्राची साची तशा तुम्ही माझ्यासाठी अहात . अहो पवित्र, मी मान्य करतो किं मी त्या सोहळ्यात तुमच्याकडे एकटक पहात होतो परंतु, त्यात असा कोणताही उद्देश नव्हता. आता मी तुम्हाला सांगतो कीं, मी तसे कां तुमच्याकडे पहात होतो. तुम्हाला पहातांना माझ्या मनात जे विचार येत होते ते सांगतो, हि तेजस्वी बाई कौरव वंशाची माता आहे. अहो महान अप्सरा माता, तुम्ही अशा कोणत्याही गोष्टींचा साधा विचारसुद्धा करू नका. कारण तुम्ही माझ्या ज्येष्ठांच्या ज्येष्ठ अहात. आपण माझ्या पूर्वजांच्या पूर्वज अहात, माझ्या पूर्वज अहात. ते अर्जुनाचे ऐकून ती अप्सरा त्याला सांगते, "आम्ही मुक्त असतो व आमच्या मर्जीच्या मालक असतो. म्हणून तू मला तुझी पूर्वज वगैरे समजू नकोस. पुरुवंशाचे अनेक राजे येथे त्यांच्या कर्तृत्वामुळें येतच असतात. ते माझ्या बरोबर खेळतात, त्यात कोणतेही पाप होत नाही. म्हणून तू मला असे परत पाठवू नकोस.

मला तुझी वासना झाली आहे तेव्हां तू मला निःसंकोचपणे स्वीकारावेस. ते ऐकल्यावर अर्जुन तिला बोलतो, "अहो, सुंदरी, जिचे शरीर पूर्णतया निर्दोष आहे, माझे ऐका, मी तुम्हाला खरे तेंच सांगतो आहे, मी जे सांगतो आहे ते ह्या सगळ्या दिशांने ऐकावे, त्याचप्रमाणे सर्व देवांनीसुद्धा ऐकावे, अहो माझ्या मातेसारख्या पापहीन अशा माझ्या आई अथवा सावत्र आई माद्री अथवा इंद्राची भार्या साची अशां सारख्या मला अहात. आपण आमच्या वंशाची सुरुवात केली आहे. त्यामुळें आपण माझ्यासाठी पुजनीय अहात. म्हणून माझ्याकडून कोणतीही वासनिक अपेक्षा कृपया करू नका. मी तुमच्यापुढे सर्वथा नतमस्तक होऊन त्यावर लोटांगण सुद्धा घालतो पण अशा अभद्र गोष्टीची माझ्याकडून अपेक्षा करु नका. मी तुमची माझ्या मातेच्या जागी पुजा करत आहे, त्यासाठी त्या दिवशी मी तुमच्याकडे एकटक पहात होतो ते तुमच्या पुजेचे होते. त्यात वासना कृपया आपण पाहू नका. आपण माझे तुमच्या मुलासारखे संरक्षण करा". अर्जुन पुढे तिला सांगतो, माणसाच्या स्त्री–पुरुष नात्यात तीन प्रकार आहे. त्यातील फक्त एकच नाते वासनिक असते, त्यामुळें त्यात पाप संभवते. परंतु, इतर तीन नाती निष्पाप असतात. १) आई–मुलगा आणि २) बाप–मुलगी, ३)भाऊ–बहीण ही नाती निष्पाप असतात. ब्रह्मचर्य पालन करतांना त्या प्रमाणे नाती धरली कीं, ब्रह्मचर्य पालन साध्य होते. मी तूर्त ब्रह्मचर्य पाळत असल्यामुळें मी सगळ्या स्त्रियांमध्ये माझी आई, आजी, बहीण, मुलगी पहात असतो. त्या प्रमाणे मी तुमच्याकडे माझी आजी कशी दिसते ते पहात होतो". ते ऐकल्यामुळें ती अप्सरा तिच्या सौंदर्याचा अवमान झाला असे समजून क्रोधीत झाली व त्याला शाप दिला.

वैशंपायन पुढे सांगतात, अशा रितीने धनंजय बोलल्यावर उर्वशीचा राग आणखीन वाढला, ती संतापाने थरथरू लागली. आपल्या भुवया उंच करून ती अर्जुनाला शाप देते. तो शाप असा, "अरे पार्था, तू माझा अव्हेर केला आहेस. मी तुझ्या पित्याच्या आज्ञेने व माझ्या मर्जीने तुझ्याकडे वासनिक उपशमन करुन त्या द्वारा तुला संतुष्ट करण्यासाठी आले असतांना मला मातेचा दर्जा देऊन माझ्या स्त्रित्वाचा उपमर्द केला आहेस. म्हणून तू तुझ्या जीवनातील कांहीं काळ बायकात घालवशिल, तेथे तू नृत्य करशिल व तू एका नपुसकाचे जीवन जगशिल".

वैशंपायन पुढे सांगतात, उर्वशी अशा प्रकारे अर्जुनाला शाप देते, तिचे ओठ अजून संतापानें थरथरत होते, तिचे सगळे अंग कंप पावले होते, त्या क्रुद्ध अवस्थेत ती अप्सरा आपल्या घरी निघून जाते. तो शाप ऐकल्यवर अर्जुन ताबडतोब चित्रसेनाला भेटतो. त्याला भेटून जे घडले ते सगळे सांगतो. त्या शापाबद्दल पुनः पुन्हा विचारणा करतो. आता काय करावयाचे असे तो महाबली चित्रसेनाला विचारत रहातो. चित्रसेन त्याची कल्पना शक्राला देतो. जे घडले ते समजल्यावर तो हरीवहन त्याच्या मुलाला बोलावतो. त्याला जवळ घेऊन प्रेमांने त्याचे सांत्वन करतो. तो अर्जुनाला सांगतो, "अरे पृथापुत्रा, तुझ्याबद्दल मला फार मोठा अभिमान वाटतो. तू उर्वशीला जे नितीतत्त्व सांगितलेस ते आम्हा स्वर्गातील लोकांना नवीन आहे. परंतु, त्याचा मला गर्व वाटतो कीं, तू अप्सरेला दाखवून दिलेस कीं, वासनिक जीवन हेंच जीवन नसते. त्या पलिकडे सुद्धा जास्त उदात्त जीवनमुल्ये असतात ते तिला दाखवून तिचा गर्व उतरवला आहेस म्हणून, ती चिडली. सुखाचे इतर जास्त उदात्त व सात्त्विक मार्ग असतात ते तिला तू सांगितलेस ह्याचा मला आनंद वाटतो. तू नैतिकतेची नवीन मुल्ये प्रस्थापित करत आहेस. त्याप्रमाणे पुढील जमान्यात ही जास्त उदात्त नवीन मुल्ये सर्वत्र प्रचारात येतील". एवढे सांगितल्या नंतर अर्जुनाच्या पाठीवरून हात फिरवत तो देवांचा राजा त्याच्या मुलांस सांगतो, "तुला तिने नपुसक ठरवले कारण तुझे तिला ह्या कारणांने नाकारणे, ती मुळात समजलीच नाही. ती असें समजते कीं, तू तिला नाकारलेस कारण तू वस्तुतः नपुसक आहेस आणि म्हणून तिने असा शाप दिला. परंतु, त्याबद्दल तुला काळजी करण्याचे कारण नाही. जेव्हां तुम्हाला तेराव्या वर्षी अज्ञात वासात रहावे लागणार आहे तेव्हां हे तुझे नपुसकपण उपयोगी येणार आहे. तू एक वर्ष त्या अवस्थेत रहाणार असल्यामुळें अज्ञातवासात तुला रहाणे सोपे होणार आहे". शक्राचे ते स्पष्टीकरण ऐकल्यावर अर्जुनाला समाधान वाटले. अर्जुन इंद्राला आश्चर्यचकित होऊन विचारतो, "मला वाटत होते ह्या अप्सरा ज्ञानी असतात परंतु, उर्वशीच्या वर्तणूकीने ते सिद्ध होत नाही". इंद्र त्याला सांगतो, "अरे माझ्या लेकरा, ह्या अप्सरा केवळ वासनिक कामासाठी ब्रह्माने उत्पन्न केल्या आहेत त्यांना तू सांगितलेली इतर पवित्र नाती समजत नाहीत. त्या कधी चांगली आई अथवा बहीण होत नाहीत. तू त्या सगळ्या गोष्टींचा आता विचार करू नकोस. तुझ्या ह्या अवतार कार्यात त्या सगळ्या गोष्टींचा संबंध येत नाही". ते

ऐकल्यावर अर्जुनाला आठवते कीं, त्याच्या पणजीने, गंगाने तिची सात मुलं गंगेत फेकून दिली होती. त्यावरून तो शक्राला विचारतो तेव्हां तो हरीहवन त्याला सांगतो कीं, सगळ्या नद्या अप्सराच असतात. अप्सरा ह्या शब्दाचा अर्थ नदी असा सुद्धा होतो. त्यामुळें त्याचे समाधान झाले. ते नपुसकपण योग्यवेळी येणार असल्याने त्यांचे अज्ञातवासात रहाणे सोपे होणार आहे हे लक्षात आल्यामुळें त्याच्या मनावरील दडपण गेले व तो पूर्वीप्रमाणे चित्रसेनाबरोबर स्वर्गात आनंदात राहू लागला. माणसांची स्त्री–पुरुषांतील नाती कशी असावीत ह्या बद्दलचे अर्जुनाचे विचार ज्याना समजतात ते अधिक उच्च दर्जाचे नैतिक जीवन जगू शकतात, व ती परंपरा पुढे ऋषी, मुनी आणि अनेक सम्राटांनी स्वीकारली. अर्जुनाने एक प्रकारची नैतिक मुल्यांत क्रांति केली. सुखाकडे पहाण्याचा दृष्टीकोन बदलला. त्याचा परिणाम अर्जुनावरसुद्धा झाला व तोसुद्धा पापमुक्त आनंदमय जीवन स्वर्गात जगू शकला. शुक्ल ब्रह्मचर्य पालनासाठी ही नैतिक तत्त्वें फार उपयुक्त झाली.

अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा सहेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग सत्तेचाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व पुढे चालू)

वैशंपायन सांगतात, एके दिवशी एक श्रेष्ठ ऋषी, ज्यांचे नाव लोमस होते, त्यांच्या भटकंतीत इंद्राच्या घरी पोहोचतो. त्यांने देवांच्या राजाची भेट घ्यावयाची असते. इंद्राची भेट घेतल्यावर तो महामुनी शक्राला लवून वंदन करतो. तेथे लोमस ऋषी अर्जुनाला वसवाबरोबर त्याच्या गादीत बसलेले पाहतो. इंद्र त्या श्रेष्ठ कोटीच्या ऋषीला एका उच्च जागी असलेल्या आसनावर बसण्याची विनंती करतो. अर्जुनाला इंद्राच्या बरोबरीने त्याचाच आसानावर बसलेले पाहून तो विचार करू लागतो कीं. हा क्षत्रिय कुळातील इंद्राच्या जागी कसा बसला आहे. असें कोणते महान कार्य ह्या क्षत्रियांनी केले म्हणून त्याला असा बहुमान इंद्रांनी दिला, अशी कोणती वैराग्यपूर्ण तपश्चर्या ह्याने केली कीं तो त्या आसवनावर इंद्राने बसवला? अशारितीने तो ऋषी त्याच्या विचारात गर्क असतांना त्याची कल्पना शक्राला येते. ते समजल्यामुळे तो देवांचा राजा लोमसाला बोलतो, "अहो ऋषीवर्य तुमच्या शंकेचे मी निरसन करत आहे, हा येथे माझ्या बरोबर माझ्या गादीवर जो बसला आहे तो कोणी सामान्य माणूस नाही. तो माझ्यापासून झालेला कुंतीचा तिसरा पुत्र आहे. तो येथे आला आहे कारण त्याला कांहीं जबरदस्त आयुधं पाहिजेत ज्यांची त्याला भविष्यात गरज पडणार आहे. तुम्ही त्याला ओळखले नाही कां? हा प्राचीन काळी गेल्या युगातील एक श्रेष्ठ ऋषी आहे ज्याचे नांव नर होते. त्यांची जोडी होती. दुसरा त्याचा साथीदार नारायण होता. तोसुद्धा पुनः पृथ्वीवर कांहीं निश्चित उद्देश साध्य करण्यासाठी अवतरला आहे. हल्ली त्यांची वेगळी नांवं आहेत. ह्याला धनंजय म्हणतात व त्या नारायणाला हृषिकेश म्हणतात. त्याशिवाय इतर अनेक नांवाने ते सध्या ओळखले जात आहेत. तिन्ही जगात ते ख्यातनाम आहेत. जेथे मोठे मोठे ऋषी आणि दैवते जाऊ शकत नाहीत अशा बद्री, जे गंगेच्या तटी आहे, त्यांचे वस्तिस्थान होते, जेथे सिद्ध आणि चरण आपली ध्यान साधना करत असतात. ते दोघे माझ्या इच्छेने हल्ली माणसांत जन्म घेऊन कृष्ण आणि जिश्नु म्हणून आले आहेत. अहो ब्रह्मर्षी, पृथ्वीवरील पापाचा बोजा वाढलेला आहे. तो कमी करण्यासाठी ते अवतारले आहेत. त्याशिवाय कांहीं असुर आहेत ज्यांना निवटकवच म्हणतात ते त्यांना महादेवांनी दिलेल्या वराचा गैर फायदा घेत आहेत. ते

देवांना त्रास देण्याच्या परिस्थितीत आहेत. त्यांचा सुद्धा बंदोबस्त करावयाचा आहे, ते दानव त्या वराच्या शक्तिमुळें माजोर झाले आहेत, देवांना ते आवरत नाहीत. ते हल्ली मधल्या जगात (अदृष्य जग) रहातात. वरदस्त विष्णू, ज्याने मधूचा वध केला, जो पृथ्वीवर कपिल म्हणून ओळखला जातो, ज्याने केवळ दृष्टी टाकली म्हणून सगराचा मुलगा मेला, असे हे दोन आपल्याला पुष्कळ उपयोगाचे आहेत. पाप एवढे जास्त झाले आहे पृथ्वीवर कि, तिचे पोट बिघडले असावे असे तिच्यातून आवाज होत आहेत. ते वेळीच स्वच्छ करावे लागणार आहे. ते कार्य करण्यासाठी हे आले आहेत. खरे पहाता, कालिया नागाचा नाश करणारा दामोदर एकटा ह्या सगळ्या असुरांना व दानवांना भारी आहे परंतु, तो खूपच मोठी ताकद आहे, जर कांहीं चुक झाली तर त्याच्या अमर्याद शक्तीमुळें सगळे विश्व नष्ट होण्याचा धोका आहे म्हणून त्याला राखीव ठेवून आम्ही ह्या नराला ते काम करण्यासाठी पाठवणार आहोत. त्या कामात उपयोगी येणार्या आयुधांचा सराव करण्यासाठी हा नर अर्थात् अर्जुन येथे वस्तीला आहे माझ्याकडे. सगळ्या देवांना त्याचा परिचय व्हावा म्हणून तो ह्या सभेत माझ्याबरोबर माझ्या आसनावर मी बसवला आहे. येथील काम उरकल्यानंतर तो नर ऋषी माणसांच्या जगात जाईल". एवढे बोलल्यावर इंद्र लोमसाला विनंती करतात, की, त्यांनी पृथ्वीवर जाऊन पांडवांची भेट घ्यावी व त्यांना माझा निरोप द्यावा कीं, येथील कार्य उरकल्यावर त्यांचा भाऊ अर्जुन त्यांच्याकडे परत येणार आहे, तरी कांहीं काळजी करू नये. पृथ्वीवरच्या महायुद्धात भिष्म आणि द्रोण अशांना भिडण्यासाठी सुद्धा अर्जुनाला त्या आयुधांची गरज लागणार आहे. पुढे शक्र त्याला बोलतो, "तेथे जाऊन तुम्ही अहो लोमस, माझा निरोप युधिष्ठीराला द्या कीं, त्यांचा भाऊ स्वर्गात मजेत आहे व तो येथे सगळ्या आयुधांचा सराव करत आहे, त्याशिवाय तो नृत्य व संगीत अप्सरा व गंधर्वांकडे शिकत आहे. जे त्यांना त्यांच्या अज्ञातवासाच्या काळी उपयोगी येणार आहे. सध्या तो युधिष्ठीर आणि त्याची इतर तीन भावंड कम्यक वनात रहात आहेत. त्याशिवाय तुम्ही त्यांना सांगा कीं, त्या पांडवांनी पृथ्वीवरील विविध श्रेष्ठ तीर्थक्षेत्रांची यात्रा करावी. नद्यांत अभ्यागस्नानं करावीत. त्यामुळें त्यांचे पापक्षालन होईल. अशा गोष्टी केल्याने मनाला शांती मिळेल व भविष्यात येणार्या प्रसंगांना ते मोठ्या ताकदीने तोंड देऊ शकतील. पापक्षालन झाल्यामुळें ते त्याचे मिळणारे

राज्य सुखाने भोगू शकतील". एवढे सांगितल्यावर इंद्र त्या ऋषीला पुढे बोलतो, "अहो ऋषीवर्य तुम्हीसुद्धा त्या पांडवांवर कृपादृष्टी करावी. त्यांच्या वनवासातील श्रमपरिहार करणे त्यांना त्यामुळें सहज होईल. कारण ते ज्या जंगलात फिरत आहेत तेथे भयंकर राक्षस सुद्धा वावरत आहेत. त्या नरभक्षकांपासून तुम्ही त्यांचे संरक्षण करावे".

इंद्राचे बोलणे संपल्यावर अर्जुन त्या ऋषीस विनंती करतो, "अहो सर्वज्ञानी, आम्हा पंडुच्या मुलांचे आपण संरक्षण करावे. तुमच्या संरक्षणाखाली ते तीर्थयात्रा करतील व ब्राह्मणांना मोठी मोठी दानं करतील".

वैशंपायन पुढे सांगत असतात, लोमस ते त्या दोघांचे ऐकल्यावर "तथास्तु", असें आशिर्वादात्मक उच्चारतात. त्यानंतर तो ऋषी त्याच्या भटकंतीसाठी कम्यक वनाकडे निघतो. तेथे आल्यावर तो युधिष्ठीराला पहातो, त्याच्या भोवती अनेक ब्राह्मण बसलेले होते. त्याबरोबर त्याचे इतर तीन बंधू सुद्धा तेथे होते.

अशारीतीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा सत्तेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग अठ्ठेचाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व पुढे चालू)

ते ऐकल्यावर जनमेजय राजा विचारतो, "पृथाच्या मुलांच्या त्या सगळ्या गोष्टी खरोखरच विलक्षण आहेत. परंतु, अहो ब्राह्मण, मला सांगा, जेव्हां धृतराष्ट्राला त्याबद्दल कळले तेव्हां त्याची काय प्रतिक्रिया झाली"?

वैशंपायन त्याला सांगतात, अंबिकेच्या मुलांने जेव्हां कृष्ण द्वैपायनांकडून हे ऐकले कीं, अर्जुन स्वर्गात इंद्राच्याकडे त्याचा पाहुणचार सन्मानपूर्वक घेत आहे तेव्हां, तो संजयाला बोलतो, "अरे माझ्या रथाच्या चालका, संजया, तुला अर्जुनाच्या करामतीची कांहीं माहीती जी मला सांगण्यात आली आहे, ती तुला माहीत आहे कां? माझा नालायक मुलगा आणखीन कोणत्या दुष्कृत्यात गुंतला आहे, त्याच्या अशा कारवायांमुळें सगळी पृथ्वी निर्मनुष्य होईल अशी मला भिती वाटते. ज्ञानी माणसें अगदी गमतीतसुद्धा जे बोलतात त्यात तथ्यांश असतो. ज्याच्यासाठी धनंजय लढत आहे तो पृथ्वी जिंकणार हे वेगळे सांगावयाला नको. ज्याला मरणाची भिती नाही असेसुद्धा (हा भिष्माचा उल्लेख आहे) त्याच्या काटेरी विषारी बाणांपुढे टिकाव धरू शकणार नाहीत हे माझ्या नीच मुलांना समजत नाही. तो त्या धूर्त कावेबाज सुवलाच्या मुलाच्या नांदी लागला आहे. जे कोणी त्या अजिंक्य पांडवांशी दोन हात करतील ते सगळे बरबाद होणार आहेत. दिवसेंदिवस मी समजतो किं, एकही असा योद्धा नाही जो पांडवांशी लढू शकेल. जर भिष्म, द्रोण आणि कृप एकत्र येऊन त्याच्यापुढे लढण्यासाठी गेले तर फक्त प्रळय संभवतो. कांहींही हाताशी रहाणार नाही. म्हणून मला कोठेही अशा युद्धात यश मिळेल असें वाटत नाही. कर्ण दयाळू आहे व विसरभोळासुद्धा, द्रोण आता वृद्ध झाले आहेत, त्यात अर्जुन लढाईत गुरू मित्र पहात नाही. तो त्यांच्यावर हल्ला करील कारण स्वतः द्रोणांनीच तशी शिकवण दिलेली आहे. ते सगळे अजिंक्य असल्यामुळें त्यांच्यात जी लढाई होईल ती महाभयंकर विनाशकारी असेल. जेव्हां अशी लढत होते तेव्हां जो मेला तो हरला व जो वाचला तो जिंकला असाच परिपाठ आहे. ह्याचा अर्थ सर्वनाश कौरवांचा निश्चित होणार असें विधीलिखीत आहे असें वाटते. परंतु, अर्जुनाचा व इतर पांडवांचा मृत्यू होणार नाही कारण, तसा वर कुंतीला साक्षात व्यासांनी दिला आहे . म्हणजे काय ते तू समजतोस नां".

"मला सांग संजया, तुला काय वाटते ह्यात कीं, त्या पांडवांचा राग कसा कमी करता येईल? त्या अर्जुनाने खांडववनात अग्नीदेवतेला संतुष्ट केले त्याशिवाच राजसूय यज्ञाच्या निमित्ताने त्याने जगातील सगळ्या योद्ध्यांचा पराजय केला होता, अशांच्यापुढे कोण टिकाव धरणार? तुला माहीत आहे कां, वीज पर्वतावर कोसळली तर त्या पर्वताचा थोडा भाग जळून जातो पण जेव्हां अर्जुन त्याचे अस्त्र फेकतो तेव्हां कांहींच शिल्लक रहात नाही. त्याच्या बाणामुळें माझी मुलं करपून जाणार आहेत हे मी समजू शकतो व त्या विचारांनी माझे हृदय धडधडत आहे. मला असें वाटते, कौरवाची सेना अर्जुनाच्या रथाच्या गडगडाटाने आधीच मारून पडली आहे. विधात्रीने अर्जुनाला जन्माला घातलं आहे ते सगळ्याना नष्ट करण्यासाठीच. त्याच्या बाणांपुढे कोणाचा टिकाव लागणार आहे"?
अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा अठ्ठेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकोणचाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व पुढे चालू)

ते धृतराष्ट्राचे हताश होऊन काढलेले उद्‌गार ऐकल्यावर सारथी संजय त्या राजाला बोलतो, "आपण जे आपल्या पुत्राबद्दल बोललात ते मला पटते. आपण आता जे कांहीं बोलला अहात ते सगळे मला वाटते खरे होणार. जेव्हां त्यांच्या बायकोची भर सभेत विनाकारण अवहेलना झाली, तेव्हां पासून ते कौरवांच्यावर राग धरून आहेत व ते सहाजिकच आहे. कां त्यांनी त्या निरपराध कुलीन स्त्रीची विटंबना केली? त्या दुःशासनाचे व कर्णाचे अपमानकारक बोलणे त्या आगीत तेल ओतण्या सारखे होते. मला वाटते ते महाबली पांडव कौरवांना कधीच माफ करणार नाहीत. अहो धनी मी ऐकतो किं, अर्जुनाने देवांना बांधून घेतले आहे व देवादिदेव स्थानूची त्यावर कृपा झाली आहे. साक्षात कपार्डीन (महादेव) अर्जुनाची परीक्षा घेत होते व त्यात पार्थ त्याच्या मर्जीत उतरला आहे. असें सांगतात, महादेव किराटाच्या रुपात पार्थाशी लढतात व त्यात पार्थ जरी हरला तरी त्यांने जी झुंज दिली त्यामुळें ते त्याच्यावर प्रसंन्न झाले व त्याला अशी आयुधं दिली आहेत कीं, त्यांच्या मदतीने तो भिष्म आणि द्रोण ह्यांनासुद्धा हरवू शकेल. त्याला सर्व लोकपालांनी त्यांची खास शस्त्रात्र दिली आहेत व सध्या तो त्यांचा सराव प्रत्यक्ष स्वर्गात राहून करत आहे. तो इंद्राच्या घरात त्याचा खास पाहुणा म्हणून रहात आहे. हे सगळे ज्याला शक्य होत आहे त्याच्याशी लढणे म्हणजे निश्चित पराजय व मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे. अशा पांडवांच्या पत्नीला अपमानीत करून तुमच्या मुलांनी आपला भयंकर मृत्यू ओढवून घेतला आहे. मला नाही वाटत त्यातून तुमची सुटका होईल. तुमचा मुलगा द्रौपदीला त्याची मांडी दाखवतो हे कोणत्याही कुलिन क्षत्रियाचे लक्षण नाही. त्यानंतर भिमांने त्याला ठार मारण्याचे व त्याची मांडी फोडण्याचे आव्हान दिले आहे, हे सगळे कशाचे लक्षण समजावयाचे"? "असें सांगतात कीं, ते स्वतः देवांचे अंशावतार आहेत. त्यांना साधारण माणसासारखा मृत्यू येणार नाही. सगळे पांडव अग्रगण्य लढवय्ये आहेत. त्यांच्या सामर्थ्याची तुलना कोणाच्याही कुवतीशी करता येणार नाही. त्यांचे युद्धकलेतील ज्ञान अतुलनीय आहे. ते देवांना सुद्धा हरणार नाहीत मग तुमचे कौरव काय त्यांच्याशी लढणार? पांडवांनी जाहिर केले आहे किं, ते तुमची सगळी मुलं ठार मारणार आहेत". ते

संजयाचे ऐकल्यावर धृतराष्ट्र त्याला विचारतो, "ती चुक कर्णाने केली होती, त्यात कृष्णाला सभेत बोलावण्याचे काय कारण होते, मी पंडुच्या मुलांचा द्वेष करत नाही. माझी मुलं व त्यांचे मित्र वाम मार्गाने जात आहेत. त्यांना कोण कसे वाचवणार? मला दिसत नाही त्यामुळें मी म्हणावा तसा हस्तक्षेप करू शकत नाही. मी, तू पहातोस कीं, माझ्या मुलांवर अवलंबून असतो. त्यामुळें माझी मुलं नेमके काय करत असतात ते मला समजावयाला नेहमीच उशीर होतो व त्या आधीच बरेच कांही होऊन गेलेले असते. त्यामुळें माझी परिस्थिती एकाद्या मूर्खासारखी होत असते. त्याचे सगळे मदतनीस, सल्लागार सगळे एकजात नीच प्रवृत्तीचे आहेत. माझ्यापुढे ते सगळे गोड बोलतात व मागे मला शिव्यासुद्धा देतात. मी जाणून आहे किं, मी माझ्या मुलांपेक्षा पंडुच्या मुलांबरोबर जास्त सुरक्षित असेन पण पुनः माझा मोह माझ्या पुत्राबद्दलचा मला त्यांच्याकडे खेचून नेत असतो. माझ्या दुर्दैवाला तोड नाही. सुयोधनाने त्याच्या भोवती खुषमस्करे जमवले आहेत जे त्याला खूष करण्यासाठी त्याच्या चुकीच्या गोष्टींना साथ देत असतात. त्याला कोणीही खरा हितकारक सल्ला देत नाही. म्हणून माझा मुलगा आणखीन जास्त खोल रुतात आहे त्याच्या चुकांच्या समुद्रात. मला माहीत आहे, अर्जुनाचे बाण माझ्या सगळ्या पुत्रांचा एक दिवस वध करणार आहेत, पण मी ते कसे थांबवणार ते समजत नाही. वर्षे झपाट्याने उलटत आहेत. तेरावे वर्ष कधीही समोर येईल. अर्जुनाचे मंत्रसामर्थ्य अतुलनीय आहे. तो देवांनासुद्धा अडकवू शकतो. त्यांचा सल्लागार व मदतनीस आहे साक्षात भगवान श्री कृष्ण! त्यामुळें तेथे पुण्यप्रभाव आहे तर येथे फक्त पापप्रभाव आहे". त्यानंतर तो अंध राजा संजयाला बोलतो, "अरे संजया, हे खरे आहे कां कीं, त्याला महादेवांनी स्वतः मिठी मारली"? "त्याशिवाय अग्नीचा त्याचा सलोखा पहाता, जेव्हां ते सगळे, भिम, पार्थ, वासुदेव आणि ते दोघे अश्विनीकुमार लढावयाला निघतील तेव्हां त्यांच्यापुढे माझी मुलं फार काळ टिकणार नाहीत हेंच खरे".

अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा एकोणचाळीसावा भाग संपला.

## वनपर्व भाग चाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व पुढे चालू)

ते ऐकल्यावर राजा जनमेजय विचारतो, "पंडुच्या मुलांना अन्यायकारकपणे वनवासात पाठवल्यानंतर असें चिंता करणे निरर्थक होते. अहो मुनी, मला वाटते त्याचे दुःख करणे पांडवांसाठी नव्हते तर त्याच्या मुलांच्या होणार्या निश्चित नाशाबद्दलचे होते, बरोबर म्हणतोय नां मी"? त्यानंतर तो राजा वैशंपायन ऋषींना विचारतो, "अहो मुनी मला सांगा, तेथे वनवासात माझे पूर्वज काय आहार करत असतं"? "ते जंगलात उगवणारे खात होते जसें ऋषी मुनी खातात कां, ते त्यांचे अन्न शेतात पिकवत होते"?

वैशंपायन सांगतात, तुझे पणजोबा जंगलात उगवणारे फळ, कंदमुळं आणि शिकार करून प्राण्यांचे मांस खात होते. प्रथम ते शिकार केलेले प्राण्याचे मांस ब्राह्मणांना दान करत व नंतर स्वतःसाठी घेत असत. ते वनवासात असताना सुद्धा मोठ्या संख्येने दोन प्रकारचे ब्राह्मण त्यांच्या सोबतीला असतं. एक अंग्निहोत्री व दुसरे भिक्षा मागून उपजिवीका करणारे. त्याशिवाय युधिष्ठीर दहा हजार स्नातकांना आधार देत असें. ते सगळे स्नातक मोक्ष साधनेत असत. पांडव काळ्या काळवीट आणि हरण ह्यांची शिकार करून त्यांचे मांस त्या ब्राह्मणांना शिधा म्हणून देत असतं. त्यांना भरपूर खावयास मिळत असे त्यामुळें ते सगळे ब्राह्मण व स्नातक उत्तम पोसलेले दिसत होते, कोणीही भुकेला वाटत नव्हता. भरपूर खाणे पिणे असल्याने ते सगळे युधिष्ठीरा बरोबर आनंदी दिसत होते. युधिष्ठीर त्याच्या भावांची काळजी अशाप्रकारे घेत असे जणू काय ते त्याची मुलं आहेत. इतर आप्तांना तो सख्ख्या भावांसारखे वागवत असें. द्रौपदी त्या सगळ्या मंडळींशी ज्यात युधिष्ठीर सुद्धा होते, अशी वागत असें किं ती त्यांची माता आहे. त्या प्रमाणे ती सगळ्यांची जेवणे झाली हे पाहून नंतर स्वतः जेवावयाला बसत असें. राजा स्वता पूर्वेकडे, भिम दक्षिणेकडे, नकुल उत्तरेकडे व सहदेव पश्चिमेकडे शिकारी साठी जात असत. शिकार करतांना ते वृद्ध जनावर ज्याचे जीवन पूर्ण झाले आहे असा बहुधा पहात व त्यांचीच शिकार करत, तरुण जनावरं ज्यांनी त्याचे जीवन नुकतेच सुरु केले आहे तसेंच गाभण, लहान अशांना मारत नसतं. अशारितीने ते पांडव पांच वर्षे त्या वनात ज्याचे नांव कम्यक होते, तेथे राहिले. त्यांना सरते शेवटी, विशेष करून द्रौपदीला अर्जुनाची फार आठवण येऊ लागली होती.

शिकारीचा समय सोडता इतर काळ ते अभ्यास व शस्त्रविद्या सराव ह्यात घालवत असतं.
त्याशिवाय यज्ञ व इतर प्रकारच्या पुजा ते नित्यनेमांनी करत असतं.
अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा चाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकेचाळीसावा

## (इंद्रलोकागमन पर्व संपले)

वैशंपायन सांगतात, धृतराष्ट्राला पांडवांची इतंभूत माहीती त्याच्या हेरांकडून येत असें. जसे त्याला समजले किं, पांडव पुढील लढाईची तयारी करत आहेत व त्यात अर्जुनाची प्रगती समजत गेल्यामुळें त्याची विवंचना दिवसेंदिवस वाढत होती. प्रथम त्यांना वाटले होते किं, अशा धक्क्याने ते खचून जातील परंतु, प्रत्यक्ष जे होत होते ते त्याच्यापेक्षा विपरीत होते. अशा परिस्थितीत तो सम्राट धृतराष्ट्र, कष्टी मनाने त्याचा सारथी जो त्याचा सर्व वेळेसाठी सोबतीसुद्धा होता, त्याला विचारतो, "अरे माझ्या सारथ्या, तू जे मला सांगितले आहेस व जे मला दुसरीकडून समजत आहे त्यामुळे माझी झोप क्षणभरसुद्धा होत नाही. मी सतत बेचैन असतो. दिवस असो अगर रात्र असो, मला आराम मिळत नाही. सतत मी माझ्या मुलांच्या भवितव्यासाठी चिंतीत असतो. एका बाजूला मी असहय्य आहे कारण मी माझ्या मुलांच्या दुष्ट कारवाया थांबवू शकत नाही व दुसर्या बाजूला पंडुच्या मुलांची प्रगती ऐकून माझे कान किटून गेले आहेत. माझी मुलं द्युतासाख्या खोट्या साधनाच्या मस्तीत वावरत आहेत आणि त्याच्या थिट्या शौर्याच्या गप्पा मारत आहेत. पांडवांच्या गरुड झेपा समजून घेण्यात ते कमी पडत आहेत. धैर्य, मर्यादा, बुद्धीमत्ता, धाडस, दूरदृष्टी ह्यात पांडवाच्या पुढे ते यत्किंचित आहेत हे अजून त्यांच्या लक्षात आलेले नाही. पांडवांतील मोठे सोडून जे लहान दोघे आहेत, नकुल व सहदेव जे अश्विनीकुमाराचे अंशावतार आहेत त्यांच्या पुढेसुद्धा माझी मुलं जास्त काळ टिकाव धरू शकणार नाहीत. शस्त्रांचे त्यांचे ज्ञान माझ्या मुलांपेक्षा कितीतरी जास्त आहे. जर युद्ध झाले तर ते दोघे कौरवांच्या सेनेचा फडशा पाडतील. त्यांच्या पत्नीचा जो अपमान झाला आहे त्याच्या बदल्यात ते असें लढतील किं, माझे सैन्य त्याच्या मारा पुढे फार काळ तग धरू शकणार नाही. त्यांच्या बरोबर वृश्नी, पांचाल, अंधक, भोज असें त्यांच्या बाजूचे लढवय्ये येणार आहेत ते सगळें द्रौपदीच्या अपमानाचा जाब आपल्याला विचारणार आहेत त्या लढाईत, परंतु, माझ्या मुलांनी त्याची फिकीर दिसत नाही, ते त्यांना मिळालेल्या एवढ्या मोठ्या राज्याचा मजेत भोग घेण्यात गुंतलेले आहेत. त्यामुळें जेव्हां युद्ध होईल तेव्हां माझ्या लोकांना ते पांडव उभे चिरून काढतील ह्याचा साधारणसुद्धा अदाज माझ्या मुलांना नाही

ह्याचे मला दुःख होत आहे. त्या युद्धात कृष्णा बरोबर त्याचा बलाढ्य भाऊ बलराम जर सामील झाला तर आणखीनच संहार होईल माझ्या सैन्याचा. भिमाची ती लोखंडी गदा कशी फिरत असेल त्याच्या नुसत्या कल्पनेने माझ्या हृदयाचे ठोके थांबतात. त्याशिवाय अर्जुनाच्या गांडीवाचा टणत्कार मला जाणवतो, त्यामुळें माझा थरकाप होत आहे, अरे संजया, तू ऐकतोस नां कारण, मी तुझ्याशी बोलत आहे. मी दुर्योधनाच्या प्रत्येक गोष्टीला मान्य करत गेलो त्याचा मला आता पश्चात्ताप होत आहे. कधी वाटते कीं, मी दिलेले आदेश काढून टाकावेत व पांडवांना सन्मानपूर्वकपणे बोलावून त्याचे त्यांना देऊन टाकावे व हा संहार थांबवावा". संजय बोलतो, "तो आपला सर्वात मोठा दोष आहे. अहो राजे, आपल्या अधिकाराचा वापर करून ते फार पूर्वीच आपण दुरुस्त करू शकला असता पण पुत्रप्रेमामुळें ते झाले नाही. माझ्या माहिती प्रमाणे, कृष्णाला जेव्हां समजले कीं, त्यांना खोट्या द्युतात फसवून आपण वनवासात पाठवले आहे तेव्हां तो कम्यक वनात पांडवाना भेटण्यासाठी गेला होता व त्यानी पांडवाना भविष्यात काय होणार ह्याची कल्पना दिली आहे. त्याच्या प्रमाणे द्रौपदीचा भाऊ दृष्टद्युम्न सुद्धा त्यांना भेटण्यास गेला होता. तेथे त्यांनी द्रोणांना ठार मारण्याची प्रतिज्ञा घेतली जिची चर्चा आधीच झाली आहे. त्याशिवाय विराट, दृष्टकेतु, ते महान योद्धे केकय, असें बरेच बलाढ्य राजे पांडवांना कम्यक वनात भेटणायासाठी गेले होते व तेथे मोठे खलबत झाले आहे पुढच्या तयारीच्या दृष्टीने. तेथे ज्या कांहीं गोष्टी ठरल्या त्यात कृष्ण अर्जुनाचा सारथी होणार असें ठरले आहे. कृष्णाने जेव्हां पांडवांना त्या हरणाच्या कातड्याचे वस्त्र नेसलेले पाहिले तेव्हांच तो कौरवांचा नाश करण्याच्या गोष्टी करू लागला होता. तो युधिष्ठीराला बोलत होता, जी समृद्धी त्याने पांडवांची राजसूय यज्ञाच्या वेळी पाहिली त्याची तुलना कशाचीही करता येणार नाही. तो पुढे सांगत होता, त्याने निरनिराळ्या देशांतील राजे तेथे पाहिले होते, त्यात वंग, अंग, पौंड्र, उद्रास (ओरीसा), चोल, द्रविड, अंधक, असें विविध देशांतील होते, त्याशिवाय अनेक बेटांचे राजेसुद्धा आले होते, कांहीं सीमा प्रदेशातील होते, त्यात सिंहल, रानटी बर्बर, म्लेच्छ, लंकेश, आणि अति पश्चिमेकडील होते. त्यात पल्हव, दर्दर, किराट, यवन, शक, हरहूण, चिनी, तूर्क, सिंधव, जगुदास, रामथी, मद्र, कांहीं बायांची राज्ये होती त्यात तंगनी, केकयी, मलव, कश्मिरी, असें सगळे पांडवाच्या सामर्थ्यापुढे झुकून उभे होते.

यज्ञाच्या कामात ते सगळे सेवकाची भूमिका बजावत होते. पुढे कृष्ण युधिष्ठीराला सांगत होता किं, तो पांडवांचे गेलेले वैभव त्यांना पुन्हा मिळवून देण्यास वचनबद्ध आहे. त्यांच्या बाजूने बलरामा शिवाय अक्रूर, गद, शम्व, प्रद्युम्न, अहुक, दृष्यद्युम्न, शिशुपालाचा पुत्र, जरासंधाचा पुत्र, पांडवांच्या कडे आहेत. संजय बोलतो जर युद्ध सुरु झाले तर एका दिवसांत तुमचे मुलगे ते मारून टाकतील. अशी परिस्थिती सकृत्दर्शनी दिसत आहे. तुमचे दुर्योधन, कर्ण, शकुनी, दुःशासन किती काळ त्यांच्याशी लढू शकतील ते सांगता येणार नाही. अशी लढाई जास्त काळ चालेल असें मला वाटत नाही कारण, जेव्हां दोनही पक्ष तुल्यबळ असतात तेव्हां युद्ध जास्त काळ होत रहाते व जेव्हां एक पक्ष खूप जास्त बलवान असतो तेव्हां ते लवकर आटोपते. विशेष करून ज्या प्रकारची विध्वंसक अस्त्रे आणि शस्त्रे मंत्र विद्या वापरून होणारे युद्ध भीषण असते व त्यामुळें होणारा विध्वंस सुद्धा तसांच असतो हे आपण जाणता अहात. त्यामध्ये कोणी कोणाचा वध करावयाचा तेसुद्धा तेथे ठरले आहे. अर्जुन कर्णाचा वध करणार, दृष्यद्युम्न द्रोणाचार्यांचा, भिम दुर्योधनाचा, नकुल व सहदेव सगळ्या इतर कौरवांचा वध करण्याचेसुद्धा ठरवले गेले आहे. संजय धृतराष्ट्राला सांगत होता. पुढे तो सांगतो, अहो राजे, मुद्दा द्युताचा आता राहिलेले नाही कारण आता जास्त महत्वाचा मुद्दा पांडवांसाठी आहे तो द्रौपदीच्या विटंबनेचा. जर युद्ध झाले व ते होणारच, ते द्रौपदीच्या विटंबनेचा सूड घेण्यासाठी होणार आहे त्यामुळें जरी तुम्ही पांडवांना त्यांचे राज्य आत्ता परत केलेत तरी ते त्यानी शांत होणार नाहीत. द्युताचा मुद्दा आता कमी महत्वाचा झाला आहे व त्यामुळें तुम्ही त्यात समझौता कसा करणार हे मला समजत नाही. रणांगणावर त्या कौरवांची शवं कोल्हे लाडगे गिधाडं खातील अशी भाषा तेथे होत आहे. अशारितीने कौरवांबद्दल पांडवांच्या व त्याहून ही जास्त कृष्णाच्या भावना आहेत. अहो महाराज आपण समजता कां काय परिस्थिती कोठल्या थराला गेली आहे. आणि त्यात कौरवांच्या फालतु वल्गना भर घालत आहेत. म्हणून ते तेरावे वर्ष कधी संपते व युद्धाची सुरुवात होते त्याची ते पांडव आणि त्यांचे मित्र वाट पहात आहेत. विविध मित्र देशांचे राजे त्यांच्या बाजूने लढण्यासाठी जय्यत तयारी करत आहेत, त्या मानाने कौरवांच्या आघाडीवर फक्त मदिरा, मदनी, द्युत व इतर तशाच गोष्टींत सगळे रमलेले दिसत आहेत. त्या कम्यक वनात जमलेले ते क्षत्रिय संतापलेल्या सिंहासारखे वाटत होते.

असें सांगतात ज्याने ती सभा पाहिली आहे. ते ऐकून धृतराष्ट्र बोलतो, "मला आता आठवते, माझा भाऊ विदूर त्यावेळी जे बोलत होता. तो सांगत होता ह्या खेळामुळें फक्त सर्वनाश होणार आहे व मी माझ्या समोर तो हातांना अनुभवणार आहे. आता ते सगळे खरे होणार असें दिसते. मला विदूर सांगत होता किं, तेरा वर्षानंतर एक भयंकर विध्वसक सर्वनाशक युद्ध होणार आहे".

अशारितीने वनपर्वातील इंद्रलोकागमन पर्वाचा एकेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग बेचाळीसावा

## (नलोपाख्यान पर्व सुरु)

जनमेजय विचारतो, जेव्हां अर्जुन इंद्राकडे गेला विविध आयुधं मिळवण्यासाठी व त्यांचे तंत्र शिकण्यासाठी येथे युधिष्ठीर व इतर पांडव आणि कृष्णा काय करत होते?

वैशंपायन सांगू लागतात, पवित्र आत्मा असलेला अर्जुन इंद्राकडे गेला होता त्या दरम्यान इतर पांडव व त्याची पत्नी द्रौपदी कम्यक वनात रहात होते. एके दिवशी आपल्या दुःखात चूर असें ते पांच जण एका विस्तीर्ण कुरणात बसले होते. धनंजयाच्या आठवणीने ते जास्त बेचैन झालेले होते कारण त्याचे काय झाले आहे व तो कसा आहे त्याची त्या पांच जणांना अजिबात कल्पना येत नव्हती. त्यांचे आवाज अस्पष्ट झाले होते. गळा भरून आला होता. धनंजयाची गैरहजेरी त्यांना खात होती. महाबली भिम युधिष्ठीराला बोलला,

"आपण सगळे धनंजयावर फार विसंबून आहोत, त्याशिवाय आपली मुलंसुद्धा त्याच्यावरच भरवसा ठेऊन आहेत. त्याच्या शिवाय सत्यकी आणि वासुदेवसुद्धा राहू शकणार नाहीत. तुझ्या आज्ञेने तो गेला आहे. नाहीतर आम्ही त्या कौरवांचा समूळ नाश करून टाकला असता. तू कां त्या कौरवांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेस हेंच मला समजत नाही. मी त्यांचा सर्वनाश त्या सभेतच करणार होतो, जर ते केले असते तर हि वेळच आपल्यावर आली नसती. आपण फार शक्तिमान आहोत व आपल्या बरोबर जनार्दन आहे आणखीन काय पाहिजे. तरीसुद्धा आपण आपला क्रोध काबूत ठेवला पाहिजे हे सुद्धा योग्य आहे नाहीतर रागाच्या भरात आपण एकाद्या निरपराध प्राण्याला इजा पोहोचू शकतो. परंतु, तुझ्या मूर्खपणामुळे पुनः पुन्हा माझा क्रोध अनावर होत असतो. तसें केले असते तर आपण एव्हाना पुन्हा आपल्या राज्यात असतो पण तुझ्यामुळें ते करू शकत नाही. तू मात्र त्या ब्राह्मणांच्या गराड्यात बसून आराम करत आहेस. हि आपली अवस्था असतांना ते कौरव मात्र दिवसेंदिवस जास्त बलवान होत आहेत. त्यांना वेगवेगळे राजे आणि व्यापारी मोठमोठ्या देणग्या देत आहेत, विविध राजांशी ते करार मदार करत आहेत, आणि त्याद्वारा त्यांची राजकीय शक्ती वाढवत आहेत. तू येथे फालतु तत्वज्ञानाच्या गप्पा मारण्यात वेळ व्यर्थ घालवत आहेस. तुला अक्कल आहे कां माझ्या राजा, अरे, क्षत्रिय रानावनात रहात नाहीत असें. त्यांचे कार्य रणांगणात असते. आपण ब्राह्मण आहोत कां,

असें आपला वेळ व्यर्थ घालवायला. तुझ्यामुळें आम्ही सर्व आमच्या क्षत्रिय बाण्यापासून दूर जात आहोत. मी तुला सांगतो, त्वरित तू आज्ञा काढून पार्थाला बोलावून आण आणि आपण लढाईच्या तयारीला सुरुवात करू. तेथे जनार्दन केव्हांही आपल्याबरोबर येण्यास तयार आहे परंतु, तुझ्या भेकडपणामुळे तोसुद्धा गप्प बसला आहे. त्यानंतर भिम त्याची योजना युधिष्ठीराला सांगतो, "ऐक मी काय सांगतो ते माझ्या भावा, बारा वर्षे पूर्ण होण्या आधी मी धृतराष्ट्राच्या सैन्याचा बंदोबस्त करतो, तुझ्या वचनाचा माझ्यावर कांहीं परिणाम नाही कारण मी बंडखोरी केली असें पसरवू. माझ्या बंडखोरीला तुझ्या शब्दाचे बंधन नसल्यामुळें तू त्या कारवाई पासून नामानिराळा रहाशिल. सगळे खतम केले किं तू वनातून बाहेर यावयाचे आणि त्यानंतर आपल्यात सलोखा झाल्याचे दाखवून आपण पुन्हा एकत्र यावयाचे अशी माझी योजना आहे, मुख्य म्हणजे त्याला आपल्या द्रौपदीची परवानगी आहे! ह्या योजनेत तुझा कांहीं कार्यभाग नसल्याने तू निर्दोष रहाशिल जे तुला नेहमी हवे असते, मला दोष लागला तर मला त्याची पर्वा नाही कारण खर्या क्षत्रिय धर्माप्रमाणे (येथे धर्म हा शब्द स्वभाव ह्या अर्थी आहे) हे सगळे वैध समजले जाते. कारण, जिंकणे हांच क्षत्रियाचा मुख्य धर्म असतो, त्यात इतर नैतिकतेच्या गोष्टी गौण समजल्या जातात. जर तुम्ही जिंकत नसाल तर ते क्षत्रियांसाठी निरर्थक समजले जाते. मला तुझ्यासारखे स्वर्गाचे स्वप्न पहाण्याची गरज नाही मी पृथ्वीवर यशस्वी झालो म्हणजे माझ्यासाठी ते पुरेसे आहे. त्याशिवाय विविध यज्ञ करून, जर कांहीं पाप झाले असे तुझे ब्राह्मण सांगत असतील तर, त्याचे निराकरण होईल. माझ्यामते त्या योजनेत आम्ही तिघे पुरेसे आहोत, धनंजय नसला तरी कांही बिघडत नाही. तो त्याची विद्या घेऊन आल्यावर आपण आणखीन मोठे राज्य त्या आयुधांच्या मदतीने मिळवू. राजसूय यज्ञ केला आहे तसे आणखीन कांहीं यज्ञ करू त्यात तूंच यजमान हो म्हणजे तुझे समाधान होईल. सर्वच राजे जे करतात तेंच मी सुचवत आहे, त्याला तू विरोध करू नकोस. क्षत्रिय धर्म सांगतो चोराशी चोर, सज्जनाशी सज्जन असें धोरण ठेवावे असें आहे, त्याप्रमाणे माझा सुझाव योग्य आहे. त्याला पाप समजत नाहीत. ह्यात तू कोठेही नसल्याने तुला पाप लागत नाही. मग तुला माझा सुझाव स्वीकारायला हरकत नसली पाहिजे. वेदांत सांगितले आहे किं, जर घोर तपश्चर्या करत असेल तर एक दिवस एका वर्षा इतका समजला पाहिजे, म्हणजे तसे

वैध आहे. आतापर्यंत जो काळ आपण वनात घालवला आहे तो त्याप्रमाणे पाहिले तर तेरा वर्षे आपण केव्हांच पूर्ण केली आहेत. तू वेदांना फार मानतोस म्हणून तुझ्यासाठी हा युक्तीवाद पुरेसा आहे. मला वेदांची गरज नाही, ज्याच्याकडे सामर्थ्य आहे त्याला अशा कोणत्याही गोष्टी लागत नाहीत, शक्तीपुढे सगळे कांहीं वैध ठरत असते. म्हणून हींच वेळ आहे त्या बदमाष दुर्योधनाला खतम करण्यासाठी. वेळीच मी सांगतो तशी कारवाई केली नाही तर तो कांहीं काळांनी आणखीन शक्तिमान होईल व त्याला नष्ट करणे जास्त अवघड होऊ शकते. कारण सगळी पृथ्वी त्याच्या ताब्यात गेल्यावर तेवढे जास्त काम आपल्याला करावे लागेल म्हणून जितक्या लवकर आपण दुर्योधनाला नष्ट करू तेवढे चांगले असे माझे मत आहे. हे सगळे तुझ्या द्युत खेळण्याच्या व्यसनामुळें झाले आहे हे मला पुनः पुनः सांगावेसे वाटते, खरे तर तुझे हात त्याचवेळी मी झाळून टाकले असते तर बरे झाले असते, मला कदाचित त्याचे पाप लागले तर कांहीं यज्ञ करून त्याचे प्रायश्चित्त घेतले असते. तुझ्यामुळें आपण नष्टप्राय झालेलो आहेत. एक वर्ष अज्ञात वासाची अट तू कां मान्य केलीस त्यामुळें आपले काम आणखीन कठीण झाले आहे. मला समजत नाही असे राज्य जेथे त्या नीच दुर्योधनाचे हेर नाहीत. आपण असें नाही किं. सहजपणे कोठे लपू शकू. जर सापडले तर तुझ्या त्या अक्कलशून्यपणामुळें आपण पुन्हा वनवासात फेकले जाऊ. ह्यात कांहीं अर्थ उरत नाही. मला वाटत नाही, तुझ्या इतका मूर्ख राजा कधी आधी कोठे झाला असेल! तुला द्युत खेळता येत नसतांना तू कां त्या पापकारक खेळात एवढे लक्ष घालावेस तेसुद्धा मला समजत नाही. जे जमत नाही त्याची शोक धरणे हे मुर्खपणाचेच लक्षण नाहींकां"? "सगळेंच तू अवघड करून ठेवले आहेस. तू वेदांना मानतोस तेव्हां त्या वेदात जे सांगितले आहे त्या प्रमाणे तू वागायला पाहिजेस. वेदांत सांगितले आहे कीं, द्युत, नशा आणि नारी ह्या तीन गोष्टी क्षत्रियांना नाशाकडे नेतात व म्हणून उच्चकुलिन क्षत्रिय ह्या तीन गोष्टींपासून दूर राहिल. पुढे वेद सांगतात, द्युत, नशा व नारी ही भ्रष्ट क्षत्रियाची लक्षणं आहेत. परंतु, तू द्युतात अडकलेला आहेस त्यामुळें तुला मेल्यानंतर स्वर्ग मिळणार नाही हे निश्चित. दुसरे वेदांत सांगितले आहे किं, दुर्जनांचा नाश करणे क्षत्रियांचे कर्तव्य असते, त्या प्रमाणे कौरव दुर्जन आहेत हे वेगळे सिद्ध करण्याची

गरज नाही. म्हणून त्याचा नाश करणे हे आपले कर्तव्य आहे. म्हणून तू मला माझे क्षत्रिय कर्तव्य करण्यापासून अडवू नकोस".

वैशंपायन पुढे सांगतात, भिमाचे ते बोलणे ऐकल्यावर युधिष्ठीर प्रथम त्याचे कपाळ प्रेमाने हुंगतो, त्याला शांत करण्याचा प्रयत्न करू लागतो. "तू अर्जुनाच्या मदतीने सगळे कौरव आपला तेरा वर्षांचा काळ संपल्यावर ठार मारणार आहेस ह्यांत संशय नाही. परंतु, तू मला खोटे बोलावयाला सांगतो आहेस. तुला माहित आहे किं, मी खोटे बोलत नाही. खोटे न बोलता जर तू त्या नीच कौरवांचा नाश करणार असशिल तर ते मला मंजूर आहे". भिम त्याला विचारतो, "खरे काय व खोटे काय, तुझ्या बुद्धीने ते सांग". असें त्या दोघांचे संभाषण होत असतांना, तेवढ्यात तेथे ऋषी वृहदस्व येतात. त्यांना पाहिल्यावर ते दोघेही उठून त्यांना वंदन करतात. त्यानंतर शिष्टाचाराच्या रिवाजानुसार त्यांची मधुपर्काने (तुप आणि मध ह्यांचे मिश्रण) पुजा होते. जसे ते ऋषी बसतात व थोडी विश्रांती घेतात, त्यांच्या जवळ बसून नम्रभावांने त्यांना युधिष्ठीर विचारतात, "अहो मुनीवर, कावेबाजपणे मला द्युतातच्या खेळांत फसवले गेले आहे. माझे सगळे राज्य, संपत्ती मी घालवून बसलो आहे. मी चांगला द्युत खेळणारा नाही. पापमय अशा लोकांनी माझी फसवणूक केली आहे. मला बरबाद केले आहे. तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून किं काय, त्या माझ्या चुलत भावानी आमची पत्नी कृष्णा हिला ती ऋतुस्नात असलेल्या काळात विवस्त्र करण्याचा प्रयत्न केला. अशी नाचक्की झाली आहे माझी, मी माझ्या बायकोला व माझ्या भांवांना तोंड दाखवण्याच्या योग्यतेचा राहिलो नाही. त्या नंतर आम्हाला बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास अशी शिक्षा केली आहे केवळ मी द्युतात हरलो म्हणून. एवढे करून पुरे झाले नाही किं काय, त्या लोकांनी माझ्या पत्नीची व माझी नको तशी विटंबना भर सभेत सगळ्या त्या राजांसमोर केली ज्यांना आम्ही राजसूय यज्ञात पराजित केले होते. फार वाईट अवस्थेत मी आज आहे". "त्या अपमानकारक वागणूकीमुळें माझे मन अस्वस्थ झाले आहे, मला रात्री झोपसुद्धा येत नाही. इतरांपेक्षा जास्त मला माझे भाऊ व पत्नी वेळोवेळी घालून पाडून बोलतात व मी त्यांना कांहीं माझ्या समर्थनार्थ बोलू शकत नाही. मी सर्व बाजूने चिरडला जात आहे. माझा भाऊ जो गांडीव धारण करतो व ज्याच्या ताकदीवर आम्ही सगळे विसंबून आहोत तो कोठे दूर पाठवला गेला आहे. त्याची मला

फार आठवण येते. तो केव्हां आमच्यात परत येणार ते समजत नाही. ह्या वनवासापेक्षा त्याचे नसणे जास्त त्रास देत आहे. तो कौरवांशी लढण्यासाठी इंद्राकडे व महादेवाकडे अस्त्र व शस्त्रविद्या शिकण्यासाठी व ती सगळी आयुधे आणण्यासाठी गेला आहे. ह्या पृथ्वीवर माझ्या इतका दुर्दैवी राजा नसेल असें मला वाटते. आपण इतके सगळीकडे फिरत असता असं दुसरे उदाहरण आपल्या पहाण्यात आले आहे कां? "माझ्या मते माझ्या इतका मूर्ख राजा दुसरा नसेल. कारण सगळे असून सुद्धा कांहींही नाही अशी माझी व माझ्यामुळें माझ्या परिवाराची अवस्था झाली आहे". ते ऐकल्यावर वृहदस्व ऋषी त्याला बोलतात, "तू समजतोस कीं, तू सर्वात जास्त मूर्ख आहेल पण मी तुला अशा राजाची कथा सांगतो जो तुझ्यापेक्षा जास्त मूर्ख व म्हणून दुर्दैवी होता". वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर कुंतीपुत्र यु‌धिष्ठीर त्यांना विनंती करतो किं, त्या राजाची कथा त्याला ऐकावयाला आवडेल जो माझ्या सारख्या अवस्थेत गेला होता. ते ऐकल्यावर ऋषी वृहदस्व सांगू लागतात, "ऐक आता मी जे कथन करतो ते. तू व तुझ्या भावांनी ती कथा ऐकली पाहिजे म्हणजे तुम्ही कधीच अशा अनावस्थेत जाणार नाही. मी आता तुला कथा सांगतो अशा राजपुत्राची जो तुझ्यापेक्षा जास्त वाईट अवस्थेत सापडला होता. फार प्राचीन काळी निशाधांत एक मोठा राजा होऊन गेला होता. त्याचे नांव वीरसेन होते. त्याला एक पुत्र होता ज्याचे नांव नळ होते. तो तुझ्यासारखाच पुण्य प्रभावी व वेदाचा अभ्यास करणारा होता. असें सांगतात, पुष्करानी त्याला लुच्चेगिरी करून फसवले होते. तो सुद्धा तुझ्या सारखाच असा वनात रहात होता. तो त्याच्या पत्नीबरोबर रहात असें. तेथे त्याची सेवा करण्यासाठी कोणी सेवक नव्हते, रथ नव्हते, कोणी बंधू नाही कीं, कोणा मित्र नाही असा तो एकांडी जीवन जगत होता. तुझी परिस्थिती त्यापेक्षा खूपच चांगली आहे. तुझे बंधू तुझ्या मूर्खपणाला क्षमा करून सुद्धा तुझ्या बरोबर आहेत, ते अजून तुझ्या आज्ञांचा आदर करतात. तुझी पत्नी जरी चिडलेली असली तरी तिने तुझा त्याग केलेला नाही जशी नळाची पत्नी तिच्या नवर्याच्या मूर्खपणाला माफ करून त्याच्या बरोबर रहात होती. म्हणून तू जितका शोक करत आहेस तुझ्या दुर्भाग्या साठी तो करण्याचे कांहीं कारण नाही. ते ऐकल्यावर युधिष्ठीर वृहदस्व ऋषींना विनंती करतो, "मला ती कथा सविस्तरपणे सांगावी. आपण ज्ञानी अहात तेव्हा नळाची कथा मला कृपया समजून घ्यावयाची आहे.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा बेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग त्रेचाळीसावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी सांगतात, त्रेतायुगात नळ नांवाचा एक राजा होऊन गेला. तो वीरसेनाचा मुलगा होता. तो बलवान व देखणा होता. त्याचे अश्वाबद्दलचे ज्ञान विशेष होते. त्याशिवाय इतर कर्तृत्व सुद्धा वाखाणण्यासारखे होते. तो त्याच्या जमातीतील श्रेष्ठ राजा होता जसे देवांत इंद्र आहे. तो प्रसिद्ध होता त्याच्या चांगल्या गुणाबद्दल. सूर्याप्रमाणे त्याची किर्ती होती. तो वेदांचा अभ्यास करणार्या ब्राह्मणांचा आदर करत असें. तो तुझ्यासारखाच सत्यवादी होता व कधीही खोटे बोलत नसें. परंतु, त्याला तुझ्यासारखाच द्युताचा नांद होता. त्याचे मोठे सैन्य होते, तो त्याच्या प्रजेत सर्व स्त्री पुरुषांत आवडता होता. एक संयमी असा त्याचा आत्मा होता. तो एका खर्या राजाप्रमाणे सगळ्यांचे हित पहात होता, थोडक्यात त्याचे व तुझे बरेच गुण समान होते. तो दुसरा मनु असे एकंदर त्याचे चरित्र होते. त्याच प्रमाणें, विदर्भात एक दुसरा राजा होता त्याचे नांव होते भिम तोसुद्धा चारित्र्यसंपन्न आणि मोठा हिम्मतवान होता. प्रजेचे हित पहाण्यात तो अव्वल होता. परंतु, त्याला एक दुःख होते कीं, त्याला मुल होत नव्हते. त्याने प्रामाणिकपणे हरएक प्रयत्न केले मुल व्हावे म्हणून. त्या त्याच्या प्रयत्नात त्याला दमन नांवाच्या ऋषीने मदत केली व त्याला एक सुस्वरूप कन्यारत्न निपजले. त्या नंतर त्याला आणखीन तीन पुत्र झाले. त्या मुलांची नावं अशी होती, मोठी दमयंती, दम, दंत आणि दमन. ते तिनही पुत्र मोठे हिम्मतवान धाडसी व शूर योद्धे झाले. त्यांची मोठी बहीण दमयंती तिच्या सौंदर्यासाठी, शालिनतेसाठी व तेजस्वीते साठी ख्यातनाम झाली. दमयंती वयात आली तेव्हां बरेच राजपुत्र तिचा हात मागण्यासाठी येत होते. दागदागिन्यानी मढलेली दमयंती इंद्राच्या साची सारखी होती सर्व दृष्टीने. ती राजकन्या तिच्या शेकडो दास्यांत उठून दिसत होती. आकाशात ढगांतून वीज चमकावी तशी ती उठून दिसत होती. ती मिनाक्षी साक्षात श्री अशी वाटत होती. माणसांत, यक्षात, देवांत अशा कोठेही तिच्यासारखी सुंदर कन्या आढळत नव्हती. तिच्या प्रमाणे, नळ राजासुद्धा कांहीं कमी नव्हता. देखणेपणात त्याची तुलना फक्त कंदर्पाशीच होत होती. त्याचे भाट त्याची स्तुती दमयंतीकडे वारंवार करत होते. त्याचप्रमाणे दमयंतीची स्तुती तिचे भाट नळाकडे करत होते. अशारितीने वारंवार

एकमेकांची स्तुती होत असल्यामुळें त्या दोघात एकमेकांबद्दल कुतूहल उत्पन्न झाले जरी अजून त्यांनी एकमेकांना पाहिलेले नव्हते. ते कुतूहल त्या दोघात इतके वाढले कीं, नळाला धीर धरवेना. दमयंतीच्या स्मरणात तो त्याचा पुष्कळ समय उद्यानांत फिरत काढत असें जी उद्याने त्याच्या महालाच्या आत होती. त्या उद्यानात असलेल्या सरोवरात बरीच राजहंस फिरत होती. त्यातल्या एकाला एकदा नळ पकडतो. सोनेरी पिसं असलेला तो राजहंस त्याला बोलतो, "मला मारू नको. मी तुझे एक काम करीन जे तू मला करावयाला सांगशिल. मी तुझ्याबद्दल दमयंतीला सांगीन ज्यामुळें ती तुझ्याकडे येईल. ती दुसर्या कोणाही पुरुषाचा विचारसुद्धा करणार नाही". ते ऐकल्यावर तो प्रेमविव्हल राजा त्या राजहंसाला सोडून देतो. त्या बरोबर त्या सरावरातील सगळे राजहंस तेथून उडतात व दमयंतीच्या राज्यात जातात. तेथे विदर्भात आल्यावर ते सगळे दमयंतीच्या पुढे उतरतात. ती राजकन्या त्यांना तिच्या दास्यांच्या मदतीने पकडते. ते निराळ्या प्रकारचे पक्षी ती पहाते, तिला खूप आनंद होतो. ती आणखीन पक्षी पकडण्याचा प्रयत्न करते. त्या बरोबर ते पक्षी चौफेर आकाशात उडून जातात. एका पक्षामागे ती धावत असते तो पक्षी तिला एका एकांत असलेल्या जागी नेतो. तेथे तो तिला बोलतो, "अहो राजकन्या, तेथे एक राजा आहे निशाधांच्या राज्यात त्याचे नांव आहे नळ, तो आश्विनी कुमारांसारखा देखणा आहे. तो कंदर्पाकासारखा आहे. तो तुझ्यासाठी योग्य आहे. तो देवांसारखा आहे. तू जर त्याची बायको झालीस तर तुझ्या सौंदर्याचे चीज होईल. आम्ही गंधर्व पाहिले, राक्षस पाहिले, माणसे पाहिली कोणाचीही बरोबरी त्याच्याशी होत नाही. तू जशी बायकांत रत्न आहेस तसा तो पुरुषात हिरा आहे. तुम्ही दोघे जर लग्न कराल तर खूप सुखी व्हाल". ते त्या राजहंसाचे ऐकून ती राजकन्या त्याला बोलते, "अरे अंडजा, तुझे म्हणणे खरे असेल तर तसेंच हो. तू त्या राजाकडे जा आणि माझा होकार त्याला सांग". त्यानंतर ते पक्षी विदर्भात परत आले. नळाला भेटून त्याला दमयंतीचा होकार सांगितला.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा त्रेचाळीसाला भाग संपला.

# वनपर्व भाग चव्वेचाळीसावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व पुढे सांगतात, त्या राजहंसाचे ते बोलणे ऐकल्याने दमयंती तिचे स्वास्थ्य घालवून बसते. तिला नळाचा कधी भेटते असें झाले. तिची अस्वस्थता वाढत गेली. त्यामुळे ती शोक करू लागली. तिचा चेहरा फिक्कट झाला, त्याचे सगळे तेज विरून गेले. नळ जोवर भेटत नाही तोवर तिची ती अवस्था कमी होणार नव्हती. तिची झोप गेली. बिछान्यावर ती कुस बदलत राहिली, कारण नळाच्या भेटीशिवाय तिला शांत झोप लागत नव्हती असें दिसत होते. कशातच तिचे मन रमेना. तिची ती अवस्था तिच्या दास्यांच्या लक्षात आली. त्या राजाला त्याबद्दल माहीती देतात. ते कळल्यानंतर विदर्भचा राजा भिम, दमयंतीचा पिता समजतो कीं, मामला गंभीर आहे. तो स्वतःला विचारतो, माझी मुलगू इतकी कां बेचैन झाली आहे. त्याच्या लक्षात येते कीं, त्याची मुलगी वयात आली आहे व त्याप्रमाणें जे स्वाभाविक आहे ते घडणारच. त्यात तिला दोष नाही. असें समजून राजा तिच्या स्वयंवराची घोषणा करतो. सगळे राजे ते आमंत्रण स्वीकारून भिमाच्या दरबारात येतात. त्यांच्या येण्यामुळें त्या राजधानीच्या ठिकाणी रथांच्या येण्या जाण्यामुळें गजबजाट झाला होता. त्या राजांच्या बरोबर त्यांचे सैन्य सुद्धा आले होते, त्यामुळें त्यातील हत्तींचे चित्कार, घोड्यांचे खिंकाळणे, वाद्यांचे आवाज असा बराच गोंधळ होत होता. महाबली भिम त्या सगळ्या राजांचे यथोचित स्वागत करत होता. त्या सगळ्या राजांच्या रहाण्याची सोय केलेली होती तेथे ते उतरले होते. त्या सुमारास महामुनी नारद आणि महामुनी पर्वत इंद्राच्या कडे आले होते ते त्यांची नित्याची भटकंती करत होते. ते इंद्राच्या महालात प्रवेश करतात. मेघावत त्यांचे यथोचित स्वागत करतात. इंद्र त्यांना त्यांच्या भटकंतीत त्यांनी काय पाहिले त्याबद्दल विचारतो. नारद बोलतो, "अरे राजा, आम्हाला सदैव शांती प्राप्त होते. अशीच शांती सगळ्या राजांना सुद्धा प्राप्त हो". असे ते दुवा करतात.

ऋषी वृहदस्व सांगत रहातात, नारदाचे ते बोलणे ऐकून तो वल आणि वृत्राचा वध करणारा विचारतो, "त्या पृथ्वीवरील कोणत्या गुणी राजांने राजसंन्यास घेतला व जीवनाचा त्याग करण्याच्या गोष्टी केल्या ते सांगा. कोणाचा मृत्यू झाला त्यांची वेळ संपल्यावर. कोणी शस्त्राने युद्ध करत वीरगतीने मेला व कोण आजाराने". इंद्र त्यांना सांगतो, "ते राजे

आजकाल मला दिसत नाहीत. गेले कोठे ते सगळे"? माझे खास पाहुणे कोठे हरवले आहेत? ते प्रश्न ऐकून नारद त्याला सांगतात, तुला ते राजे दिसत नाहीत कारण, ते सगळे हल्ली विदर्भाकडे गेलेले आहेत. राजा भिमाच्या कन्येचा स्वयंवर आयोजित केलेला आहे. त्याची मुलगी आता उपवर झाली आहे म्हणून ते राजे तेथे गेले आहेत म्हणून तुला ते कोठेही दिसत नाहीत. भिमाची कन्या स्वर्गातील अप्सरेपेक्षा जास्त सुंदर आहे. तिचा स्वयंवर लवकरच संपन्न होणार आहे. सगळ्या राजांना ती त्यांची पत्नी म्हणून हवी आहे म्हणून सगळीकडे शुकशुकाट पसरलेला आहे. अशारितीने ते गप्पा मारत असतांना अमर लोकांतील लोकपाल (इंद्र, वायू, वरूण, कुबेर) अग्नी सह तेथे आले. ते सगळे नारदाचे बोलणे ऐकतात. ते ठरवतात, किं, तेसुद्धा अशा स्वयंवरासाठी जाऊ इच्छितात. असें सांगून ते त्यांच्या सोबत्याबरोबर त्यांच्या वाहनांतून तेथे विदर्भ देशी निघतात. त्याप्रमाणे, राजा नळालासुद्धा ते आमंत्रण मिळाले होते तोसुद्धा तेथे जाण्याचे ठरवतो. त्याच्या मनात दमयंतीबद्दल जे प्रेम होते त्यामुळें तो विदर्भाकडे निघाला. देव त्याला जातांना पहातात. त्याचे स्वरुप साक्षात प्रेमदेवाचेच होते. त्याचे पुरुषी सौंदर्य पाहून लोकपाल आश्चर्यचकीत झाले. त्याला पाहिल्यावर ते लोकपाल त्या स्वयंवराला जाण्याचा विचार सोडून देतात. ते त्यांची वाहने आकाशातच ठेवून स्वतः खाली उतरले व त्या निशादाच्या राजाची भेट घेण्यासाठी त्याच्याकडे जातात. ते निशादांच्या राजाला बोलतात, "अहो राजेश्वर, आपण सत्यवचनी अहात तेव्हां तुम्ही आम्हाला कांहीं मदत करू शकाल कां? आमचे संदेशवाहक म्हणून एक संदेश वाहून नेण्याचे काम कराल कां"?

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाची चव्वेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग पंचेचाळीसावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगतात, ती स्वर्गातील लोकपालांनी केलेली विनंती ऐकल्यावर तो सत्यवादी, सत्यवचनी, नितीपालक राजा त्यांना मदत करण्यास तयार होतो. तो सांगतो कीं तो त्यांचा संदेशवाहक बनण्यास तयार आहे. त्यानंतर तो राजा समजून कीं हे कोणी विशेष आहेत, त्यांना हात जोडून विचारतो, "आपण कोण व कोठून आला अहात? तुमच्या पैकीं कोणाला संदेश पाठवावयाचा आहे? त्याशिवाय आणखीन काय मला तुमच्यासाठी करावे लागेल? मला सगळे खरे काय ते सांगा"? निशाद राजा नळ असें विचारतो व उत्तराच्या अपेक्षेने त्यांच्याकडे पहात रहातो. मेघावत त्याला बोलतो, आम्ही स्वर्गातील देवता आहोत व आम्हाला दमयंतीचा हात मागावयाचा आहे. मी इंद्र आहे, हा माझ्या बरोबर आहे अग्नी आणि हा त्याच्या बाजूला उभा आहे तो वरुणदेव आहे. त्या पलिकडे जो आहे तो मृत्यूदेव साक्षात यम आहे. तुझे इतकेच काम कीं, तू दमयंतीला सांगशिल कीं, आम्ही चार देव तिच्या स्वयंवराला उपस्थित रहाण्यासाठी आलो आहोत. त्यासाठी त्यांच्या पैकी एकाला तिने निवडावे. ते ऐकल्यावर तो मृत्यूलोकातील सत्वशिल राजा त्यांना बोलतो, "अहो देवांनो, मी स्वतः तिचा हात मागण्यासाठी जात आहे, म्हणून मी तुमचे काम करणे उचित नाही. जो स्वतः तिच्या प्रेमात गुंतला आहे तो त्याच्या हितद्वेषी काम कसें करणार"? म्हणून मला क्षमा करा, तुमचे हे काम मी करू शकणार नाही. ते ऐकल्यावर ते लोकपाल देव त्याच्याशी हुज्जत घालू लागतात किं, त्याने संदेशवाहकाचे काम करण्याचे आश्वासन दिले आहे तेव्हां त्याला ते करावेच लागेल. वृहदस्व पुढे सांगतात, नळ त्यांना शांतपणे सांगतो, "तो राजवाडा पहा किती कडेकोट बंदिस्त आहे, त्यात मी कसा प्रवेश करणार"? त्यावर इंद्र सांगतो, "ते काम आमच्याकडे आले, आम्ही तुला आत प्रवेश करून देऊ". त्याप्रमाणे नळ आत प्रवेश करतो व पहातो किं, दमयंती भोवती अनेक सुंदर बायका, तिच्या दास्या म्हणून वावरत होत्या. दमयंतीला तो प्रत्यक्ष पहातो, तिचे सौंदर्य, ज्याबद्दल त्यांने राजहंसांकडून ऐकले होते त्यापेक्षा किती तरी जास्त देखणी ती त्याला वाटू लागली. तिच्या अंगप्रत्यंगांचा रेखीवपणा विलक्षण होता, त्यामुळें नळाचे दमयंतीबद्दलचे प्रेम आणखीनच वाढले. परंतु, तो त्याच्या भावना

दाबून टाकत तिच्याजवळ जातो. त्या निशादाला दमयंती पहाते. त्याला पाहिल्यावर ती सुंदरी त्याला ओळखते व चटकन आपल्या आसनावरून उठत त्याच्याकडे निघते. त्याच्या पुरुषी देखणेपणामुळें जसे मंत्रमुग्ध झाल्यासारखी त्याच्याकडे पहात रहाते. त्याच्याकडे जाऊन ती त्याच्या देखणेपणाचे कौतुक करू लागते. कांहींही न बोलता त्या मुली व दमयंती त्याला स्वीकारतात त्यांच्या मनाने. "किती सुंदर, किती शालिन, किती मर्यादाशील, असे त्या त्याचे कौतुक करत असतात. हा कोण आहे, एक विचारते, कोणी यक्ष कां कोणी गंधर्व"? नळाला पाहून त्या सगळ्या बायका दमयंती धरून गोंधळलेल्या दिसतात. नळाचे तेज, त्याचे शरमणे सगळे त्यांना फार पसंत होते. पुनः पुन्हा त्या विचारत असतात, "हा कोण आहे, हा कोण आहे"? नळराजा दमयंतीच्या जवळ येत रहातो. दमयंती त्याला पाहून स्मित करते जे नळ स्मितांनेच परत करतो. नळ तीला विचारतो तू कोण आहेस"? तुला पाहून माझ्या मनांत तुझ्याबद्दल प्रेम उत्पन्न झाले आहे. दमयंती त्याला विचारते आपण कोण व येथे आतल्या दालनांत कसे पोहोचलात"? आपण कोणी देवता अहात कां"? मला सांगा आपण कोण अहात कारण, ते समजून घेण्यासाठी मी उत्सुक आहे. आपण कशासाठी येथे महालाच्या आतल्या भागात कसें पोहोचलात"? माझा महाल एवढा सुरक्षित असतांना तुम्ही आत कसे आलात. ती विचारते व इतर तिच्या मैत्रीणी त्यांचे ते संभाषण ऐकत असतात. नळ तिला उत्तर देतो, ते सांगतो, "अहो स्वर्गीय सुंदरी, मी नळ राजा आहे, मी इंद्राचा संदेशवाहक म्हणून तुझ्याकडे आलो आहे. त्यात स्वतः इंद्र आहेत त्याशिवाय अग्नी, वरुण, यम आहेत. त्यांची इच्छा आहे किं तू त्यांना वरावेस. तो निरोप देण्याचे काम त्या लोकपालांनी माझ्यावर सोपवले म्हणून मी त्याच्या मायावी क्षमतेमुळें तुझ्या महालात येथवर येऊ शकलो. अहो स्वर्गीय सुंदरी, तुम्ही ह्यांपैकीं एकाला पसंत करावे असें मी त्यांच्यावतीने सुचवत आहे. त्यामुळें मी कोणालाही न दिसतां तुझ्यापर्यंत त्याच्या कृपेने आलो आहे. मी माझे त्यांचा निरोप देण्याचे काम केले जसें मी त्यांना वचन दिले होते, ह्या उपर तुला जे योग्य वाटते तेंच करावेस. असें माझे मत आहे. दमयंतीला लक्षात येते किं. ज्या नळासाठी ती वेडीपिसी झाली होती तो साक्षात त्या देवांच्या कृपेमुळें तिच्या घरात तिच्या संमक्ष उभा आहे.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा भाग पंचेचाळीसावा संपला.

## वनपर्व भाग सहेचाळीसावा

## (नलोपाख्यान पर्व पुढे चालू)

वृहदस्व सांगत असतात, दमयंती नळाला वाकून नमस्कार करून व त्या देवांना वंदन करून स्मित करत विचारते, "अहो राजे, आपण माझ्यावर योग्य प्रकारे प्रेम करावे. आपण जे सांगाल ते मी करीन. मी व माझी दौलत सगळे तुमचे होईल. कृपया आपण माझ्यावर पूर्ण विश्वासाने प्रेम करावे. त्या राजहंसांची वाणी माझ्या हृदयात मला जाळत आहे. तुम्हाला भेटण्याची एक तर्हा म्हणून माझ्या पित्यानी हा स्वयंवराचा घाट घातला होता. तुम्ही जर माझा अव्हेर केला तर मला वीष प्राशन करून अथवा पाण्यात बुडून मरण्याशिवाय दुसरा कांहीं मार्ग उरणार नाही कारण, मी फक्त तुमच्यासाठी आहे". असें विदर्भाच्या राजकन्येचे काकुळतीने काढलेले उद्‌गार ऐकल्यावर नळ तिला विचारतो, "अहो दमयंती मी एक मर्त्य मानव आहे तुम्हाला हे देव मांगणी घालत आहेत, त्यांना सोडून आपण मला वरण्याची गोष्ट करता हे बरोबर आहे कां? ते महात्मे आहेत, जगाचे नियंते आहेत, त्यांच्या तुलनेने मी कःपदार्थ क्षुद्र मानव आहे, अशा परिस्थितीत मी काय करावे ते समजत नाही. तुम्ही जाणता अहात देवांचा राग ओढवून घेऊन मी मृत्यूलाच बोलावत आहे असें होत आहे. हे मात्र खरे किं, मी तुझ्यावर तितकेच प्रेम करतो जितके तू माझ्यावर करत आहेस तरी तू जरा परिस्थितीचा विचार करून तुझा निर्णय घ्यावास. कृपया मला जीवनदान दे व मी सदैव तुझ्या प्रेमातच राहीन जरी आपण  एकत्र नाही येऊ शकलो. तू ह्यांपैकीं एकाला पसंत कर आणि सुखी हो. तेथे जे तुला मिळेल ते माझ्याकडे निशादांचा राजा असलो तरी कसें मिळणार? कोणत्या बाईला देवांशी लग्न करावयाला नाही आवडणार"? हा अग्नी येथे तुझी वाट पहात उभा आहे, तो सगळी पृथ्वी जाळून टाकू शकतो, हा यम तुझी प्रतिक्षा करत आहे, तो मृत्यू देव आहे, त्याच्या गदेच्या भयांनी लोक पाप करण्यापासून दूर रहातात, आणि हे साक्षात महेंद्र आहेत, देवांचे राजे त्यांना वरलेस तर तुझ्या सुखाचा कधीच अंत होणार नाही. त्यानी अनेक दैत्य, दानव ठार मारले आहेत. हे कोणी नको असतील तर हा लोकपालांतील शेवटचा वरुणदेव आहे, पाऊस पाण्याचा देव आहे. त्याच्याशी लग्न केलेस तर तुझ्या पित्याच्या राज्यात कधी अवकाळ येणार नाही. माझा हा प्रेमाचा सल्ला आहे तो स्वीकार आणि कायमची सुखी हो. ते नळाचे

बोलणे ऐकल्यावर, डोळ्यात दमयंतीच्या अश्रू डबडबून येतात. रडत रडत ती राजकन्या त्या लोकपाल देवतांना सांगते, "अहो माझ्या देवांनो, मी तुम्हाला लवून नमस्कार करत्ये, मी माझा जीवलगा आधीच निवडलेला आहे. त्यात मी बदल करू शकत नाही कारण ते पातिव्रत्याच्या विरूद्ध ठरेल. ती दमयंती नळाकडे पाहून सांगते कीं, हा माझा जीवलगा आहे. ते ऐकल्यावर तो म्हणतो, "तू तुला जे योग्य वाटते ते करण्यास मोकळी आहेस. परंतु, मी मात्र एकदा संदेशवाहक म्हणून येथे आलेला असल्यामुळें त्यापेक्षा दुसरे कांहीं आत्ता करू शकत नाही. तर प्राप्त परिस्थितीत तुला मी स्वीकारले तर ते पुण्याला धरून होणार नाही"? ते ऐकल्यावर ती राजकन्या नळाला सांगते, "तुमचे म्हणणे रास्त आहे. आपण स्वयंवराच्या वेळी भेटू, तेथे मी तुम्हाला वरमाळा घालीन, त्यामुळें तुम्हाला कोणताही दोष लागणार नाही. आता तुम्ही संदेशवाहक अहात ते मी समजू शकते. मलासुद्धा आपल्या लग्नाला कोणताही दोष लागू नये असेंच वाटते. तेथे तुम्ही ह्या सगळ्या लोकपाल देवांसह या, तेथे त्यांच्या समक्ष मी तुम्हाला माझे पती म्हणून जाहीर करीन.

वृहदस्व पुढे सांगतात, ते झाल्यावर नळ संदेशवाहकाच्या जबाबदारीतून मुक्त होतो व आपल्या निवासस्थानी जातो. तेथे हे देवसुद्धा रहाण्यास आलेले असतात. ते नळाला विचारतात, "तेथे काय झाले? तू त्या रुपगर्वितेला भेटलास कां? ती काय बोलली? ती आमच्याबद्दल काय बोलत होती"? अरे पुण्यवंत राजा आम्हाला सगळे सांग". नळ त्यांना सांगतो, "आपण दिलेल्या संदेशाचे मी व्यवस्थितपणे तेथे देण्याचे काम केले. त्यासाठी तुमच्या मायावी क्षमतेमुळे मी त्या आलिशान महालात विनाविरोध गेलो. मी तेथे गेलो ते तेथे असलेल्या कोणाही सेवकांला दिसलो नाही. फक्त ती व तिच्या सख्या मला पाहू शकत होत्या. मला पाहून त्या आश्चर्यचकीत झाल्या कारण, त्या महालात कोणालाही शिरणे अशक्य होते. तेथे त्यांच्या जवळ गेल्यावर मी तुमचा निरोप तिला सांगितला. ती राजकन्या फक्त माझ्याकडे एकटक पहात होती. तिने मात्र आपल्याला वरमाळा घालणार नाही असे सांगितले व म्हणाली कीं, तिने तिचा पति आधीच ठरवून ठेवला आहे. त्यानंतर ती म्हणाली त्यांनासुद्धा स्वयंवराला येण्यास सांगा. तेथे मी तुम्हाला सगळ्यांच्या समक्ष वरमाळा घालून माझे मन सांगीन. मी तिला बोललो कीं, ते साक्षात देव आहेत तेव्हां त्यांना सोडून मला एका मर्त्य माणसास का निवडत आहेस"? ती बोलली, "मी पतिव्रता

आहे, एकाच पतिशी मी लग्न करू शकते, व ज्या अर्थी मी तुम्हाला आधीच वरले आहे आता तो निर्णय देवांसाठीसुद्धा मी, एक पतिव्रता, बदलणार नाही. एवढे बोलून तिने आपल्या सगळ्यांना लवून नमस्कार केला व आपले आशिर्वाद तिला सुखा संसारासाठी मिळावेत अशी प्रार्थना केली". असें सांगून शेवटी राजा नळ त्या लोकपाल देवांना सांगतो, "ह्या उपर आपण जे कराल तेंच खरे असेल".

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा सेहेचाळीसावा भाग संपला.

## वनपर्व भाग सत्तेचाळीसावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगतात, त्यानंतर एका शुभ दिवशी राजा भिम शुभ काळ पाहून आपल्या मुलीचा स्वयंवर आयोजित करतो. राजा सगळ्या इतर इच्छूक राजांना त्यासाठी आमंत्रण देतो. त्या प्रमाणे मोठे मोठे शूरवीर, महारथी, बलवान राजे त्या प्रसंगी येतात. जो तो दमयंतीचा हात मिळवण्यासाठी उत्सूक असतो. सोन्याचे खांबे असलेल्या त्या दिमाखदार सुशोभित दरबारात राजा भिम त्याच्या सौभाग्यकांक्षिणी कन्येला घेऊन येतो. तेथे अनेक राजे त्यांचे उत्तम कपडे, दागिने, हार वगैरे घातलेले तेथे दमयंतीची काय इच्छा आहे ते अजमावण्यासाठी प्रतिक्षा करत त्यांच्या उंची आसनांवर बसलेले होते. तो राजांचा मेळा असा होता किं, आकाशातील तारका जणूकाय पृथ्वीवर उतरल्या आहेत. जशी वेळ झाली व मुहूर्त झाला ती राजकन्या आपल्या नाजूक हातात वरमाळा घेऊन तेथे आली. सगळ्यांच्या नजरा तिच्यावर खिळलेल्या होत्या. तेथे भिमाला पांच एकसारखे दिसणारे राजे दिसतात. त्याला आश्चर्य वाटते. ते पांच जण अगदी सारखे दिसणारे पाहून तिला अचंबा वाटला. सगळें नळासारखेच होते. त्यातील खरा नळ कोण हा प्रश्न तिला पडला. तिला त्यांत कांहींच फरक आढळेनां. तिच्या खर्या प्रेमाची ती परीक्षा होती. आता त्यातील खरा नळ कसा शोधावयाचा ते तिला समजेना. देवांनी तिला ह्या तिच्या पातिव्रताच्या सत्त्व परीक्षेलाच जणू तिला बसवले होते. त्यातील एक मनुष्य आहे व इतर चार देव आहेत. त्यातून माणूस कसा शोधावा ते तिला समजेना. त्यामुळें ती दुःखी झाली. वृहदस्व युधिष्ठीराला सांगत होते, अहो नृप, तिने ऐकले होते किं, देवांवर कांही खुणा असतात त्या माणसात नसतात. तेव्हा त्या खुणांच्या मदतीने ती तिचा जीवलगा शोधून काढणार असते. त्या विचारात असतांना तिला असें वाटते आपण ह्या देवांनाच त्यांची ओळख सांगावयाला लावू. ते खोटे बोलू शकत नाहीत. ती राजकन्या त्या एकसारख्या दिसणार्या पांचांना एकत्र बाजूला येण्यास विनंती करते. ती अबला थरथरत त्यांना हात जोडून विचारते, मी राजहंसांची भाषा समजू शकते, त्यांच्या सांगण्यावरून मी माझा पति निवडला आहे तेव्हां, म्हणून जर आपण साक्षात लोकपाल अहात आपण खोटे बोलू शकत नाही म्हणून, कृपया मला सांगा तुमच्यातील खरा मनुष्य नळ राजा कोण आहे. माझे लग्न

नळाशीच होण्याचे विधात्यानेच ठरवले असल्यामुळें मला त्यात आपण लोकपाल अहात तरी मदत करा. माझ्यासाठी कृपया अहो स्वर्गीय देवांनो, तुम्ही तुमचे खरे रुप दाखवा. म्हणजे मला माझा नळ मिळेल. ते ऐकल्यावर त्या चार लोकपाल देवतांना तिची दया येते व ते त्यांचे खरे रुप धारण करतात. त्यामुळें खरा नळ तिला दिसतो. त्यांच्या कपाळावर घाम नसतो व त्यांच्या डोळ्याच्या पापण्यांची उघडझाप होत नसतात जशा माणसाच्या डोळ्याच्या पापण्यांची होत असते. त्यांचे गळ्यातील हार न कोमेजणार्या फुलांचे होते, ते जमिनीवर अधांतरी उभे होते कारण पृथ्वीचे आकर्षण त्या देवांना लागत नाही. खरा निशाद, माणूस असल्याने जमिनीवर उभा होता. त्याच्या गळ्यातील माळा उष्णतेमुळें थोड्या कोमेजलेल्या होत्या. त्याच्या डोळ्याच्या पापण्याची उघडझाप होत असते. ते पाहून दमयंती खर्या नळाला ओळखते व त्याच्या गळ्यात वरमळा घालते. ते पाहिल्यावर आकाशांतून आनंदाच्या आरोळ्या ऐकू येतात. ऋषी, मुनी, देव सगळे त्या लग्नाचे कौतुक करू लागतात. वीरसेनाचा मुलगा आनंदाने आपल्या पत्नीस मिठी मारतो व बोलतो, तू तुझ्या प्रेमाखातर देव सोडून एका माणसाला निवडले आहेस मी तुझा पती नेहमी तुझ्या आज्ञेत असेन. तो भावनांच्या भरात तिला आश्वासन देतो किं, जोवर ह्या देहात जीव आहे तोवर मी तुझा आणि फक्त तुझाच राहीन. तीसुद्धा त्याला तसेच आश्वासन देते. पुढे अरे युधिष्ठीरा, तसें आश्वासन देण्याची प्रथा प्रत्येक लग्नात सुरु होते. अशारितीने त्यांचे लग्न त्यांच्या मर्जीने होते. त्यांच्या प्रितीच्या परीक्षेत ते दोघे उत्तीर्ण होतात त्यामुळें ते चार देव त्या जोडप्यावर संतुष्ट होतात. ते नळाला आठ वर मागायला सांगतात. इंद्र आशिर्वाद देतो कीं, जेव्हा नळ यज्ञ करील तेव्हां त्याला इंद्राचे दर्शन होईल. आणि मृत्यूनंतर तो स्वर्गात जाईल. हुताशनि (अग्नीदेव) बोलतो, जेव्हां नळ त्याची आठवण करील तेव्हां तो देव त्याला मदत करण्यासाठी उपस्थित होईल व जेव्हां त्याला हवा असेल तेव्हां त्याचा प्रकाश त्याला मिळेल. यम त्याला पुण्यवंत रहाण्याचा आशिर्वाद देतो व त्याला स्वर्गीय रुचींचा अनुभव मिळेल. वरुणदेव बोलतो, तो जेव्हां त्याची इच्छा करील तेव्हां तो त्याला मिळेल आणि स्वर्गीय माला त्याला मिळतील. अशारितीने प्रत्येक देव दोन वर त्याला देतात. त्यानंतर आनंदात ते देव आपल्या ठिकाणी निघून जातात. अशारितीने सगळे आमंत्रित राजेसुद्धा गेल्यावर राजा भिम त्याच्या मुलीचा विवाह यथासांग विधीपूर्वक करतो.

त्यानंतर कांहीं दिवस ते तेथे रिवाजानुसार रहातात व नंतर आपल्या घरी त्याच्या सासर्याची परवनगी घेऊन निघतात. दमयंतीशी लग्न झाल्यामुळें आनंदात ते दोघे आपले वैवाहीक जीवन सुरु करतात. त्यांच्या आनंदाला पारावार रहात नाही. तो सत्त्वशिल राजा आपल्या राज्यात न्यायाने राज्य करत असतो. योग्य समई जसे नहुषाच्या मुलानी, ययातिने अश्वमेधयज्ञ केला तसा हा सुद्धा करतो. त्याशिवाय इतर अनेक यज्ञसुद्धा करतो. ब्राह्मणांना भेटी व दानं करतो. देव जसे उपवानात अप्सरांबरोबर आनंद करतात तसेच नळांने आपल्या पत्नीबरोबर खूप मजा केली. त्यांना यथावकाश एक पुत्र होतो. त्याचे नांव ते इंद्रसेन असें ठेवतात. अशारितीने त्याकाळातील रिवाजानुसार यज्ञ करत व प्रजेचे सुख पहात तो राजा सुख समृद्धीने युक्त असें जीवन जगत होता.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा सत्तेचाळीसावा भाग संपला.

# वनपर्व भाग अठ्ठेचाळीसावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व पुढे सांगतात, जेव्हां ते चार लोकपाल भिमाच्या मुलीच्या लग्नानंतर आपल्या स्वर्गात येत होते, तेव्हां ते द्वापार व कली त्यांच्याकडे येत असलेले त्याना दिसतात. त्यांना बघून शक्र त्यांना विचारतो, "आपण दोघे कोठे निघाला अहात"? ते दोघे सांगतात, आम्ही भिमाच्या मुलीच्या स्वयंवराला जात आहेत. ते ऐकून  शक्र त्यांना सागतो किं. तो आताच झाला व त्या मुलीनी नळाला निवडले, त्यानंतर जे घडले ते सगळे ते त्या दोघांना सांगतात. कलीला समजते किं, दमयंतीने एका मनुष्याला देव सोडून निवडले ते कलीला आवडत नाही. जो मद व मत्सराचा काळ असा कली एकदम भडकतो. ते ऐकून इंद्र त्याना सागतो, तो विवाह त्या चारही लोकपालांच्या सम्मतीने संपन्न झाला आहे, त्यात वाईट वाटण्या सारखे कांहीं नाही. ते ऐकूनही कलीचा राग कमी होत नाही. तो बोलतो, देवांच्या पुढे ह्या माणसाला निवडले हे अयोग्य झाले आहे. त्या माणसाला फार मोठे नुकसान भोगावे लागले पाहिजे. अरे पण तो विवाह आमच्या संम्मतीने झाला आहे त्याचे कारण, दमयंतीचे नळावर खरे प्रेम आहे. म्हणून तू तो विषय तुझ्या मनातून काढून टाक. असें ते चार देव कलीला समजावण्याचा प्रयत्न करतात. इंद्र कलीला सागतो, "अरे तो राजा सत्त्वशिल व्रतस्थ असा आहे. तो सगळ्या देवांचे यज्ञ यथासांग पार पाडत असतो, कोठेही तक्रार करावयाला वाव नाही. त्याचा वेदांचा व पुराणांचा अभ्यास झालेला आहे. तो त्याचे प्रजाहिताचे कार्य प्रामाणिकपणे करत आहे. तो सर्व प्राणिमात्रांसाठी चांगला आहे. त्याचे कार्य असे आहे किं, तो साक्षात मानवी लोकपाल झालेला आहे. त्याला आम्ही आशिर्वाद दिले आहेत ज्यामुळे तो त्याचे वैराग्यपूर्ण, सत्वशिल, पुण्यप्रत जीवन जगत आहे. त्याचा आत्मा चिरशातीत असतो. तो संयमी आहे. जो कोणी अशा खर्या राजास त्रास देण्याच्या गोष्टी करील तोच मोठ्या अडचणीत सांपडू शकतो. म्हणून अरे कली, तू तो अविचार सोडून दे. नाहीतर तूंच तळ नसलेल्या महानरकात जाऊन पडशिल". असें बोलून ते चार लोकपाल त्यांच्या ठिकाणी निघून जातात. परंतु, कलीचा राग शमलेला नसतो. तो द्वापारला सांगतो, "मला हे सगळे आवडलेले नाही. माझा क्रोध कमी होत नाही. त्या नळाला कांहीं अद्दल घडवल्याशिवाय

मला सुचायचे नाही. मी असें करतो, त्याला पछाडतो व त्याच्या सात्त्विक मनात शिरून त्याची बुद्धी भ्रष्ट करतो मग बघ काय होते ते. त्यांचे राज्य गेले पाहिजे व तो रस्त्यावर आला पाहिजे. त्यासाठी एकच गोष्ट त्याच्या कडून मी करून घेईन व ती म्हणजे त्याला द्युत खेळण्याचा नाद लावावयाचा. तसें झाले किं ती दमयंती त्याला सोडून जाईल. त्यासाठी द्वापारा तुला मात्र माझी मदत करावा लागेल". द्वापार त्याला आठवण करून देतो किं, "अरे कली, आज त्रेताचे चालते. मीसुद्धा अजून पुरेशाप्रमाणात कार्यरत झालेलो नाही. अशा परिस्थितीत तू कांहीं केलेस तर त्यासाठी तुला शिक्षा होईल अशी लोकपालांनी तुला ताकीद सुद्धा दिली आहे. मी तुला त्या कारणांने कोणत्याही प्रकारचे सहकर्य करणार नाही, फक्त बघ्याची भूमिका करीन. तुझे जेव्हां सुरु होईल तेव्हां तू जे पाहिजे ते कर पण आता नको". द्वापारचे ते बोलणे ऐकून कली एक भयंकर हास्य करतो. आणि बोलतो, "त्रेताला समजेल तेव्हां समजेल, तो पर्यंत मी माझे अद्दल घडवण्याचे काम करत रहाणारच. माणसाला त्याची लायकी दाखवणे हेंच तर माझे कार्य आहे. मग ते मी त्रेतात काय किंवा द्वापारात काय अथवा माझ्या युगात काय सगळे सारखेच आहे. तुझ्या सांगण्यावरून मी एक करीन ते असें किं, माझ्या हालचाली मंदपणे चटकन लक्षात येणार नाहीत अशा प्रकारे करीन मग तर झाले"? द्वापार समजतो किं तो कली त्याचा स्वभाव सोडणार नाही. त्यानंतर कली द्वापारला सोडून पृथ्वीवर नळाच्या राज्याकडे जातो.

असारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा अठ्ठेचाळिसावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकोणपन्नासावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व पुढे सांगतात, अशाप्रकारचा कट कली करतो द्वापारच्या बरोबर व नंतर राजा नळाच्या घरी जातो. नळाच्या कारभारात कोठे कांहीं खोट मिळते कां ते तो पहात असतो. त्याला कांहीं खोट मिळत नाही. त्यासाठी कली निशादाच्या राज्यात बरीच वर्षे फिरत असतो. अशी बारा वर्षे जातात. सरते शेवटी कलीला एक खोट सांपडते. ते असें होते, एके दिवशी राजा नळ त्याचे प्रातःकाळचे शौंच मुखमार्जन केल्यानंतर तो निशादांचा राजा अर्घ्य देण्यासाठी पहाटेची प्रार्थना करण्या ऐवजी चुकून संध्याकाळची प्रार्थना करतो. आणि ते सुद्धा हातपाय न धुता ती करतो, कदाचित तो त्याच्या कारभाराच्या गरजेनुसार तसे करतो. तेवढी खोट कलीला पुरेशी असते. तो नळाच्या शरीरात प्रवेश करतो व थेट मेंदूचा ताबा घेतो. आता नळाला माहीत नसते किं, कलीने त्याला पछाडलेला आहे.

ते केल्यानंतर कली नळाचा लोभी भाऊ, पुष्कराकडे जातो व त्याला सांगतो कीं, नळराजाला द्युत खेळण्याची इच्छा झाली आहे. कली पुढे त्याला सांगतो, माझ्या कृपेमुळें तू नळाला द्युतात हरवशील. त्या नळाला हरवल्यावर तू त्याचे सगळे राज्य त्याच्या कडून काढून घेशिल जेथे तो राजा नळ राज्य करत आहे. कली पुष्कराला आग्रह करतो म्हणून, तो पुष्कर नळाला भेटतो व द्युत खेळण्याचे आमंत्रण देतो. त्याच्या बरोबर द्वापारसुद्धा काय होते ते पहाण्यासाठी तेथे जातो व स्वतः फासा बनतो, ज्याचे नांव वृष असते. पुष्कर नळाला त्याच्या पत्नीसमक्ष आव्हान देतो किं, तो पुष्कराला हरवू शकणार नाही. कलीच्या बुद्धीप्रवेशामुळें नळाच्या मनात गर्विष्ठपणा उत्पन्न झालेला असतो व त्या भरात तो ते आव्हान स्वीकारतो. द्युत खेळण्याची वेळ ठरते. खेळ सुरु होतो व नळ कलीच्या प्रभावामुळें प्रत्येक खेळ हरू लागतो. नळाचे दरबारी, कारभारी असें सगळे त्याला द्युत खेळण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयास करतात परंतु, तुझ्या सारखा तो दुर्बुद्धीने भ्रष्ट झाला होता कारण कली त्याच्या डोक्यात जाऊन बसला होता. जसा नळ हरत होता त्याची दुर्बुद्धी त्याला आणखीन खेळण्यास प्रवृत्त करत होती. त्याचा सारथी दमयंतीच्या कडे जातो व तिला सांगतो किं वेड लागल्यागत नळ द्युतात एका मागोमाग एक राज्ये हरत आहे. तरी त्याला द्युत खेळण्यापासून परावृत्त करण्यात दरबारी अयशस्वी झाले आहे.

म्हणून आपण स्वतः येऊन त्याला द्युत खेळण्याचे थांबवावे असें सांगावे. तो तिला सांगतो अशाने नळ सगळे वैभव घालवून बसेल, असा गुणी राजा द्युतांने अशाप्रकारे बरबाद होत आहे हे त्याच्या प्रजाजनांना पहावत नाही. त्याचे द्युत खेळणे पाहून हांच का तो न्यायी राजा असा प्रश्न पडत होता सगळ्यांना. त्याची बुद्धी अशी कशी फिरली म्हणून सगळे चिंता करत आहेत. भिमाची कन्या दमयंती ते पाहून दुःखाने व्यथीत झालेली नळाला सांगते, "अहो आता हा द्युत खेळणे थांबवा. तुमचे प्रजाजन तुम्हाला आज्ञा करत आहेत किं, तुम्ही अशारितीने द्युत खेळून राज्याचे नुकसान करू शकणार नाही, तो तुम्हाला हक्क नाही. हे राज्य तुमच्या मालकीचे नाही. ब्रह्माच्या आदेशाप्रमाणे राजा हा प्रजेचा विश्वस्थ असतो, मालक नाही. प्रजेला जे मंजूर नाही ते तो करू शकत नाही, हे नैतिकतेचे तत्त्व आपण कसें विसरलात"? परंतु, कलीच्या प्रभावाखाली गेलेला तो अभागी राजा तिच्या बोलण्याकडे लक्ष न देता द्युतात आणखीन राज्य व संपत्ती घालवत रहातो. राजाचे राणीवरील प्रेम सगळ्यांना माहीत होते, तशात तो राजा तिचे ऐकत नव्हता. ते पाहून सगळे हताश झाले व आपापल्या घरी निघून गेले. अशी रितीने द्युताचे व्यसन लागल्या सारखा तो एरव्ही सत्वशिल असलेला राजा कलीच्या प्रभावाखाली पुरता भ्रष्ट झाल्यासारखा कित्येक सप्ताह द्युत खेळत होता व प्रत्येक वेळी हरत होता.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाची एकोणपन्नासावा भाग संपला.

# वनपर्व भाग पन्नासावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व पुढे युधिष्ठीराला सांगत असतात, भिम राजाची शांत स्वभावाची कन्या आपल्या पतिची हि अवस्था पाहून नवल करते. हे कसे झाले, इतका नितीमान राजा वैश्यांच्या छंदात कशा फसला? द्युताचा नाद त्याला कसा लागला, कीं तो माझेसुद्धा ऐकेना? तिला हा कांहीं वेगळा प्रकार आहे असा संशय येतो. आपल्या पतिच्या र्हासाची तिला कल्पना आली होती. परंतु त्याचे कल्याण त्यातल्या त्यात किती करता येईल तेव्हढे करण्याची पराकाष्ठा ती करत असते. ती राणी तिच्या खास दासीला बोलवते व सांगते, "अग वृहत्सेना जाऊन सगळ्या कारभार्यांना काय होत आहे त्याची कल्पना दे. जे वाचवता येईल ते वाचवण्यात तिला त्यांनी मदत करावा अशी ती त्यांना आर्जव तिच्या दासीच्या मदतीने करते. तिची विनती ते मान्य करतात व त्याप्रमाणे जे जमेल ते राज्यातून बाहेर हलवण्याचा प्रयत्न करू लागतात. ते जेव्हां नळाला समजते तेव्हां तो कलीच्या प्रभावाखाली असलेला त्याला विरोध करतो. त्यानंतर जेव्हा तीला समजते कीं, नळ त्यांना विरोध करत आहे तेव्हां ती त्याला द्युत थांबवण्यास सांगते पण नळ ते मानत नाही व द्युतात रमत रहातो. तेव्हां ती  तिच्या सारथ्याला, वर्षनेयास बोलावते व आपली दोन मुलं इंद्रसेन व इंद्रसेना ह्यांना घेऊन आपल्या पित्याकडे जाण्यास सांगते. ती नर्षनेयास बोलते कीं, राजाने तुझे नेहमी भले केले आहे आज त्याची परिस्थिती बिघडलेली आहे तेव्हां तू माझ्या मुलांना घेऊन माझ्या पित्याकडे जा व त्यांना तेथे सोडून ये. दररोज खेळल्या जाणार्या द्युतात नळ सतत पुष्कराकडून हरत होता व त्यामुळें त्याची सांपत्तिक परिस्थिती प्रत्येक दिवशी अधिकाधिक बेहाल होत होती. एवढी अवस्था झाली होती तरी पछाडलेला राजा सतत द्युत खेळतच होता. तो कोणाचेच ऐकत नव्हता. द्युतात फसलेला माणूस दैववादी होतो व त्यापेक्षा जास्त म्हणजे त्याचा प्रतिष्ठेचा प्रश्न उभा होतो. केव्हां तरी मी जिंकेन ह्या एका भरवशावर तो माणूस द्युत खेळत रहातो. त्यात कधीच तो जिंकत नाही तरी तो खेळत रहातो एकाप्रकारचे ते व्यसन होते. जसे तुझे झाले. विनाशकाले विपरीत बुद्धी, अशी त्याची अवस्था झाली होती. ती सांगते तिच्या दोन मुलांना तो कुंद्दीन कडे घेऊन जा. तेथे ते माझ्या नातेवाईकां बरोबर सुरक्षित होतील. त्यांबरोबर तो चांगले

घोडे व रथ सुद्धा घेऊन जातो म्हणजे ते तरी निदान सुरक्षित होतील, नळाची परिस्थिती फारच बिकट झालेली होती परंतु, ते त्याच्या लक्षात येत नव्हते. त्यानंतर तो प्रामाणिक सारथी नळाची सेवा सोडून इतरत्र भटकत जात अखेरीस अयोध्या नगरीला जातो. तेथे तो तेथील राजा ऋतुपर्णाकडे जाऊन त्याच्याकडे सारथ्य करण्याची नोकरी घेतो.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाची पन्नासावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकावन्नावा

## (नलोपाख्यान पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगत असतात युधिष्ठीराला नळाची कथा, वर्षनेय गेल्यानंतर पुष्कर नळाचे सगळे राज्य द्युतात जिंकतो. आता तो कलीच्या मदतीने जिंकणारा पुष्कर त्याला विचारतो, "बोल नळा, आता तुझ्याकडे उरले आहे जे तू पणात लावू शकतोस"? "द्युताचा खेळ असांच चालू द्यावा पण असें काय मोलाचे तू पणाला लावणार ते सांग"? नंतर आठवण झाल्यासारखे करून पुष्कर बोलतो, "तुझी पत्नी आहे, ती लावतोस कां"? ते त्याचे बोलणे व त्याबरोबरचे छद्मी हास्य ह्यामुळें नळाला वाटले कीं, त्याचे हृदय फाटते कीं काय. पुष्कराकडे खिन्नपणे पहात आपल्या अंगावरील सगळे दागिने व उंची वस्त्रं उतरवून देतो आणि केवळ अंगावरील एक वस्त्राने तो सगळ्या मित्रांचा निरोप घेऊन तेथून निघतो. त्याच्या मागून त्याची पत्नीसुद्धा एक वस्त्राने निघते. नगराबाहेर ते येतात व तेथे ते तीन रात्री वनात रहातात. तेथे नव्याने झालेला राजा नगरात हुकूम काढतो किं, जर कोणी नळाला मदत केली तर त्या माणसाला देहदंड दिला जाईल. असें झाल्यामुळें राज्यातील कोणाही त्या जोडप्याला मदत करू शकेना. प्रजेला चांगलेच माहीत होते पुष्कर नळाचा किती द्वेष करत होता. त्यामुळें ते नळापासून दूर राहू लागले. लोक त्यांना टाळू लागले. नळ केवळ पाण्यावर तेथे नगराबाहेर तीन दिवस होता. त्याच्या बरोबर त्याची पत्नी दमयंतीसुद्धा तसेंच पाण्यावर होती. अशारितीने कांहीं दिवस ते दोघे वनात रहात होते, अर्धपोटी कांहीं कंदमुळं व रानातील फळं खाऊन ते रहात होते. एके दिवशी नळाला कांहीं सोनेरी पिसें असलेले पक्षी त्या वनात दिसतात. राजा भुकेला होता. त्याच्या मनात विचार येतो कीं, आज तो ते पक्षी मारून चांगले पोष्टीक खाणे खाऊ शकू. त्याशिवाय त्या पिसांच्या रुपांने थोडी संपत्ती सुद्धा प्राप्त होईल. तो त्या पक्षांना पकडण्यासाठी त्याचे एकमेव वस्त्र काढून ते त्या पक्षांच्या थव्यावर पसरून टाकतो. त्याबरोबर ते पक्षी एकत्रपणे उडतात व ते त्या वस्त्राला घेऊन आकाशात जातात. तेथून ते सगळे पक्षी त्याला नागडा खाली मान घातलेले पहातात. आणि ते पक्षी एका आवाजात बोलतात, अरे नळराजा, आम्ही त्या द्युताच्या फाशांसारखे आहोत. जे उरले होते तेसुद्धा आम्ही काढून घेतले. आपले सर्वस्व गेले आहे व आपण अक्षरशः नागडे झालो आहोत हे समजल्यावर तो

निष्पाप राजा आपल्या पत्नीला सांगतो, "अहो निष्पाप दमयंती, मला माहीत नाही कोणाच्या रुष्ट होण्यामुळें माझ्यावर हा प्रसंग गुदरला आहे. माझ्या अशा अवस्थेत मी तुझ्यासाठी कांहीं करू शकत नाही. मी स्वतः उपाशी असून त्या विवंचनेत आहे. पुष्कराच्या आदेशामुळें कोणीही आपल्याला मदतसुद्धा करण्यास पुढे होत नाही. ते माझे उरलेसुरले कपडेसुद्धा घेऊन गेले. अशा परिस्थितीत मी माझा विवेक हरवून बसलो आहे. काय करावे व काय करू नये ह्याचा सुद्धा मी विचार करू शकत नाही. मी पूर्णपणे हतबल झालो आहे. मी तुझा पति आहे म्हणून मी तुला कांहीं सांगू इच्छितो, तू ते ऐकणार आहेस कां"? "मी जे आता सांगणार आहे ते तुझ्या भल्यासाठी आहे". "येथून बरेच रस्ते दक्षिणेकडे जातात. ते अवंती नगरातून पुढे जातात. त्यानंतर रीक्षवत डोंगर लागतो. त्यानंतर तो भला मोठा पर्वत सुरु होतो ज्याला विंध्य म्हणतात. तेथून पयस्विनी नदी वहात असते. जी शेवटी पश्चिम समुद्राला मिळते. त्यांच्या पलिकडे संन्याशांचे आश्रम लागतात. त्या ठिकाणच्या वनांत फळं व कंदमुळं भरपून मिळतात. तो रस्ता पुढे विदर्भात जातो. त्यानंतर कोसल देश लागतो. त्यांच्या दक्षिणेला जो प्रदेश आहे त्याला दक्षिणावर्त असें म्हणतात. नळ भिमाच्या कन्येस ते सांगत असतो. नळ ते सगळे पुन्हा पुन्हा तिला सांगत होता. दुःखाच्या प्रभावात तो वेडापिसा झाला होता. त्याला अश्रू अनावर झाले होते. दमयंती आपल्या पतिची ती अवस्था समजून त्याला धीर देण्याच्या उद्देशांने बोलली, "तुमची हि अवस्था पाहून माझे हातपाय कांपत आहेत. मला काय बोलू व काय नको ते समजत नाही. तुमची संपत्ती व राज्य दोनही तुम्ही घालवले आहे. तुमची इच्छा आहे किं मी तुम्हाला सोडून माझ्या पित्याकडे जावे पण अशा स्थितीत तुम्हाला जंगलात सोडून मी जाणार नाही. उपास व विवस्त्रता ह्यांने आपण बधीर झाला अहात. त्यानेच आपले अवसान गेले आहे. अशा अवस्थेत आपण माझ्या भल्याचा विचार करता. आपल्याला आपल्या पूर्वीच्या वैभवाची आठवण येत असणार. मी तुम्हाला सोडून कोठेही जाणार नाही. दुःखाच्या वेळीच खर्या बायकोची नवर्याला गरज असते. जे कांहीं भोगावयाचे ते आपण दोघे मिळून भोगू. खरी पत्नी ही पुरुषाच्या अनेक विकारांवर उपाय असते. जेव्हां कोणी नसते तेव्हां पत्नी असते. म्हणून मी तुम्हाला सोडून जाणार नाही व तसा कोणताही प्रस्ताव मांडू नका कृपया. मी मेले तरच तुम्हाला सोडून जाईन एरव्ही नाही. जर तुम्हाला

मी जांवे माझ्या पित्याकडे असें वाटले म्हणूनच मला त्या वाटांची माहीती आपण सांगत होता. आपण माझे देव अहात. असें बोलून कीं, मी तुम्हाला सोडून जावे, तुम्ही मला दुःखी करत अहात. जर जावयाचेच असेल तर आपण दोघे एकत्र भटकत भटकत त्या मार्गाने विदर्भास जाऊ. तेथे राजा, माझे पिता, तुमचे स्वागत करतील. तेथे आपण सुखांने राहू, आपली मुलं आधीच तेथे सुखरुप पोहोचली आहेत".

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा एकावन्नावा संपला.

# वनपर्व भाग बावन्नावा

## (नलोपाख्यान पर्व पुढे चालू)

नळ तिला बोलतो, "तुझ्या पित्याचे राज्य हे माझ्या राज्यासारखेच आहे मला, पण मी अशा परिस्थितीत त्यांच्याकडे कसा जाऊ? एके काळी मी तेथे माझ्या वैभवाच्या अवस्थेत गेलो होतो. मला तेथे जाण्यास शरम वाटते. त्यांनी मला जर कांहीं प्रश्न विचारले तर मी त्यांना काय सांगणार? अशा मुळें तुझे दुःख वाढवल्याचे पातक माझ्या माथी लागेल".

वृहदस्व ऋषी पुढे सांगतात, असें पुनः पुनः सांगून तो अर्ध्या वस्त्र बसलेला त्याच्या बायकोची कशीबशी समजून काढतो. असेंच ते अर्धपोटी आणि अर्धवस्त्री भटकत भटकत एका छपरीकडे पोहोचतात. तेथे त्या छपरीच्या सावलीत तो राजा जमिनीवर बसतो. त्याच्या बरोबर विदर्भाची राजकन्यासुद्धा बसते. त्या दोघांच्या अंगावर एकच वस्त्र असते. मळलेले व फाटलेले कपडे तसेंच असतात. थकलेले व जास्त करून उपासामुळें ग्लानी आलेले ते तेथे त्या छपरीत गाढ झोपतात. काळजीने व आपल्या जीवलगाचे आपल्या मूर्खपणामुळें होणारे हाल त्याला जांचत असतात त्यामुळें त्याला धड झोपसुद्धा नीटपणे येत नाही. नळ त्याच्या मूर्खपणाचा विचार करत असतो. आपण असें कां केले? कशामुळे मला अशी विपरित बुद्धी झाली? असें विचार त्याच्या मनांत येत रहातात. अशा परिस्थितीत मरण हांच चांगला उपाय असेल कां? आपण आपल्या पत्नीस सोडून गेलो तर काय होईल तिचे? असें विचार त्याला सतावत होते. माझ्यामुळें दमयंतीला हे सगळे भोगावे लागत आहे, म्हणजे मी तिचा अपराधी आहे त्यासाठी मी कोणती शिक्षा स्वताला केली पाहिजे? तो सतत अशाप्रकारे विचार करत असतो. मी जर तिला अशा स्थितीत सोडून गेलो तर कदाचित ती जीव देईल, त्याचे पातक पुन्हा माझ्या पदरी पडेल त्याचे प्रायश्चित्त काय करणार? अशा विचाराने तो सतत अस्वस्थ होत असतो. शेवटी तो ठरवतो दमयंतीला जर मी सोडून गेलो तर तिला कोणीतरी वाचवेल परंतु, जोवर मी तिच्या सोबत आहे तोवर तिला कोणीही मदत करणार नाही. कारण, हा दुर्दैव भोग माझा आहे, ती विनाकारण त्यात ओढली गेली आहे. असें ठरवून कलीच्या प्रभावाखाली असलेला नळ तेथून निघण्याचे निश्चित करतो. परंतु, ते दोघे एकाच वस्त्रात असल्यामुळें

त्यांना वेगळे होता येत नव्हते. ते वस्त्र कसें कापावयाचे त्याचा विचार करत असतांना त्याला त्या छपरीत एक चांगली तलवार पडलेली दिसते. त्या तलवारीने तो त्या कपड्याचे दोन तुकडे करतो व स्वताला तिच्यापासून वेगळे करतो. ती तलवार तेथेंच फेकून तो तेथून निघतो. परंतु, आपल्या जीवलग्याला असें एकटे सोडून जाण्यास त्याच्या मनाची तयारी होत नाही व तो पुन्हा त्या छपरीकडे परततो. तिला तसें झोपलेले पाहून तो रडू लागतो. नळ तिच्याकडे पहात विचार करत असतो, जेव्हां दमयंती जागी होईल व उठून बसल्यावर पाहिल किं मी जवळपास नाही, तर तिची काय अवस्था होईल. जीने देव माझ्यासाठी नाकारले तिला मी असें सोडण्याचे कसे ठरवले? त्या विचारांनी तो अधिकच त्रस्त झाला. ती एकटी आहे हे तिला समजले तर ती माझ्याबद्दल काय विचार करेल. जी तिचे सगळे वैभव सोडून माझ्याकडे आली व मी नालायका सारखा तिला सोडून देण्याचा विचार करतो, लानत आहे माझ्यावर. एकटी ती कशी ह्या जंगलात भटकत राहील, जेथे हिंस्त्र श्वापदांचा वावर आहे. त्याशिवाय इतर धोकेसुद्धा असतांना कोणीतरी तिला जवळ पाहिजे, जीच्या भोवती असंख्य दासींचा गराडा असे, तिची अशी अवस्था माझ्यामुळे झाली असतांना मी मात्र स्वार्थीपणे तिची माझ्यावरील जबाबदारी झटकून जाण्याचा विचार केला, माझ्या नीचपणाची हद्द झाली. असें विचार त्याला आता सतावू लागतात. सगळे आदित्य व वसु आणि अश्विनी द्वय मरुतांच्या बरोबर तिचे संरक्षण करोत अशी नळ प्रार्थना करतो. तो पुन्हा तेथून जातो पण पुन्हा तेथे परत येतो. कली त्याला दमयंतीपासून दूर ढकलत असतांना नळांचे पुण्य त्याला पुन्हा पुन्हा त्या छपरीकडे खेचून आणत होते. अशी जुगलबंदी कली व नळाच्या पुण्यप्रभावांची होत होती. कली त्याच्यात दुर्बुद्धी वाढवण्याचा प्रयास करत असतांना, नळाचे पुण्य त्याचा विवेक शाबूत ठेवण्याचा प्रयत्न करत होते. त्या द्वंद्वाची कल्पना नसलेला तो राजा गोंधळलेल्या अवस्थेत तेथे घुटमळत होता. अखेरीस कलीची जीत होते व नळ आपल्या पत्नीला तेथे एकटे सोडून तेथून निघून जातो.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा बावन्नावा भाग संपला.

# वनपर्व भाग त्रेपन्नावा

## (नलोपाख्यान पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगत असतात, अरे राजा युधिष्ठीरा, नळ तेथून गेला, दमयंती झोप संपल्यावर जागी होते. त्या जंगलात ती स्वताला एकटी असल्याचे समजते. कारण तिचा नवरा तिला सोडून गेला होता. दमयंतीला समजते कीं आपला नवरा आपल्याला सोडून गेला आहे. ते समजतांच ती मोठ्याने किंचाळते व त्या निरव शांत असलेल्या जंगलात तिचा आवाज मोठ्याने घुमतो. "मी हरवले आहे, माझा पती कोठे आहे"? असें ओरडत सुटते. ती नळाला उद्देशून ओरडत असते, "तू अशारितीने मला कसा सोडून गेलास? तुझ्याशी प्रामाणिक असलेल्या, पत्नीला तू जो शब्दांचा पक्का आहेस कसा काय असे करू शकतोस? तुला सगळ्यांना दगा दिल्यानंतर सुद्धा जी तुझ्याशी एकनिष्ठ राहिली तिला तू असें कसे करू शकतोस? त्या लोकपालांच्या समोर तू मला जन्मभर साथ देण्याचे आश्वासन दिले असतांना तू असा मला सोडून गेलास कसा? तू सोडून गेल्यानंतर मी अजून जीवंत आहे कारण आम्ही मर्त्य ठरलेल्या वेळीच मरत असतो". दमयंती जोराजोरांने ओरडून बोलते, "आता गंमत नको मला ते सहन होत नाही. तू जेथे लपला असशिल तेथून बाहेर ये. मला फार भिती वाटते. तुला माहीत आहे मला एकटेपणाची सवय नाही. इतका कसा तू क्रूर झालास माझ्याशी? जवळ ये व मला आधार दे. मला तुझी काळजी वाटते कारण मी समजू शकत नाही, तू एकटा कसा माझ्याशिवाय दिवस काढशिल. त्या झाडांखाली उपाशी बसलेले कसें तुला पाहिल्याशिवाय मी रहाणार"? त्यानंतर दुःखातिरेकांनी ती राजकन्या बेहोष होऊन पडते. त्याआधी ती शाप देते कीं, ज्याने माझ्या नवर्याची बुद्धी फिरवली व त्यामुळें आम्हाला हे दिवस भोगावे लागत आहेत तो ह्याहूनही जास्त दुःख भोगेल. शुद्धीवर आल्यावर ती भिमाची कन्या त्या जंगलात तिचा नळ शोधण्यास सुरुवात करते. ती त्या वनात एकटीच वेड्यासारखी भटकत रहाते, तिच्या नवर्याच्या शोधात. अशी ती शोक करत फिरत असतांना एका प्रचंड आकाराच्या नागाच्या जवळ येते. तो अजगर भुकेला होता, त्याला बरेच दिवस कांहीं खाण्यासाठी मिळाले नव्हते. तो तिच्यावर झडप घालतो व दमयंतीला त्याच्या विळख्यात पकडतो. दमयंतीला काय होत आहे त्याचे भान नव्हते. ती अजून नळासाठी शोक करत असते. ती बोलत

रहाते, "अहो, जरा माझ्याकडे या. मला अजगराने पकडले आहे, मला वाचवायला तरी या. काय तुम्ही मला इतक्या लवकर विसरलात कां? हा वनातील अजगर आहे तो मला गिळून टाकेल. मला माहीत आहे, तुम्हाला कशाने तरी पछाडले आहे म्हणून तुम्ही असें विचित्रपणे वागत अहात, परंतु, जेव्हां ते उतरेल तेव्हां तुम्ही पुनः तुमची सद्बुद्धी मिळवाल व तुमचे वैभवसुद्धा परत येईल. त्यावेळी तुम्हाला माझी निश्चितपणे आठवण येईल. तेव्हां जर मी नसेन तर तुमचे कसे चालेल त्याचा विचार करा. तुमची काळजी कोण घेणार माझ्याशिवाय. तुम्हाला माहित आहे कीं, तुमचे माझ्याशिवाय सगळ्या कामात अडते असें असतांना तुम्ही मला सोडून कसे गेलात"? अशाप्रकारे ती ओरडत रडत असतांना एक शिकारी त्या बाजूला येतो. तो पहातो ते अजगराने एका महिलेला त्याच्या विळख्यात पकडले आहे. तो शिकारी चटकन आपल्या धारदार सुरीने त्या अजगराचे तोंड छाटून टाकतो. त्या बरोबर त्याचा विळखा सैल होतो व ती दमयंती त्यांच्या विळख्यातून बाहेर येते. तिच्या अंगावर पाणी शिंपून व तिला खाण्यास देऊन तो तिची विचारपूस करतो. तो दमयंतीला विचारतो, "तू कोण आहेस, येथे कशी आलीस"? तू कशी अशा वाईट अवस्थेत आलीस? अशा प्रकारे विचारण्या झाल्यावर ती अभागीनी ध्यानावर येते. त्यानंतर ती त्या शिकार्यांना जे घडले ते सगळे सांगते. तिचे विलक्षण सौंदर्य तो न्याहाळतो. त्यांची वासला उफाळून येते. तो तिला पटवण्यासाठी तिच्याशी गोड बोलू लागतो. ते पाहून ती त्यांचा उद्देश समजते. त्यामुळें ती क्रोधाने लाले लाल होते. परंतु, त्यांची पर्वा न करता तो शिकारी तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न करतो. परतु, ती त्यांना दाद देत नाही. ती मोठ्याने ओरडून बोलते, "मी माझ्या नवर्या व्यतिरीक्त कोणाशीही संबंध घेणार नाही म्हणून हा नीच माणूस ह्या क्षणी मरून पडेल". अहो युधिष्ठीर, मी तुम्हाला काय सांगणार, त्या पतिव्रतेच्या त्या शापामुळें तो व्याध तत्क्षणी मृत होऊन जमिनीवर कोसळून पडतो जसे जळणार्या झाडाच्या लाकडाचा ओणका पडावा.

अशारीतीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा त्रेपन्नावा भाग संपला.

# वनपर्व भाग चोपन्नावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगत रहातात, त्या व्याधाला शाप देऊन ती मारून टाकते त्यानंतर ती अस्वस्थ मनस्थितीत त्या रानात फिरत असते. त्या जंगलात विविध प्रकारचे हिंस्त्र श्वापदं फिरत असतात. त्यात छोटे किटकांपासून मोठ्या प्राण्यापर्यंत सगळेच होते. सिंह, वाघ, चितळ, रेडे, अस्वलं, चित्ते, हरणं, असंख्य प्रकारचे पक्षी होते. त्याच प्रमाणे, चोर डाकू व कांहीं म्लेच्छ जमातीतील टोळ्यासुद्धा तेथे वावरत होत्या. झाडांमंध्ये सालस व बांबू खूप होते. मोठ मोठी कुरणं होती त्यात माणसा एवढी उंच वाढणारी गवतं होती. पक्षांचा किलबिलाट सर्वत्र ऐकू येत होता. अधून मधून मोठ्या प्राण्याच्या डरकाळ्या सुद्धा ऐकू येत होत्या. अशा निर्मनुष्य वनात ती भटकत होती. धवस, अश्वत्थ, तेंदू, इंगुद, किंसुक, अर्जून, निंब, तिनस, सालम, जंबू, आंबा, लोध्र, कटेचु, वेत, पद्मक, आवळा, पलक, कदंब, औदुंबर, वड, बिल्व, केळी, पयस, खजूर, ताड, माड, हरिक, पिंपळ, अशी झाडे सर्वत्र मोठ्या प्रमाणात वाढलेली होती. त्यावर पक्षी घरटी करून होती. त्याशिवाय वनात मोठे नाग, सर्प, अजगर वावरत होते. त्यांतून वाहणारा वारा मंजूळ धून वाजवत होता. त्याशिवाय उंच सखल प्रदेशांत अनेक दर्या होत्या. त्यातून वहाणारे लहान मोठे झरे, नद्या होत्या. त्याच्या जवळ लहान मोठे तलाव, सरोवर होते. तेथे ती अनेक प्रकारची माकडे पाहिली. त्या वनात असलेले डोंगर, पठारं, घळी, झरे मन रिंझवणारे होते. त्याशिवाय राक्षससुद्धा त्या वनात रहात होते. त्यांचे भयानक रुप पाहून कोणाही घाबरून जाईल असं ते दिसत होते. ती पुण्यवान धीरोदत्त, शांतचित्त, अशी भिमाची कन्या त्या वनात निर्भीडपणे वावरत होती. तेथील भरपूर फळं, कंदमुळं ती खाऊन रहात होती. तिच्या अंगावरील वस्त्र बहुतेक चिंध्या झाल्या सारखे होते पण त्याने कांहीं  बिघडत नव्हते कारण तेथे तिला पहाणारे होते पक्षी, वानरं व छोटे प्राणी जसें ससा, मुंगूस, उंदीर इत्यादि. ती अजून तिच्या जीवलग्याचा शोध घेत असते. तिला त्या एरव्ही भयावह असलेल्या जंगलाची भिती वाटत नव्हती कारण ती स्वतःला केव्हाच विसरलेली होती. दंमयंती फक्त आणि फक्त नळाचाच विचार करत होती व त्या एकाग्र चित्तामुळे तिचे अध्यात्मिक बळ तिच्या नकळत वाढत होते व ते बळ तिला संरक्षण देत होते. आपल्या

पतिबरोबरचे ते आनंददायक क्षण ती पुनः पुनः आठवत होती व त्या स्मृतीत रमून जात होती. त्या दोघांनी मिळून केलेले अश्वमेध यज्ञ तिला आठवतात. आपल्या पतिचे सुंदर शरीर तिला आठवते. यज्ञात ब्राह्मणांना दिलेली दांन तिला आठवतात. असा गुणी राजा एकदम कसा बिघडला तेंच तिला समजेना. त्याने केलेल्या आणाभाका तिला आठवतात व ती विचार करते हे सगळे तो कसा विसरला. असें विसरणे त्याचा स्वभाव नाही मग असें कां झाले"? त्या प्रश्नाचे उत्तर तिला मिळत नव्हते. तिला ते राजहंस आठवतात, त्यांच्याशी तिने केलेल्या गोष्टी तिला आठवतात. वेदांचा अभ्यस केलेला ज्यांने त्यांतील अंग व उपांगे अभ्यास केला आहे जो सगळे नैतिकतेचे नियम जाणतो तो असा कसा गेला मला सोडून त्याचे तिला राहून राहून नवल वाटत होते. ती नळाला आर्जव करत रहाते किं, जर तिला तो नाही भेटला तर ती अशीच त्या संदर वनात त्याची आठवण करत करत देह ठेवणार आहे. दमयंती स्वगत बोलत असते जणूकाय तिचा नवरा तिच्याबरोबर आहे असें सगळे तिचे वेड्यासारखे बोलणे चालू असते. ती एकदा तिला दिसलेल्या राक्षसांच्याबद्दल त्याला सांगते, त्यांचे भयंकर रुप पाहू ती चकीत होते पण घाबरत नाही कारण तिला आता मृत्यूची भिती उरलेली नसते. तिला वाटते तो राक्षस येईल व तिला खाईल पण तसें कांहींच होत नाही. जणूकाय साक्षात मृत्यूसुद्धा तिच्या जवळ येण्यास बिचकत होता. दमयंती स्वगत बोलत असते, तू ये आणि माझ्याशी बोल, माझ्याशी बोल, असें वेड लागल्याप्रमाणें सारखे बडबडत असते. परंतु, तिला उत्तर मिळत नव्हते! कळपातून हरवलेल्या हरीणी सारखी तिची गत झालेली असते. जगण्यासाठी ती जे मिळेल ते खात होती पण त्याकडेसुद्धा तिचे लक्ष नव्हते. तिचे सगळे लक्ष तिच्या पतिकडे होते परंतु, तो कोठेच तिला सांपडत नव्हता. ती तेथील झाडांशी, डोंगरांशी, पक्षांशी बोलत होती. तेथे वाघ, सिंह वावरत होते पण कोणीही तिला धरले नाही. जणूकाय कोणी अद्भूत शक्ती तिचे संरक्षण करत होती. ती रानात फिरणार्या वाघांना बोलते, मी भिम राजाची मुलगी आहे. जसा तू रानाचा राजा तसा माझा बाप विदर्भाचा राजा आहे. असे बोलून ती त्याला पति शोधण्यात मदत करावी म्हणून विनंती करत असते. वाघ, सिंह, रेडे अशा सगळ्याच हिंस्र प्राण्याशी ती अशारितीने संभाषण करत असें. ती त्या सगळ्या प्राण्यांना सांगत असें कीं, त्यानी तिला नळाला शोधण्याच्या कामात मदत करावी. ती पुनः पुनः

त्यांना हांका मारून नळाला शोधण्यासाठी सांगत फिरत असें जर कोणी प्राणी दिसला किं ती ताबडतोब त्याला बोलावून तशी विनंती करत असें. हे असें कित्येक दिवस होत होते पण तिचा जीवलगा तिला कोठेच दिसत नव्हता. दमयंती त्या प्राण्याना विचारत असे कीं, त्यानी नळाला पाहिले कां. ती त्याच्या सौंदर्याचे वर्णन करून त्यांना सांगत असें. ती त्याच्या वर्णन करण्यास कंटाळत नसें. ते हिंस्त्र प्राणी तिला जणूकाय टाळत असावेत असें ती दिसली कां चटकन कोठेतरी निघून जात असत. जणू काय ते तिच्या दुःखात सामिल होते. कधी ती सांगत असें त्यांना जवळ बोलावून कीं, त्यांनी तिला खाऊन टाकावे म्हणजे सगळे संपेल. पण कोणीही हिंस्त्र प्राणी तिला स्पर्शसुद्धा करत नसें उलट ते तिच्या समोरून निघून जात. दमयंती ठरवते कीं, हे प्राणी तिला ऐकत नाहीत तेव्हां आता मी त्या नद्यांना, सरोवरांना, तलावांना विचारणार आहे काय माझा नळ तुमच्यात गेला नाहींना. ते सगळे पहाड, त्या दर्या, सगळ्यांना ती सांगते कीं, तिचा निरोप त्याला सांगा किं, त्याची दमयंती त्याची वाट पहात आहे ह्या जंगलात. विविध वृक्ष, वनस्पती, पशु ह्यांचा संचार असलेले ते पर्वत तिला ऐकत आहेत असें ती समजत असें. ती नेहमी तिच्या वडलांचा हवाला देत असें व त्या पर्वतांना सांगत असें कीं, ती विदर्भाच्या राजाची मुलगी आहे. म्हणून त्या पर्वतांना सांगत असे किं, तिच्या नवर्याला शोधून काढा. अक्षरशः वेड लागल्या सारखे तिचे ते विचारणे होते, दमयंती एकापरीने नळाशी एकरुप झालेली होती. तिच्यासाठी दुसरे कांहींही निरर्थक होते. नळाने केलेल्या विविध यज्ञांची माहिती ती त्या पर्वतांना सांगत होती. त्याच्या सौंदर्याची स्तुती करत होती. तेच ते पुनः पुनः होत होते. कांहीं वेळा ती तिच्या सासरच्या राजांच्या पराक्रमाच्या कथा सांगत असें. आणि शेवटी सागत असें किं, कोणीतरी धोका करून तिच्या पतिची बुद्धी भ्रष्ट केली आहे त्याचा नाश करा व माझ्या नवर्याला माझ्याकडे आणून द्या. तुम्ही त्याला कोठे जातांना पाहिले कां म्हणून विचारत असें. असें विचारत फिरणे असेंच ती करत असें दुसरा कोणताही मार्ग तिला दिसत नव्हता. अशारितीने मंदपणे प्रवास करत ती विंध्य पर्वताच्या पश्चिमेला असलेल्या विदर्भ देशाच्या दिशेने सरकत असते. तेथे ती आपल्या वडलांची आठवण काढते व तेथे असलेल्या पर्वतांच्या उंच रांगांकडे पहात दमयंती त्याना तिचा परिचय करून देते कीं, ती विदर्भाच्या राजाची कन्या असून ती तिचा हरवलेले पति शोधत आहे.

दमयंति त्या पर्वतांना विचारत असते, सांगा माझ्या बांधवानो, माझा नवरा कोठे जातांना तुमच्यापैकीं कोणी पाहिला कां? माझ्या पित्याला जाऊन सांगा किं त्यांची एकुलती एक कन्या फार मोठ्या अडचणीत सांपडलेली आहे. पुन्हा ती आपल्या नवर्याला हांका मरत फिरत रहाते. अरे नळा, माझ्या राजा, तू कोठे लपला आहेस? कां मला असा छळतोस, मी तुझ्या शिवाय इतके दिवस कसे राहिले ते फक्त विधाताच जाणतो. त्यानंतर ती मिळेल त्या वळणांने फिरत फिरत उत्तरेच्या दिशेने सरकत असते. ती पुनः स्वगत परंतु, मोठ्याने बोलते, अरें माझ्या जीवा, मी फार भ्यालेली आहे. लवकर ये व मला आधार दे. तेथून तीन दिवस व तीन रात्री असा प्रवास केल्यावर ती एका ठिकाणी येते तेथे बर्याच दिवसांनी तिला एक मानव वस्ती दिसते. तेथे संन्यासी लोक आश्रम स्थापन करून त्यांची साधना करत होते. त्या आश्रमांतून वसिष्ठ, भृगू व अत्री ह्यांचे शिष्यगण आपली साधना करत होते. ते व्रतस्थ, स्वत्वाचा नाश करणारे योगी आपली कठोर साधना करण्यात गुंतलेले होते. साक्षात पावित्र्य असें त्या जागेचे वैशिष्ठ्य होते. तेथे रहाणारे कांहीं केवळ पाण्यावर व कांहीं हवा पिऊन जगत होते. इतर कांहीं जमिनीवर पडलेली सुकी पान, फळ खाऊन रहात होते. त्यांच्या अंगावर झाडांच्या सालीचे व कांहींच्या अंगावर हरणाच्या कातडीची वस्त्र होती. भोगेंद्रियांचे नियमन केलेले ते जेथे रहात होते तेथे हरण व मांकडे मोठी संख्येने दिसत होती. ती त्यातील एका आश्रमात प्रवेश करते, तिचे सौंदर्य असे होते किं, ती आंत आल्यावर तिच्या तेजाचा प्रभाव तेथे पडला. तेथे असलेल्या संन्याशांने ती लवून नमस्कार करते. ती नम्रपणे एका बाजूस उभी रहाते. तेथे असलेले ऋषी तिचे स्वागत करतात. त्यातील एक वृद्ध ऋषी तिला आसन देतो व विचारतो, "सांग मुलीं, आम्ही तुझ्यासाठी काय करावे असें तुला वाटते? तुझे स्वरुप पहाता व अंगावरील वस्त्राची अवस्था पहाता आम्हाला कांहींच अंदाज करता येत नाही. तरी तुझ्या बद्दल जमेल ते सगळे आम्हाला सांग म्हणजे, आम्ही तुला कांहीं मदत करू शकू, कारण एक निश्चित कीं तू खूप मोठ्या संकटातून जात आहेस". असें उदारपणाचे वागणे पाहून दमयंतीला हायसे वाटते. ती त्यांना विचारते, "अहो निष्पाप श्रेष्ठ ऋषींनो, माझे येणे तुम्हाला त्रासदायक नाही ना वाटत"? ते ऐकल्यावर ते ऋषी तिला दिलासा देतात व बोलतात, आम्हाला तुझ्या येण्याने किंचितही तसदी झालेली नाही, जरा शांत होऊन तुझी माहीती आम्हाला

सांग म्हणजे आम्ही तुला कांहीं दिलासा देऊ शकू. कृपया केवळ दुःख करत बसू नकोस कारण त्याचा तुला कांहींच उपयोग होणार नाही. आम्हाला सांग काय तू ह्या वनाची प्रमुख देवता आहेस व आमची परीक्षा घेण्यासाठी आली आहेस"? तुझ्या रुपरंगावरून व विवस्त्रतेमुळे आम्हाला असें वाटते कारण, सर्व वास्तु देवता अशा विवस्त्रच वावरत असतात असें आम्ही जाणतो. तुझे तेज, ओज, विलक्षण सौंदर्य, सगळेंच हे दाखवते कीं, तू देवता आहेस व ह्या वनात तुझी सत्ता आहे. कदाचित असें वाटते कारण आमच्या दृष्टीने पहाता तुझ्या बरोबर कांही शक्ती वावरत आहेत. तू सामान्य स्त्री निश्चितच नाही. तरी तुझ्या तोंडून खरे काय ते ऐकण्यास आम्ही उत्सुक आहोत".

ती प्रस्तावना ऐकल्यावर दमयंती त्यांना सांगतो, "अहो ब्राह्मणांनो, मी कोणी वनदेवता, जलदेवता, वास्तु देवता असें कांहींही नाही. मी एक मनुष्य स्त्री आहे. मी तुम्हाला माझी कहाणी सांगते. त्या आधी जर तुम्ही मला कांहीं कापड माझे उघडे शरीर झाकण्यासाठी द्याल तर बरे होईल". त्या बरोबर कोणी आश्रमी तिच्यासाठी जाडे भरडे शुभ्र वस्त्र आणून देतो व तिला ते नेसण्यासाठी देतो. ते नेसल्यावर दमयंतीला बरे वाटते व नंतर ती तिला दिलेल्या आसनावर जाऊन बसते. कोणी तिला पिण्यासाठी पाणी देतात. अशारितीने सर्व प्राथमिकता उरकल्यावर ती त्या तेथे जमलेल्या संन्याशाने तिची कहाणी सांगू लागते. "ऋषीवर्यांनो, ऐका माझी कहाणी, मी विदर्भाच्या राजाची कन्या आहे. माझा विवाह यथावकाश निशादांच्या राजाशी राजा नळाशी स्वयंवर पद्धतीने संपन्न झाला. माझ्या पतिचे नांव नळ आहे. ते नावाजलेले त्याच्या प्रदेशातील राजे होते. अनेक लढाया त्यांनी जिंकल्या व त्यांचे राज्य वाढवून एका साम्राज्याचे ते अधिपती झाले होते. ब्राह्मणांना दानं देणे विविध देवतांची पुजा करणे, यज्ञ करणे असें करत असतांना प्रजेची सेवा सुद्धा तितक्याच तत्परतेने तो राजा करीत असें. माझा नवरा शब्दाचा पक्का होता. तो स्वर्गीय देवतांपेक्षा जास्त सुंदर दिसत होता. नेहमी युद्धात जिंकत असें. असा माझा पति होता. त्यांचे वेदांचे ज्ञान पूर्ण होते. नितीशास्त्र त्यांनी चांगले आभ्यासले होते. परंतु, एकदा त्याला कोण्या दुष्ट माणसांनें द्युत खेळण्याचे आव्हान दिले. माझ्या राजाला द्युत नीटपणे खेळता येत नसतांनाही त्याने ते आव्हान स्वीकारले. त्या द्युतात तो सहाजिकपणे हरत गेला. एका मागोमाग एक असे सगळें तो हरत होता. त्याचे राज्यसुद्धा तो त्या नांदात

घालवून बसला. अखेरीस आम्हाला ते राज्य सोडून एका वस्त्रानिशी वनात यावे लागले. ज्या दुष्टाने माझ्या नवर्याला द्युतात हरवले तो तेथे राजा झाला व त्यांने फरमान काढलें किं कोणीही आम्हाला कशाही प्रकारची मदत केली तर त्या प्रजाजनाला फाशी दिली जाईल. त्यामुळें आम्हाला कोणीही मदत करू शकत नव्हता. आम्ही ते राज्य सोडून वनात जाऊन राहू लागलो. तेथे एकदा उपासमार व दुःख ह्यांच्या प्रभावाखाली मी थकल्यामुळें एका छपरीत निजले होते, मला गाढ निद्रा लागली होती. जेव्हां मी उठले तेव्हां मी पाहिले तो माझा नवरा कोठे दिसेंना. मी पतिव्रता त्याच्याशिवाय कशी रहाणार? म्हणून माझ्या नवर्याला शोधत शोधत येथवर आले आहे. माझा नवरा कोठे आहे ते जर तुम्ही मला सांगू शकाल तर मोठे उपकार होतील. त्याचे कांहीं बरेवाईट झाले आहे किं काय ते समजले म्हणजे मी त्याच्या नांवाने सती जाण्याचे ठरवले आहे. पण जर तो जीवंत असेल तर मला त्याच्यापाशी घेऊन जा". असें सांगून दमयंती गप्प बसते. तेथे बसलेल्यांपैकीं एक सत्य ज्ञानी ऋषी त्याच्या दिव्य दृष्टीने पहातो भविष्यात काय आहे ते, व तिला सांगतो, "मुली, तुम्ही दोघे एका विलक्षण प्रकारच्या परीक्षेला बसला अहात व तुम्हा दोघाचे भविष्य मोठे उज्वल आहे. तुझा पति जीवंत आहे व तुम्ही पुनः एकत्र येणार अहात म्हणून हा आव्हानाचा काळ संपला किं सर्वकाहीं सुरळीत होईल म्हणून दुःख करत बसू नकोस". भविष्यात तुझा पति त्याचे गेलेले राज्य पुनः मिळवील व तू त्याला पुनः त्याचे गत वैभव प्राप्त झालेला पहाशिल. त्याच्या अंगावर पुनः पहिल्यासारखे दागदीगिने पहाशिल व तू त्याची राणी म्हणून पुनः सगळी सुख प्राप्त करशिल. ते सांगितल्यावर तो आश्रम आणि त्यातील ऋषी सगळें एकदम अंतर्धान पावतात. जणू काय तो एक भास होता असें तिला वाटते. ते आश्चर्य पाहून दमयंती नवल करत रहाते. तिला समजेना कीं ते एक स्वप्न होते कां भास का खरोखरच ते झाले. तिला कांहीं समजेना पण अंगावरील वस्त्रांमुळें ते स्वप्न नव्हते हे निश्चित हे ती समजते. ती समजू शकत नाही ते सगळें एकदम कसे अदृष्य झाले! त्या दृष्ट्या ऋषीचे बोलणे ऐकल्याने जे तेज दमयंतीच्या मुखावर आले होते ते पार नाहीसे होते. ती पुन्हा निस्तेज होते. तो एक भास होता असें ती समजते व आणखीन खोल दुःखात जाते. हे घडलेच नसते तर बरे होते असें विचार तिच्या मनांत येत असतात. तेथून ती त्याच्या पलिकडील वनात एका अशोक वृक्षाच्या जवळ जाते. तेथे

बरेच वृक्ष होते व ते सगळें फुलांनी व फळांनी डवरलेले होते. तेथे सुंदर पक्षी चिवचिव करत होते, वस्तुतः ते वातावरण अतिप्रसंन्न होते परंतु, दमयंतीला ते भावत नव्हते. ती पुन्हा तिच्या दुःखात चूर होते. जोपर्यंत तिचा नळ तिला भेटत नाही तोवर तिला कशातही सुख, आनंद मिळणार नसतो. ती तेथे वाढलेल्या अशोक वृक्षांना सांगते, किं, त्या वृक्षानी तिला तिचा पति मिळवून देण्यात मदत करावी. दमयंती त्या वृक्षाना तिच्या नवर्याचे वर्णन करून सांगते, तो एका फाटक्या वस्त्रात फिरत आहे. तो खूप देखणा आहे. त्याला जर तुम्ही पाहिले तर त्याला सांगा किं मी त्याची पत्नी त्याची वाट पहात आहे. वृहदस्व ऋषी पुढे युधिष्ठीराला सांगतात की, दमयंती पुनः तिच्या भ्रमिष्ठ अवस्थेत जाते. त्या आश्रमातील गोष्टींचा जो प्रभाव प्रथम तिच्यावर पडला होता तो पुरता पुसला गेला होता. पुनः तिची पूर्वीचीच बडबड सुरू होते व पुन्हा ती तेथील झाडे, झुडपे, लहान मोठे प्राणी, साप, विंचू अशा ज्याला ती पाहिल त्याला तेंच तेंच प्रश्न विचारत फिरू लागते. माझ्या नवर्याला कोणी पाहिला कां, कोठे जातांना दिसला, असें ती त्या मुक वनजीवांना विचारत फिरू लागली. मोठ्या वृक्षाना ती तिनदा प्रदक्षिणा घालून त्या वृक्षाला हात जोडून कळकळीची विनंती करत असे. तसें फिरत ती जास्त घनदाट अशा जंगलात ती प्रवेश करते. त्या जंगलात ती अनेक दर्या खोरी, नद्या, झरे पाहिले, त्याशिवाय अनेक वन्य प्राणी ती पहाते. करता करतां ती एका अशा ठिकाणी येते कीं, तो एक मोठा रस्ता होता. त्याच्या कडेला ती पहाते कीं, व्यापार्यांचा एक मोठा तांडा तेथे थांबला होता. अनेक घोडे व गाड्या ज्यांच्यावर सामान लादलेले होते ते विश्रांतीसाठी थांबलेले होते. त्या पलिकडे स्वच्छ पाण्याचा एक मोठा झरा वहात होता. त्याच्या पाण्यावर बरेच पक्षी त्यातील मासे पकडण्यासाठी घिरट्या घालत होते. ते ती पहाते व तिच्या भ्रमिष्ठ अवस्थेत ती त्या काफिल्यात घुसते. तिला पाहून निरनिराळ्या प्रवृत्तीच्या लोकांच्या विविध प्रतिक्रिया उत्पन्न होतात. कांहीं तिचे ते वेडसर स्वरुप पाहून घाबरतात कारण जगंलात अशा रुपात चेटकीणी फिरतात असा समज होता. त्याशिवाय त्यामुळें कांहीं तिचा द्वेष करतात, कोणी तिला हसतात, कोणी तिला दया दाखवतात, कांहींचे कुतुहल जागृत होते, कोणी ओरडत सुटतात, ज्यांना तिच्या बद्दल दया येते ते त्या काफिल्यातील ज्येष्ठ लोक तिला सहानुभुतीपूर्वक विचारतात, कीं, "ती कोण आहे व अशा परिस्थितीत येथे वनात काय

करते आहे अशा अवस्थेत. तुला अशी पाहून आमची माणसे घाबरली आहेत कारण ह्या जंगलात चेटकीणी फिरतात असा समज आहे तरी तू कोण ते सांग. तू मनुष्य आहेस कीं, चेटकिण आहेस ते सांग. तू चेटकिण नाही तर कोणी वनदेवता आहेस कां, कोणी यक्ष, यक्षिणी, सांग कोण तू आहेस व अशारितीने आमच्या काफिल्यात कां घुसली आहेस तुला कांहींतरी पाहिजे कां"? तसे असेल तर सांग आम्ही तुला देऊ आम्ही तुझी पुजा करण्यास तयार आहोत पण असें आमच्या माणसांना घाबरवू नकोस". असें ते तिला बोलतात. ते तिला आश्वासन देतात किं ते येथे जास्त काळ थांबणार नाही, लवकरच निघून जाण्याचे ते लोक तिला सांगतात. दमयंती त्यांना सांगते, मी तुमच्यासारखी मनुष्य आहे, कोणी यक्षिणी, देवता नाही. मी माझा हरवलेला पती शोधत आहे. माझ्यावर नशिबांने घात केला आहे. तिचे ते ऐकून त्या काफिल्यातील पोक्त माणसे तिला समजण्याचा प्रयत्न करतात. ती त्यांना सांगते मी एका राजाची कन्या आहे. माझ्या पित्याचे राज्य विदर्भात आहे. माझ्या पित्याचे नाव भिम आहे. माझा विवाह निशाद राजाशी स्वयंवराने झाला होता. कांहीं अघटीत घडले व माझा पति त्याचे राज्य घालवून बसला. त्याच्यासह मी राज्य सोडून वनात गेले तेथे माझ्या पतिची व माझी ताटातूट झाली. मी सध्या त्याला शोधत फिरत आहे व येथे माणसे पाहिली म्हणून मी विचारते आपल्याला किं आपल्या पैकीं कोणी माझ्या पतीला पाहिले आहे कां"? एवढाच माझा उद्देश तुमच्या काफिल्यात येण्या मागचा होता. नंतर दमयंती त्यांना विनंती करते कीं जर त्यांनी तिचा पति पाहिला असेल तर त्याची माहीती तिला सांगावी. ते तिचे स्पष्टीकरण ऐकल्यावर त्यांचा प्रमुख तिला सांगतो, आम्ही कोणी असा माणूस अजून पर्यंत पाहिलेला नाही. आमच्या माहीतीप्रमाणे. ह्या वनात फक्त हिंस्त्र श्वापदं आहेत. तू पहिली व्यक्ती आम्ही ह्या वनात पाहिली आहे. त्यानंतर तो आकाशात पहात पुटपुटतो, अहो मणीभद्र, यक्षांचा राजा आम्हाला सहाय्य कर. त्यानंतर ती त्या मुख्याला विचारते आपला हा काफिला कोठे जात आहे ते सांगाल कां"? त्यावर तो सज्जन व्यापारी जो त्या काफिल्याचा मुख्य असतो व ज्याचे नांव सुची होते, तिला सांगतो कीं, केवळ धंदा करून नफा मिळवण्यासाठी आम्ही सुवाहू नगरीला जात आहोत जेथे मोठा धर्माचरणी, सत्यवचनी राजा छेड्डी राज्य करत आहे.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा चौपन्नावा भाग संपला.

## वनपर्व भाग पंचावन्नावा

## (नलोपाख्यान पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगतात, त्या काफिल्याच्या मुख्याचे बोलणे ऐकल्यावर ती त्यांच्या बरोबर त्या काफिल्यातून सुवाहू नगरीला निघते. ते लोक तिला पाहुणी समजून मोठ्या प्रेमांने नवीन कपडे देतात. त्या ज्येष्ठ व्यापार्याला निशाद राजाच्या पतनाची वार्ता ऐकल्याचे स्मरते. म्हणून तो तिच्या कथेवर विश्वास ठेवतो. बरेच दिवस ते प्रवास करत असतात. ती नळाची राणी एकचित्ताने फक्त तिच्या नवर्याचाच विचार करत त्या लोकांबरोबर प्रवास करत असते. कांहीं दिवसांच्या प्रवासा नंतर ते एका मोठ्या तलावापाशी येतात. त्या तलावात असंख्य सुवासिक कमळं उमललेली होती. त्या तलावाच्या तटी हिरवेगार गवत होते त्यावर काफिल्याचे खेचर, घोडे, उंड व हत्ती चरू लागतात. तळ्याच्या आवतीभावती विविध प्रकारचे पक्षी खेळत होते. तलावाचे पाणी अतिशय गोड होते व ते प्यायल्याने मनाला शांती प्राप्त होत होती. काफिल्यातील प्राणी व माणसे तेथे कांहीं काळ विश्रांती घेण्याचे ठरवतात. असें ते तेथे थांबल्यानंतर एके दिवशी रात्रीच्या प्रहरी हत्तींचा एक झुंड तेथे येतो. त्यातील बरेच हत्ती माजावर आलेले होते. ते जंगली हत्ती त्या काफिल्याच्या पाळीव हत्तींना पहातात. जंगलातील ती वाट तलावाकडे जात असते ती सगळी त्या काफिल्याच्या गाड्यांनी व्यापली होती व त्यामुळें हत्तीना तलावात जाण्यास जागा मिळेंना. तशात झुंडीतील हत्ती त्यांना पाहिल्यानंतर त्यातील माजावर आलेले हत्ती त्या काफिल्यातील हत्तींकडे त्यांचा मोर्चा वळवतात. कोणी मादीहत्तीण आहे कां ते पहाण्यासाठी, त्यांचा वेग व जोर प्रचंड होता. त्या हत्तींच्या धावत येण्याने सगळी जमीन हादरून गेली. ते इतक्या जोरांने काफिल्याला धडक देतात कीं, त्यातील अनेक गाड्या त्यातील झोपलेल्या माणसांसकट उलट्या होतात. त्यात बरेच जण चिरडले जातात. काफिल्याचे रथ, माल घेऊन जाणार्या गाड्या सगळे असें उध्वस्त होतात कीं, त्यात बरेचजण मरून जातात. मालाची नासाडी होते. तेथे अनेक जण जमिनीवर झोपले होते. ते हत्तींच्या पायाखाली चिरडले गेले. एकच गोंधळ उडाला. तेथे बांधून ठेवलेले घोडे व उंटसुद्धा त्या प्रचंड हत्तींच्या जोरदार धडकीने जखमी झाले. त्यात कित्येक एकमेकांवर आदळल्यामुळें त्या धडाक्याने बेशुद्ध झाले. फार मोठे नुकसान झाले

त्या काफिल्याचे. तेथे शेकोट्या पेटवलेल्या होत्या त्यामुळें आजूबाजूला आग भडकली. त्या आगीने त्या काफिल्यातील व्यापार्यांचे खूप नुकसान झाले. त्यांच्या किंचाळण्याने व आरडाओरडीमुळें त्या शात वनात एकच गोंधळ झाला. कांहीं जवळच्या झाडांवर चढले त्यांना त्या हत्तींनी सोंडेने ओढून काढून फेकून दिले. वांचवा, वांचवा म्हणून जेथून तेथून ओरड ऐकू येत होती. त्या धुमश्चक्रीत जडजवाहराने भरलेले अनेक पेटारे उघडे पडले होते व त्यातून विकावयाचा माल इतस्ततः पडलेला दिसत होता. त्या गोंधळामुळें इतरांप्रमाणे दमयंतीसुद्धा जागी झाली. तिच्या भितीत व काळजीत ह्या प्रकारामुळें आणखीनच भर पडली. आजुबाजूस होत असलेले भयंकर सगळे पाहून ती भयचकित झाला होती. काय झाले ते तिला समजत नव्हते. थोड्या वेळांनी सगळे शांत झाले व त्यानंतर जे वाचले होते ते सगळे एकत्र जमले. ते एकमेकांना विचारू लागले हे कसे झाले. म्हणजे त्यांच्या प्रश्नाचा ओघ असा होता कीं, हे कोणाच्या अशुभ लक्षणामुळें झाले. त्या सर्वांची नजर अर्थातच दमयंतीकडे गेली. सगळे लोक आपापले मत सांगू लागले. कोणी बोलले आपण मणिभद्राची पुजा योग्य प्रकारे केला नाही म्हणून असें झाले, आपल्याला शिक्षा झाली, कोणी बोलले वैश्रावणाची पुजा बरोबर झाली नाही म्हणून असे झाले, कोणी म्हणतो यक्ष पुजा व्यवस्थितपणे झाली नाही म्हणून असें गंडांतर आले. कांही मात्र ह्या प्रसंगाचा संबंध त्या विचित्र दिसणार्या बाईशी जोडतात. ते बोलतात, हे घडले कारण ती अवदसा आपल्या बरोबर होती. कोणी बोलतात आपण त्या शुभलक्षणी पक्षांना दाणा दिला नाही. त्यात जास्त भर होता तो दमयंतीच्या असण्याचा, कोणी तिला राक्षशिण, कोणी पिशाच्च असें अंदाज करू लागले. हिच्या अवलक्षणामुळें हि आपत्ती काफिल्यावर आली असा बहुतेक सगळ्यांनी अर्थ काढला व त्याचा दोष तिच्यावर टाकण्याचा सूर दिसू लागला. कांहीं बोलले आपण त्या चेटकीणीला मारून टाकले पाहिजे. त्यातले कांहीं तिला त्या अंधारात शोधण्यास सुरुवात करतात. कांहीं बोलतात किं, अशा चेटकिणीला ठेचून मारले पाहिजे. दमयंती ते ऐकते व आपल्याला धोका आहे हे लक्षात आल्यावर दमयंती आणखीन घाबरली व त्या पहाटेच्या अंधारात वनात पळून गेली. ती विचार करू लागते, मी कधी कोणाचे कांहीं वाईट चिंतीलेसुद्धा नाही तरी माझ्यावर असा आरोप होतो म्हणजे माझे भाग्य फुटले आहे. ती पुन्हा विचार करू लागते, मी कांहीतरी फार वाईट कर्म केले असेल

म्हणून माझ्यामागे असें दुर्भाग्य लागले आहे. परंतु, तिला समजत नाही असें कोणते पातक तिच्या कडून झाले कीं, तिची अशी अवस्था झाली आहे! कदाचित माझ्या दुर्भाग्यामुळें माझ्या नवर्याला द्युत खेळण्याची दुर्बुद्धी झाली असेंल कां? असें अभद्र विचार तिच्या मनात काहूर माजवू लागतात. ती तिच्या सद्य परिस्थितीचा विचार करतांना समजते कीं हे सगळे माझ्याच नशीबाचा खेळ आहे म्हणून नळ माझ्यापासून दूर झाला व मी अशा वनात जेथे जंगली श्वापदांचा संचार असतो, जेथे राक्षस, पिशाच्च वावरतात तेथे मी अशी फाटक्या कपड्यात वावरत आहे. म्हणजे हे माझे प्राक्तन आहे व ते मला भोगलेच पाहिजे. परंतु, आपण कोणते कुकर्म केले ते मात्र तिच्या लक्षात येईना. दुसर्या दिवशी तो काफिला आपल्या मृत नातेवाईकांचा शोक करत त्या ठिकाणातून निघून जातात. दमयंती त्या दुर्दैवी लोकांना शोकविव्हल अवस्थेत तेथून जातांना ती झाडांच्या आड लपून पहात असते. त्या लोकांच्या दुःखास व नुकसानीला ती स्वतःला जबाबदार समजते व त्यामुळें आणखीन शोकाकूल होते. काय नेमके माझ्याकडून गैर घडले ते समजले पाहिजे म्हणून ती तिच्या आयुष्याचा जीवनपट पाहू लागते. त्यात ती जेव्हां तिच्या स्वयंवराच्या प्रसंगाशी येते तेव्हां तिच्या लक्षात येते किं, तिने चार देवांना वगळून नळाला निवडले होते! त्यामुळें ते देव जे कोणी मामुली नव्हते तर साक्षात लोकपाल होते. तिच्या मनात शंका येऊ लागते कीं, कदाचित त्यामुळें ते नाराज झाल्याने हि तोहमत माझ्यावर आली असेल कां? तेंच कारण असणार, एरवी कांहीं दोष दिसत नाही असें लक्षात आल्यावर तिचा शोक अनावर झाला. तिला आठवते, कीं, नळ तिला त्यावेळी सांगत असतो कीं, देवांना डावलून माणसाला निवडण्याचे दुष्परिणाम होऊ शकतात, पण आपण त्याकडे दुर्लक्ष केले केवळ आपल्या नळाबद्दलच्या लोभामुळें. म्हणून असेल कदाचित नळ माझ्यापासून दूर गेला व मी अशी एकटी येथे निर्जन जंगलात भटकत आहे. काय ही शिक्षा आहे कां? ती आठवते, तिच्या शिक्षणात तिला शिकवलेले होते कीं, शिक्षेवर असलेला मनुष्य ती शिक्षा पूर्ण झाल्यावरच मरतो म्हणून असेल कदाचित त्या हत्तींच्या झुंडीने तिला पायाखाली तुडवले नाही, कारण आपल्याला अजून खूप शिक्षा भोगावयाची असेल! दमयंती त्या शोककूल अवस्थेत प्रवास करत छेड्डी राज्यात पोहोचते. त्यातील राजधानी सुवाहू मध्ये ती अर्धनग्न अशा अवस्थेत फिरत असते. त्या शहरातील रहिवाशी तिला पहातात, त्यांना वाटते कीं, ती कोणी वेडी

आहे, म्हणून कांहीं तिला टाळतात, कांहीं घाबरून तिच्यापासून दूर जातात. दमयंती तिच्या पिंजारतेल्या धूळीने भरलेल्या केसांनी व अंग मलिन असे ती त्या नगरात फिरत असते, कोणी तिला भिक म्हणून कांहीं खाद्य, कांहीं जुनी वस्त्रं असें देत असतात. कांहीं लहान मुलं कुतूहल म्हणून तिच्या मागोमाग चालू लागतात. अशाप्रकारे सर्व बघ्याच्या वेटोळ्यात अशी दमयंती चालत चालत राजवाड्यापाशी पोहोचते. त्या राजवाड्याच्या आगाशीत बसलेल्या राजमाता ते पहाते. राजमाता तिच्या सेविकेस बोलावते व सांगते किं, "जा त्या बाईला माझ्याकडे घेऊन ये. ती असहाय्य आहे व हे लोक तिला आणखीन घाबरवत आहेत. तिला मदतीची गरज आहे. तिच्यावर दुर्भाग्याची कुर्हाड कोसळलेली आहे. तिला आपण मदत केली पाहिजे कारण, ती आता आपल्या राज्यात आली आहे म्हणून ती आता आपली जबाबदारी आहे. तिला खाऊ घालून मग तिची वास्तपुस्त करावयाला पाहिजे. जरी ती भिकारीण वरपांगी दिसत असली तरी तिच्या चेहरेपट्टीवरून ती हलक्या कुळातील निश्चितपणे नाही. तिचे नेत्र सांगतात कीं, ती साक्षात श्री सुप्त रुपांने कोणाची तरी परीक्षा घेण्यासाठी येथे आली आहे. तरी तिला माझ्याकडे घेऊन ये". ती आज्ञा झाल्याबरहुकूम ती सेविका राजवाड्याबाहेर येते व त्या बघ्यांना हाकलून दमयंतीला राजमातेच्या जवळ आणते. तिच्याकडे पाहून राजमाता दमयंतीला बोलते, "तू मुली, मोठ्या अडचणीत आहेस हे मी पहात आहे परंतु, तू कोणी भिकारीण नाही असें माझे मन मला सांगत आहे. तरी तू कोण आहेस ते मला सांग. तुझ्या ह्या मळलेल्या अवस्थेतसुद्धा तू एका वेगळ्या प्रकारे चमकत आहेस. तुझे सौंदर्य आता जरी मलूल झालेले असले तरी ते सामान्य माणसाचे खात्रीने नाही. म्हणून तू सांग तू कोणी देवता, यक्षिणी असें कोण आहेस"? ते सहानुभूतीचे बोलणे ऐकल्यावर दमयंतीला थोडा धीर येतो व ती सांगू लागते, अहो राजमाता, मी कोणी यक्षिणी अथवा देवता नाही. मी एक अभागिनी पतिव्रता आहे व माझ्यापासून दूर गेलेल्या माझ्या पतिच्या शोधात फिरत आहे. तो मला मिळत नाही. आपण सगळ्या बायकां अहात म्हणून मी मोकळेपणाने सांगत आहे जे खरे आहे. माझा पति एक उत्तमगुणी इसम आहे परंतु, कोण्या अज्ञात कारणामुळें तो त्याचे सगळे वैभव घालवून बसला, त्याच्या बरोबर मी त्याची पतिव्रता सगळे सोडून वनात गेले. तेथे तो व मी ताटातूटीने वेगळे झालो, तेव्हां पासून मी त्याला शोधत आहे. मला दुसरे कांहींही नको

अहो राजमाता, मला माझा पति जर तुम्ही मिळवून दिला तर तुमचे मोठे उपकार माझ्यावर होतील. माझा पतिसुद्धा पत्नीव्रती आहे म्हणजे तो जेथे असेल तेथे तोसुद्धा माझीच काळजी करत असेल". राजमाता तिला विचारते, "हे असें कसे झाले ते सविस्तरपणे सांगशिल कां"? दमयंती सांगू लागते, "कां कोणास ठाऊक पण माझ्या एरवी सात्त्विक जीवन जगणार्या नवर्याला कोणी द्युत खेळण्याचे आव्हान दिले व जसें क्षत्रियांना आव्हानं देण्याचे व घेण्याचे आवडते, माझ्या नवर्याने ते आव्हान स्वीकरले जरी त्याला द्युत खेळण्याचा सराव नव्हता. त्यामुळें जे व्हावयाचे तेंच घडत गेले व तो प्रत्येक द्युताच्या खेळात हरू लागला. त्यामुळें तो त्याचा प्रतिष्ठेचा प्रश्न झाला व तो आणखीन आणखीन द्युत खेळत राहिला व हरत गेला. त्याचे डोके जणू काय कोणी बधीर केले असावे असें मला वाटते कारण, माझा पति कधींच असा बेजबाबदारपणे वागलेला मी पाहिलेला नाही. त्या द्युताच्या खेळांत तो सगळे पणाला लावू लागला, शेवटी तो त्याचे निशांदांचे राज्य पणाला लावतो व तेसुद्धा हरतो. शेवटी सगळें गेल्यामुळें माझा नवरा व त्याच्या बरोबर मी त्याची पतिव्रता पत्नी अंगावरील वस्त्रानिशी घराबाहेर पडलो. ज्यांने माझ्या नवर्याला हरवले होते तो अर्थातच नवीन राजा झाला व त्याने असा फतवा काढला कीं, राज्यातील कोणीही आम्हा दोघांना मदत करणार नाही व जर कोणी आम्हाला मदत केली तर त्याला देहदंड दिला जाईल. त्यामुळें आम्ही पूर्णपणे असहाय झालो. आम्हाला कोणी साधी ओळखसुद्धा दाखवण्यास धजेनात. आम्ही जवळच्या रानात राहू लागलो जे आमच्या राज्यात नव्हते. तेथे आम्ही धड झोपू शकत नव्हतो. उपासमार व तहान ह्यांने आमचे दिवस जगणे मुष्किल झाले होते. एकदा खाण्यासाठी थव्याने बसलेल्या पक्षांवर माझा पति त्याचे वस्त्र टाकतो, जसे पारधी टाकतात, पक्षांना पकडण्यासाठी. परंतु, ते पक्षी एकत्र एकदम उडाले व त्यामुळें ते आकाशात माझ्या नवर्याचे एकुलते एक वस्त्र घेऊन गेले. माझ्या नवर्याचे वस्त्र गेल्यामुळें आम्ही दोघे माझ्या वस्त्रात एकमेकांला चिकटून राहून वापरू लागलो पण तसे वावरणे सहज नव्हते. एकदा आम्ही रानात बांधलेल्या एका छपरीत विश्रांती घेत होतो कारण उपासमार व तहान ह्यांने आमचे जीवन फार अवघड झाले होते. मी त्या परिस्थितीत गाढ झोपली असतां माझा नवरा कोठे गेला मला माहीत नाही. पण जेव्हां मी उठले ते पाहिले किं, माझा नवरा कोठेही दिसत नव्हता. तेव्हां पासून

मी त्याला शोधत फिरत आहे. फिरत फिरत मी आपल्या राज्यात आले आहे. अशारितीने दमयंती तिची दुर्दैव कहाणी राजमातेला सांगते. राजमाता तिचे बोलणे नीटपणे ऐकत असते. ती पहाते किं, ह्या मुलीची बोलण्याची पद्धत, भाषा, वागण्या बोलण्याची तर्हा, शिष्टाचाराचे तिचे वागणे असें सगळे तिने चांगले न्याहाळले व तिची खात्री पटली कीं. ही मुलगी जे सांगते ते खरेच असले पाहिजे. त्याची शहानिशा पुढे करण्याचे ती ठरवते. परंतु, तूर्त ह्या मुलीला चांगले कपडे देऊन तिचे पुनर्वसन करणे अगत्याचे आहे असें ती ठरवते. राजमातेला तिची दया येते व ती दमयंतीला बोलते, "मुली, माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. तू ह्यापुढे माझ्याबरोबर रहाशिल व आमची माणसें तुझ्या पतिचा शोध करतील. तुला आरामाची सक्त गरज आहे". ते ऐकून दमयंती राजमातेला सांगते किं, "ती त्यांच्या बरोबर रहाण्यास तयार आहे पण त्यासाठी तिच्या अटी आहेत त्या जर आपल्याला मान्य असतील तरच मी आपले यजमानपद स्वीकारू शकेन एरवी मी आपले राज्य सोडून बाहेर माझ्या पतीचा शोध चालू ठेवीन". पुढे ती सांगते, "माझ्या अटी पतिव्रतेच्या आहेत, म्हणून त्या अटींचा आपण सन्मान कराल अशी मी अपेक्षा करते. पुढे ती पतिव्रता त्या अटी सांगते, दमयंती सांगते, "मी कोणाचेही उष्टे खरकटे खाणार नाही. मी कोणाचेही पाय धुणार नाही अथवा कोणा पुरुषाच्या पाया पडणार नाही. मी दुसर्याने ज्या ताटात जेवण केले आहे त्या ताटात जेवणार नाही. मी कोणाही पुरुषाशी बोलणार नाही, मी कोणाही पुरुषाला मला स्पर्श करू देणार नाही व मला कोणी परपुरुषाने स्पर्श करता नये. जर कोणी पुरुष माझ्याशी लगट करण्याचा प्रयत्न करील तर त्याला तुम्ही कठोर शिक्षा कराल. तसेंच जर कोणी पुरुष मला प्रेमाच्या गोष्टी करून त्रास देऊ लागला तर आपण त्याला देहदंडाची शिक्षा कराल. कारण ह्या माझ्या शपथा आहेत पातिव्रत्यासाठी म्हणून आपण त्याचा सन्मान कराल तरच मी तुमच्या बरोबर रहाण्यास तयार आहे, नाहीतर मी माझ्या पतिच्या शोधात फिरत जाण्यास मोकळी असेन". "ह्या अटी आपण मान्य कराल तर ते माझ्यासाठी सुद्धा फार बरे होईल".

ते दमयंतीचे अटींने भरलेले विधान ऐकून राजमाता खूप संतुष्ट झाली. तिने दमयंतीच्या सगळ्या अटी मान्य केल्या. राजमातेला त्या मानिनीबद्दल आता विशेष कौतुक वाटू लागले

होते. राजमाता दमयंतीला बोलते कीं, तिला आता दमयंतीबद्दल विशेष अभिमान वाटतो. ते ऐकल्यावर आपल्या मातेस करावा तसा लवून प्रणिपात दमयंती करते.

वृहदस्व ऋषी पुढे सांगत असतात, नळाची कथा युधिष्ठिरीला, ते ठरल्यानंतर राजमाता आपल्या कन्येला बोलावते, त्या मुलीचे नांव होते सुनंदा. तिला सांगते कीं, ह्या महिलेस आपली पाहुणी म्हणून स्वीकार मी केला आहे तेव्हां त्या प्रमाणे योग्य तरतुद करावी. ती तुझी सैरंध्री आहे. तिला तुझी सोबतीण करून घे. तिला तिचे कक्ष तयार करून द्यावे. सुनंदा दमयंतीला मोठ्या प्रेमांने तिची मैत्रीण करून घेते. बर्याच दिवसांने दमयंतीला तिच्या योग्यतेचे वातावरण व परिस्थिती अनुभवायला मिळते म्हणून ती शांत होते. राजाचे दूत तिच्या पतिचा शोध निश्चितपणे करतील असा तिचा विश्वास होता. अखेरीस गोष्टी दमयंतीच्या मनाप्रमाणें होऊ लागतात.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा पंचावन्नावा भाग संपला.

## वनपर्व भाग छप्पन्नावा

## (नलोपाख्यान पर्व पुढे चालू)

वृहदस्व पुढे सांगतात, अरे पंडुच्या मुला आता मी तुला नळाचे काय झाले ते सांगतो, नळ दमयंतीला सोडून दूर जातो फार आत जंगलात जेथे तो एक मोठा वणवा लागलेला असतो तेथील झाडांना. त्या वणव्यातून कोणी जोर जोरांने हांका मारत असतो, "अहो दयाळू नळ राजे मला वाचवा". ते ऐकून पुढचा मागचा कसलाच विचार न करता राजा नळ त्या वणव्यात घुसतो. तेथे तो पहातो कीं, एक भलामोठा नाग वेटोळे करून पडला आहे. नळाला पाहिल्यावर तो नाग हात जोडून नळाला विनंती करतो, "अहो धनी, मी एक साप आहे, माझे नांव आहे, करकोटक, मी ऋषी नारदांला फसवले होते, त्यामुळें त्यांनी मला शाप दिला आहे. तो शाप असा होता किं, तू करकोटका येथेच असाच वेटोळ्यात अडकून पडून रहाशिल, जो पर्यंत राजा नळ तुला ह्यातून वाचवत नाही. जेव्हां तो राजा नळ तुला उचलून येथून नेईल तेव्हां तू माझ्या शापातून मुक्त होशिल. त्या शापामुळें मी अजिबात हालचाल करू शकत नाही. मला जर तू सोडवलेस तर मी तुझ्या भल्याच्या गोष्टी तुला सांगेन. मी तुझा मित्र असेन माझ्यासारखा नाग दुसरा नाही. माझे तुला वजन जाणवणार नाही. मला उचलून ह्या वणव्यातून बाहेर काढ. मग आपण वेगांने ह्या आगीपासून दूर जाऊ". एवढे बोलल्यावर करकोटक आंगठ्या एवढा लहान होतो. त्याला उचलून नळ त्या वणव्यापासून दूर जातो. तेथे आग नसल्याने नळ त्या सापाला तेथे जमिनीवर टाकणार एवढ्यात पुन्हा करकोटक नळाला बोलतो, "अरे निशादांच्या राज्या, आणखीन कांहीं तुझी पावले मोजत टाकून चाल म्हणजे त्या वेळांत मी तुझे चांगले करू शकेन. राजा त्याप्रमाणें त्याची पावले मोजत असतो तर दहाव्या पावलाला करकोटक नळाला चांवतो व त्यामुळें तो नाग नळाच्या हातून पडतो. खाली पडणार्या त्या सापाचे स्वरुप झपाट्याने बदलू लागते, ते पाहून नळ आश्चर्यचकीत होतो. करकोटक त्याच्या मुळ आकाराचा होत असतो. राजा भयचकीत झालेला पाहून तो नाग नळाला सांगतो, "घाबरू नकोस, मी तुला वेगळे रुप दिले आहे. त्यामुळें तुला कोणीही ओळखणार नाही. त्याशिवाय मी तुला वचन देतो कीं ज्याने तुला फसवले त्याला मी चांवलो आहे. त्यामुळे तो सदैव तडफडत राहिल. कारण तुला बरबाद करणारा तुझ्यात अडकला आहे. ह्यापुढे तू सदैव अजिंक्य रहाशिल व

तुझे गेलेले वैभव तुला पुन्हा प्राप्त होईल. तो कली ज्यांने तुम्हा पतिपत्नीना वेगळे केले तो सतत तडफडत राहिल. त्या कलीने तुला मत्सरभावांने प्रेरीत होऊन बरबाद केले आहे. आता तो तुला कांहींही करू शकणार नाही. त्याला दमयंती पाहिजे होती परंतु, तू तिला तुझ्या गुणांनी जिंकले होतेस ते त्याला पहावले नाही म्हणून तो तुझ्यापाठी लागला होता. पण आता तो तुला कांहीं इजा करू शकणार नाही. माझे वीष तुझ्या नसां नसांत भिनले आहे त्यामुळे तुला कोणही साप, नाग त्रास देऊ शकणार नाही. तसेंच वेदाचार्य ब्राह्मणसुद्धा तुला शाप देऊ शकणार नाहीत. लक्षात असू दे, तुझ्या पत्नीनेसुद्धा तुला बरबाद करणार्याला म्हणजे त्या कलीला शाप दिला आहे त्यामुळें माझ्या विषाची ताकद अनेकपट वाढली आहे. माझ्या विषाचा तुला व तुझ्या पत्नीला कांहीं त्रास होणार नाही". त्यानंतर तो साप बोलला, "आता तू अरे राजा, अयोध्येला जा व ऋतुपर्णाला भेट जो द्युतात हुशार आहे. त्याला तू तुझी ओळख करून दे कीं, तू एक सारथी आहेस, आणि तुझे नांव वाहुक आहे. तो ऋतुपर्ण तुला द्युत शिकवेल त्याच्या बदल्यात तू त्याला घोडेस्वारी शिकवशिल जे त्याला जमत नाही. ऋतुपर्णा इश्वाकू घराण्याचा वारस आहे. त्याच्याशी दोस्ती करण्याने तुझा खूप फायदा होईल. त्याच्या कडून द्युत शिकल्यावर तुला तुझी सगळी संपत्ती व राज्य परत मिळवता येईल. तू तुझ्या पत्नीला व मुलांना भेटशिल. त्यानंतर तू सांगशिल तू कोण आहेस ते. आता तू होऊन गेलेल्या प्रसंगांना आठवून उगाचच चिंता करू नकोस. असें सांगितल्यानंतर करकोटक नळाला कांहीं वस्त्र देतो आणि सांगतो, जेव्हां हे वस्त्र तू नेसशील तेव्हां तू तुझ्या खर्या रुपात दिसू लागशिल. असें बोलून तो साप त्याला दोन दैवी वस्त्र देतो. एवढे सांगितल्या नंतर तो नागांचा राजा अदृष्य होतो.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा छप्पन्नावा भाग संपला.

# वनपर्व भाग सत्तावन्नावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी बोलतात, करकोटक नाग अदृष्य झाल्यावर नळ राजा अयोध्येकडे प्रवास करू लागला. दहाव्या दिवशी तो ऋतुपर्णाच्या नगरीत येतो. तेथे ऋतुपर्णाला भेटतो व स्वताची ओळख वाहुक सारथी अशी करतो. तो ऋतुपर्णाला सांगतो किं, "मी घोड्यांच्या कलेत सर्वात श्रेष्ठ आहे, मी तुमचा सारथी होऊ इच्छितो, किंबहुना, त्या उद्देशानेच मी आपल्याकडे आलो आहे". वाहुक त्याला आणखीन सांगतो किं, "एवढेच नाही तर मी एक उत्तम आचारीसुद्धा आहे व मी विविध प्रश्नांवर योग्य तोडगा सांगू शकतो तरी आपण मला आपल्यापाशी सेवेसाठी ठेवावे. मला एक संधी द्यावी म्हणजे मी माझे कसब तुम्हाला सिद्ध करून दाखवीन". ते ऐकल्यावर तो अयोध्येचा राजा ऋतुपर्णा त्याला सांगतो, "अरे वाहुका आजपासून तू माझ्याकडे रहाशिल. तुझ्या सगळ्या कला मला पहावयाच्या आहेत. मला एक चांगला घोडे तज्ज्ञ हवा आहे जर तू जसे सांगतोत तसे खरोखर असेल तर तुला चांगले भवितव्य अयोध्येत आहे. तू जर तुझी कला सिद्ध केलीस तर मी तुला घोड दलाचा मुख्य म्हणून नेमीन. तुला दहा हजार सुवर्ण एवढे वेतन मिळेल. तेथे एक घोड्याचा तज्ज्ञ आहे त्याचे नांव वर्षनेय आहे. त्याशिवाय आणखीन एक आहे त्याचे नांव जीवल आहे. असें तुम्ही तिघे मिळून काम कराल. त्या दोघां बरोबर तू मजेत राहू शकशिल". अशारितीने नळ वाहुकाच्या रुपात ऋतुपर्णाकडे चाकरी करण्यास सुरुवात करतो. ऋतुपर्णा त्याला शुभेच्छा देतो असें बोलून कीं, "अरे वाहुका, येथे तुझे कल्याण हो". मला माझे घोडे वेगांने धावावेत असें वाटते. त्यात जर तू मला मदत केलीस तर उत्तम होईल. वृहदस्व ऋषी पुढे सांगतात, कीं, नळ राजा वाहुकाच्या रुपात तेथे ऋतुपर्णाच्याकडे राहू लागतो. त्याला दमयंतीची सतत आठवण येत असें म्हणून तो दररोज एक कवन तिच्या स्मरणार्थ गात असें त्याच्या ओळी अशा होत्या. "कोठे असेल ती माझी राणी जी तहान व भूकेने व्याकूळ झाली आहे व कष्टांने थकलेली आहे, मी तिचा विचार करत आहे. ती आता कोणाच्या आधाराने रहाणार आहे, अरे देवा"? त्याचे ते काकुळतीने गाणे ऐकून एकदा त्याचा सहकारी जीवल नळाला विचारतो, "आपण सतत कोणाच्या करता असें गात असता ते सांगाल कां? मला कुतूहल वाटते त्या बद्दल". "तुम्ही तुमच्या पत्नीच्या

आठवणीने आर्त होता अहात असें वाटते". नळ त्याला उत्तर देतो, "त्या नीच माणसाबद्दल मी बोलत असतो ज्यांने त्याच्या पत्नीला एका अशा ठिकाणी एकटीला सोडून स्वतः दूर गेला आहे. तो नीच माणूस रात्री तिच्या आठवणाने झोपू शकत नाही. सगळा दैवाचा खेळ आहे". नळ रात्री एकटा असतांना दुसरे कवन गुणगुणत असें, "तो नीच जगभर फिरत शेवटी एका ठिकाणी आसरा मिळवतो. विनाकारण आपत्तीत पडलेला तो आपले दुर्दैवी जीवन जगत आहे. जेव्हां त्याच्यावर आपत्ती कोसळली तेव्हां त्याची पत्नी त्याला साथ देण्यासाठी आली, खरे तर ती तिच्या पित्याकडे जाऊ शकली असती परंतु, तिने तसें केले नाही व तो नीच मात्र संधी मिळतांच तिला एकटीला वनात सोडून पळून गेला आणि आता तिच्या आठवणीने झूरत आहे, काय करावे अशा नराचे"? अशारितीने सदैव स्वताला दोष देत तो एके काळचा निशादांचा राजा, नळ, आता ऋतुपर्णाच्या आश्रयात रहात होता.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा सत्तावान्नावा भाग संपला.

# वनपर्व भाग अठ्ठावन्नावा भाग

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वैशंपायन पुढे सांगत असतात, नळाच्या आपत्तीची साधारण कल्पना विदर्भात पोहोचते व म्हणून राजा भिम त्याचे ब्राह्मण निशादांच्या राज्यात पाठवतात. त्यांच्या बरोबर अफाट धन दौलत घेऊन तो स्वतः तेथे निघतो. तेथे गेल्यावर त्यांना समजते कीं, ते दोघे वनात निघून गेले आहेत. राजा भिम जाहिर करतो कि, जो माझ्या जावयाची व मुलीची माहिती मला आणून देईल त्याला एक हजार गाई आणि मोठी जमिनदारी मिळेल. ते समजल्यावर अनेक ब्राह्मण त्यासाठी मोठ्या आनंदाने फिरू लागतात. परंतु, त्यांना ते दोघे सापडत नाहीत. बर्याच संशोधनानंतर एक ब्राह्मण छेड्डीच्या राजधानीत असतांना त्याला त्या विचित्र बाईची माहिती मिळते. तो ब्राह्मण, ज्याचे नांव होते सुदेव, छेड्डीच्या घरी पुजा करण्यासाठी गेला असतांना त्याला दमयंती राजाच्या मुलीच्या बरोबर बसलेली तो पहातो. ती त्याला पहिल्यासारखी तेजस्वी दिसत नाही. जणूकाय एकाद्या मोठ्या आजारातून उठलेली अशी दिसत होती. त्या सगळ्या अंदाजांचा अभ्यास करून तो पक्के ठरवतो किं, ती मुलगी भिमाची कन्याच आहे. तिच्यावर दुर्दैवाचा झालेला घाला तिच्या कोमेजलेल्या मुद्रेवरून स्पष्ट होत होता. तरी तिचे मुलभूत सौंदर्य त्यातूनही उजळून दिसत होते. साक्षात कामदेवाची रती नाहीतर इंद्राची साची कां, साक्षात श्रीदेवी असं तिचे सौंदर्य त्याने पाहिले व तो निर्णय घेतो कीं, त्याला भिमाच्या मुलीचा थांगपत्ता लागला आहे. दमयंतीच्या चर्येवरून स्पष्टपणे जाणवत होते कीं, ती दुःखी आहे. बाईचा श्रेष्ठ दागिना असतो तिचा पति जर तोच नसेल तर त्या महिलेने कितीही उत्तम जडजवाहर अंगावर घातले तरी त्यामुळें ती शोभा येत नाही जी नवर्याच्या सानिध्याने प्राप्त होत असते. पतिच्या नित्य सहवासामुळें जे तेज बाईच्या मुखावर येते ते दमयंतीच्या चेहर्यावर त्याला दिसले नाही. ते पाहून त्या ब्राहाणाला तिची व नळाची दया येते. त्या वयोवृद्ध ब्राह्मणाला चिंता वाटू लागते, केव्हा ह्या दोघांचे मिलन होणार? जसें रोहीणी व चंद्राचे व्हावे. त्यांचे मिलन झाले पाहिजे असें त्या ब्राह्मणाला वाटू लागते. तो ब्राह्मण मनात ठरवतो कीं, ही वार्ता आपण राजा भिमाला सांगावयाची, त्यामुळें आपल्याला बक्षिससुद्धा मिळेल. असे ठरवल्यावर तो वृद्ध ब्राह्मण दमयंतीच्या जवळ जातो. तिला लवून वंदन करून तो बोलतो, "अहो विदर्भच्या

राजकन्ये, दमयंती, मी ब्राह्मण सुदेव तुझ्या भावाचा मित्र आहे. मी येथे तुम्हाला शोधत आलो आहे. तुमच्या पित्यांने मला आपल्याला भेटण्यास पाठवले आहे. तुझी दोनही मुलं सुखरुप आहेत पण तुमची व नळाची त्याना फार आठवण येते, प्रसंगी तुमच्या आठवणीने ती दोघ कधी कधी रडतात सुद्धा. तुझ्या पित्याने तुम्हा दोघांना शोधण्यासाठी अनेक ब्राह्मण देशो विदेशी पाठवले आहेत. सगळे तुमच्यासाठी चिंतेत आहेत. ते ऐकल्यावर दमयंती रडू लागते. वृहदस्व पुढे सांगत असतो, "अहो युधिष्ठीरा, दमयंती सुदेवाला ओळखते. ती तिच्या सगळ्या आप्तांची चौकशी करू लागते. तिचे रडणे आणखीनच वाढत जाते. दमयंतीला त्या ब्राह्मणा बरोबर एकटेच कुजबुजत असल्याचे पाहून सुनंदाला संशय येतो व ती तिच्या आईकडे तक्रार करते किं, दमयंती कोणा परपुरुषा बरोबर गप्पा मारत आहे! ती राजमातेला सांगते कीं, सैरंध्री कोण्या वृद्ध ब्राह्मणाबरोबर बोलत असून सारखी रडत आहे. तुझा भारी भरवसा होतांना, त्या मुलीवर तिच्या पातिव्रत्याबद्दल मग तू स्वतः येऊन पहा म्हणजे समजेल काय प्रकार आहे. त्यावर तो ब्राह्मण राजमातेच्या आज्ञेने तेथे तिच्यापुढे हजर होतो. आपल्याला दिलेल्या आसनावर बसून तो सगळी कहाणी सांगू लागतो. तिच्या पतिबद्दलसुद्धा तो सगळे सांगून टाकतो. ती दुर्भाग्यात कशी पडली त्याचा सविस्तर वृतांत तो राजमातेला सांगतो. राजमाता चौकशी करत असते व तो ब्राह्मण सुदेव तिच्या प्रश्नांची उत्तरं देत असतो. दमयंतीची कहाणी तो छड्डीच्या राजमातेला सांगू लागतो. अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाची अठ्ठावन्नावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकोणसाठावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

सुदेव राजमातेला सांगू लागतो, अहो महाराणी ऐका दमयंतीची कहाणी, तेथे एक गुणवान राजा विदर्भ देशी राज्य करत आहे. त्याचे नांव राजा भिमदेव आहे. त्याला एक अतिसुंदर कन्यारत्न विधात्याच्या कृपेने प्राप्त होते. तिचे नांव तेथे दमयंती असें ठेवतात. त्याच वेळी दुसरीकडे निशादांच्या राज्यात एक राजा राज्य करत असतो त्या राजाचे नांव वीरसेन होते. त्याला एक पुत्ररत्न होते. त्या सत्त्वशिल व्रतस्थ वीरसेनाला तो पुत्र होतो त्याचे नांव नळ असें ठेवले गेले होते. त्या बरोबर वीरसेनाला आणखीन एक पुत्र असतो त्याचे नांव पुष्कर असें होते. जो नळासारखा गुणी नसतो, त्याला नको ते नांद होते, त्यातला एक द्युताचा असतो. नळ कधीही द्युत खेळत नसे कारण, आपण जाणताच किं, द्युत हा वैश्यांच्या पराक्रमात येतो, त्यात साधारणपणे क्षत्रियांनी जायचं नसते. कोण्या अनाकलनीय कारणामुळें सत्प्रवृत्त नाळाला एकदां त्याच्या भावाबरोबर द्युत खेळण्याची नको ती इच्छा होते व त्यात तो पुष्कराकडून हरत जातो. तो त्याचे राज्य व सगळे धनसंपत्ती घालवल्यानंतर कोणालाही न सांगता शरमेमुळें असेल कदाचित, आपले राज्य सोडून वनात निघून जातो. त्याच्या बरोबर त्याची पतिव्रता पत्नी दमयंतीसुद्धा निघून जाते. त्या काळापासून आम्ही सगळे त्या दोघाचा शोध घेत आहोत. आज मी त्यांच्या पैकीं दमयंतीला तुमच्या घरात बसलेली पाहिली तेव्हां खरेखोटे करून शहानिशा करण्यासाठी मी त्यांना त्यांच्या नांवाने हांक मारली. दमयंतीचे विलक्षण सौंदर्य कोणीही विसरू शकत नाही त्यामुळें मी तिला पाहिल्याबरोबर तत्क्षणी तिला ओळखले व तिला विचारण्यासाठी तिच्याशी बोलण्यास गेलो कारण आता मला विदर्भच्या भिमदेवांना ही सुवार्ता द्यावी लागेल. आपण आमच्या राजांवर मोठे उपकार केले आहेत, दमयंतीला सन्मानपूर्वक आश्रय दिल्यामुळें. एवढे बोलून तो ब्राह्मण थांबतो. तिची जन्म खूण कपाळावर दोन भुवयांमध्ये आहे कमळाच्या आकाराची. तिच्या लहानपणी ती खूण स्पष्ट दिसत असें परंतु, आता ती पुष्कळशी अस्पष्ट झालेली आहे. केवळ राजकन्येच्याच भालप्रदेशात अशा खुणा असतात. अशा खुणा वयोमानाने अस्पष्ट होतात. एवढे हालअपेष्टा सहन करूनही तिचे सौंदर्य कमी झालेले नाही. त्या विरहाच्या काळात ती स्वतः बद्दल

निष्काळजी असूनही तिचे स्वाभाविक सौंदर्य कमी झालेले नाही. ती साक्षात एकादी देवता असावी असेंच तिच्या कडे पाहिल्यानंतर वाटते. त्यातून तिच्या कपाळावरील कमळाच्या आकाराचा तीळ मी पाहू शकलो. ते ऐकल्यावर सुनंदा दमयंतीच्या चेहर्यावरील धूळीचा थर पुसून पहाते. तिला एक अस्पष्ट असा तीळ तिच्या कपाळावर दिसू लागतो. सुनंदा तो राजमातेलासुद्धा दाखवते. ते पाहिल्यावर राजमाता व सुनंदा दोघी त्यांचे रडू आवरू शकत नाहीत. त्या दोघी दमयंतीला घट्ट मिठी मारतात. निष्पाप दमयंती शांतपणे त्याच्या मिठ्ठ्या स्वीकारते. राजमाता सावकाशपणे शांत आवाजात दमयंतीला बोलते किं, त्या एका मशामुळें तू माझ्या बहिणीची मुलगी आहेस हे स्पष्ट झाले आहे. मुली, तुझी आई व मी प्रसिद्ध सम्राट सुदामन जे दसमसचे राजे आहेत त्यांच्या कन्या आहोत. माझी बहिण राजा भिमदेवाला दिली होती आणि मला वीरवाहूला दिली होती. मी तुझ्या जन्माच्या वेळी आमच्या बाबांच्या वाड्यात तुला पाहिले आहे. माझे घर तुझेच आहे असें समज. ही संपत्ती सुद्धा तुझी आहे जशी माझी. ते ऐकून दमयंती लवून तिच्या मावशीला प्रणाम करते. दमयंतीच्या चेहर्यावर थोडा दिलासा मिळावा असें भाव प्रकट झाले होते. दमयंती उद्गारते, "आपण आता माझी ओळख समजला म्हणून, नाही तरी आपल्या प्रेमळपणांमुळें मी ती ओळख नसतांनासुद्धा आपल्या आश्रयात मला सुरक्षित समजत होते". आता ओळख पटल्यामुळें सगळेच माझ्याशी चांगले वागणार व त्यामुळें मी आणखीन आनंदात येथे राहू शकेन. आपण माझ्या मावशी म्हणजे आईच अहात तेव्हां मला माझ्या पित्याकडे जाण्याची परवानगी कृपया द्या. कारण, माझी दोन मुलं तेथे आहेत, मला त्यांना भेटावेसे वाटते. त्या मुलांनासुद्धा मला भेटावेसे वाटत असणार! तेसुद्धा आमच्या सारखेच दुःखी असणार! आपल्याला जर हरकत नसेल तर कृपया एका रथाची व्यवस्था करावी म्हणजे मी माझ्या मुलांकडे विदर्भात जाऊ शकेन. राजमाता तिच्या मुलांस सांगून एका रथाची व इतर व्यवस्था करून मोठ्या जाम्यानिम्याने दमयंती तिच्या पित्याच्या घरी निघते. ती विदर्भात तिच्या माहेरी पोहोचते. तिचे आप्त तिला सुरक्षित आलेली पाहून अत्यानंदी होतात. ब्राह्मणांचे कडून सर्व विधी पूर्वक तिचे आगमन विधी सारे केले जातात. सुदेवाच्या प्रयत्नामुळें त्यांची कन्या त्यांना मिळाली म्हणून राजा भिमदेव त्याला ठरलेली बक्षिसाची रक्कम आणि इतर गोष्टी देतो. त्या दिवशी ती पूर्ण

विश्रांती घेते व दुसर्या दिवशी दमयंती तिच्या आईला सांगते किं, "जर तुला मी जीवंत रहावी असें वाटत असेल तर काय वाटेल ते करा, पण माझा नळ शोधून काढा. त्याच्याशिवाय मी फार काळ जगू शकणार नाही". ते दमयंतीचे उद्गार ऐकल्यावर तिची आई दुःखाने रडू लागते कारण नळाला आणणे कसे ते कोणालाही माहित नव्हते. ती आई तिला कसलेही आश्वासन देऊ शकत नाही. दमयंतीच्या आईची ती केविलवाणी अवस्था पाहून त्या अंतःपुरातील सगळें दुःखाने "अरे रे", असें बोलतात, त्यापेक्षा दुसरे कांहीं ते करण्यात असमर्थ होते. त्यानंतर ती राणी भिमदेवाला, तिच्या पतीला दमयंतीची मागणी सांगते आणि विनंती करते कीं, राजाने आपले दूत पाठवून कांहीही करून आपल्या जावयाला हुडकून काढले पाहिजे. त्याप्रमाणें आदेश निघतात. राजाचे ब्राह्मण सर्व दिशांना पाठवले जातात नळाला हुडकण्यासाठी. कारण नळाची भेट होत नाही तोवर दमयंती तशा अर्ध्या कापडातच रहाण्याची प्रतिज्ञा घेते. कारण, जेव्हां नळ तिला सोडून गेला तेव्हां ती तशा पहेरावात होती. अशा प्रतिज्ञेमुळें नळाला शोधून काढणे अधिकच अगत्याचे होते.
दमयंती बापाला सांगते, "प्रत्येक राज्यात जाऊन ओरडून विचारा, तो मला अशा अवस्थेत सोडून जाणारा कोठे गडप झाला आहे. माझे अर्धे वस्त्र फाडून तो परागंदा झाला आहे. मला एकटीला तशा अवस्थेत सोडून गेला त्याला शोधून काढा. त्या माणसाला तुम्ही सांगा पत्नीला असें सोडून जाता येत नाही जेव्हां ती त्याची पतिव्रता आहे. पतिला त्याच्या कर्तव्याची आठवण कां करून द्यावा लागते? एवढे मोठे घराणे, ख्याती, गुणांबद्दल असलेली विशेषता काय कामाची"? कोठे गेली कर्तव्य तत्परता? असें आहे कां कीं, माझ्या दुर्भाग्यामुळे हे घडले असें समजून तू मला सोडलेस कां"? तसे असेल तर माझ्यावर दया कर व परत ये. तुला कोणीही कांहींही दोष देणार नाहीत. माझा नवरा असा दिसतो कीं, तो सहसा लपू शकणार नाही. म्हणून त्याला हुडकणे अवघड जाणार नाही. ती ब्राह्मणांना सांगते तुम्ही त्याची माहिती आणा कारण तो जसा असेल तसा मला हवा आहे. त्याला शोधतांना त्याचा बभ्रा करू नका कारण नाहीतर तो मला टाळण्यासाठी कोठेतरी पळून जाईल. मला माहीत आहे तो माझ्या दैवापासून दूर जात आहे. म्हणून शोध मोहीम सावधगिरीने चालवली पाहिजे. त्याला समजले नाही पाहिजे कीं, त्याचा शोध होतला जात आहे. शोध पूर्ण होत नाही तोपर्यंत परत येऊ नका, असा ती हुकूम त्या

ब्राह्मणांना करते. त्या आदेशानुसार ते धूर्त ब्राह्मण चारही दिशांना पसरले. नळाचा चेहरा सगळ्यांना चांगलाच परिचीत असल्यामुळें त्याप्रमाणे ते त्याचा शोध घेण्यास सुरुवात करतात. बाजार पेठा, सन्याशांचे अड्डे, गुराख्याची ठिकाणे असें सगळे ते पहात असतात. शोधण्यासारखी एकही जागा ते सोडत नाहीत. दमयंतीच्या सांगण्या प्रमाणें शोध कार्य चालू असते.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा एकोणसाठावा भाग संपला.

# वनपर्व भाग साठावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगत असतात, बर्याच वर्षानंतर एक ब्राह्मण परनाद नांवाचा विदर्भ राज्यात परत येतो. तेथे आल्यावर तो परनाद दमयंतीला सांगतो कीं, "नळ राजाच्या शोधात फिरत असतांना तो अयोध्या नगरीला गेला असतां तेथे तो भंगासुराच्या मुलाला ऋतुपर्णाला भेटला होता. तेथे त्यांने ऋतुपर्णाच्या समोर आपल्या नांवाचा पुन्हा पुन्हा उल्लेख केला असतांना तो आणि त्याचे कारभारी त्याबद्दल कांही सांगू शकले नाहीत. ती राजाची व त्याच्या कारभार्यांची भेट आटोपून मी बाहेर आलो असतांना एक इसम ज्याचे नांव वाहुक आहे असें त्यांने मला सांगितले, मला बोलला, खर्या पतिव्रता कितीही आपत्ती आली तरी आपले तेजस्वी व्रत कदापिही सोडत नाहीत. असें बोलून तो सावळ्या वर्णाचा कुरूप दिसणारा तोकड्या हाताचा माणूस माझ्या समोर सतत रडत होता. त्याला कसले दुःख झाले होते ते समजले नाही. त्याची अधिक माहिती काढली तेव्हां मला समजले किं तो ऋतुपर्णाचा सारथी आहे व एक उत्तम स्वयंपाकी सुद्धा आहे आणि आणखीन एक गोष्ट त्याची सांगतात कीं, जेव्हां काम नसते तेव्हां तो शुन्यात नजर लावून सारखा अश्रू ढाळत असतो. असें समजतात किं, तो व त्याची पत्नी ह्यांच्यात ताटातूट झाली व त्या वेळेपासून त्याची अशी अवस्था झाली आहे. परंतु, तो एक सत्वशिल इसम आहे. विशेष म्हणजे तो सारखा पतिव्रता स्त्रीयांबद्दल बोलत असतो कारण असें सांगतात किं, त्याची पत्नी पतिव्रता आहे. पतिव्रता त्यांच्या तत्त्वनिष्ठेमुळें कशा स्वर्गात जातात ते तो मला उगाचच सांगत होता. त्यांनी आपल्या प्रकृतीची चौकशी सुद्धा केली जसें काय तो सारथी वाहुक आपल्याला फार पूर्वीपासून ओळखत आहे. त्याचे मला नवल वाटले. त्याची पत्नी त्याची आठवण काढत असेल त्याचे त्याला फार वाटत असावे कारण तो मला न विचारता सांगत होता किं, ज्या प्रकारे तो त्याच्या पत्नीपासून विभक्त झाला त्यामुळें त्याच्या बायकोच्या मनात वाहुकाबद्दल अनेक गैरसमज उत्पन्न झाले असतील. तो सांगत होता किं, जेव्हां त्याची बायको त्याच्यापासून विभक्त झाली तेव्हां त्यांचे एकच वस्त्र होते व त्याचा अर्धा तुकडा अजून त्यांनी जपून ठेवला आहे तिची आठवण म्हणून. मी कांहींही न विचारता तो सारथी स्वताहून मला सांगत होता किं, तोसुद्धा पत्नीव्रत आहे. पुढे तो ब्राह्मण दमयंतीला

सांगतो किं, सध्या तो ऋतुपर्वाला घोड्यांचे शास्त्र शिकवत आहे. त्या बदल्यात तो ऋतुपर्वाकडून द्युत विद्या शिकू इच्छित आहे". परनाद पुढे सांगतो किं, "वाहुकाच्या व नळाच्या कथेत असलेले साम्य लक्षात आल्यावर त्यांने ठरवले कीं, ते सगळे दमयंतीला सांगितले पाहिजे म्हणून तो तिला वाहुकाची कथा सांगत आहे. एक रुपरंगाचा भेद सोडला तर वाहुकाचे व नळाचे त्यांच्या पत्नींपासून विभक्त होण्याचे विवेचन ह्यात कमालीचे साम्य मला आढळले म्हणून मी तुम्हाला ते सांगत आहे, अर्थात् त्याचा इतर कोणताही अर्थ काढू नये". परनाद हात जोडून क्षमायाचना करतो, त्याला दमयंती अभय देते.

परनादाचे ते कथन ऐकून जमयंतीच्या मनात विचारांचे काहूर माजले. तिला पुन्हा दुःखाचा उमाळा आला. घाबरलेल्या अवस्थेत ती अभागिनी तिच्या मातोश्रीला बोलते, "आई, बाबांना कांहीं सांगू नकोस पण मला त्या वाहुकाला जाऊन भेटावे असें वाटते. माझ्या अशारितीने भेटण्याचा कोणी गैरार्थ काढील सुद्धा पण मला त्या सारथ्यास भेटणे जरुरीचे आहे असें माझे मन मला सांगते". पुढे दमयंती तिच्या मातेस सांगते किं, "ह्या कामासाठी ब्राह्मण सुदेव चांगले आहेत. त्यांना प्रथम आपण वाहुकाला भेटण्यास पाठवावे. परंतु, त्याची साधी भणकसुद्धा राजाला लागता कामा नये कारण, हा फक्त एक प्रयत्न आहे व त्याचे परिणाम आपल्यापैकीं कोणालाही ज्ञात नाहीत. अग आई, मला फक्त खर्या खोट्याची शहानिशा करावयाची आहे. सुदेवांना त्वरित अयोध्येस पाठवावे".

दमयंती परनादाला बोलावते व त्याची चांगली खातरजमा करते, त्याला भरपूर दानं करते व सांगते, "जेव्हां माझा नळ येथे येईल तेव्हां मी तुम्हाला आणखीन दानं करीन". ती पुढे त्या ब्राह्मणाला सांगते किं, "त्यानी फार मोठे काम तिच्यासाठी केले आहे". ते ऐकल्यावर संतुष्ट झालेला परनाद तिच्यासाठी शुभेच्छा करणार्या प्रार्थना करतो व तिला आशिर्वाद देतो.

तो गेल्यानंतर दमयंती सुदेवाला बोलावणे धाडते. त्याला तिच्या आईच्या समक्ष सांगते, "अहो सुदेव, आपण त्वरित अयोध्या नगरीस जाऊन त्याच्या राज्यास सांगावे किं, भिमाची मुलगी पुन्हा एकदा स्वयंवर करण्याचा विचार करत आहे. सगळ्या राजांना आमंत्रणं आधीच गेली आहेत, तरी आपण आपल्या रथाने उद्याच निघावे कारण स्वयंवर त्वरित होणार आहे. हा दुसरा स्वयंवर असल्यामुळें त्याची फार जाहिरात करावयाची

नाही. उद्याच पहाटे करण्याचे योजले आहे. म्हणून आपण कृपया फार वेळ न दवडता विदर्भात यावे. आपल्याकडे एक हुशार सारथी आहे त्यामुळें तो आपला रथ वार्याच्या वेगांने पळवत आणू शकेल असा विश्वास आहे. दमयंती तिचा दुसरा विवाह आयोजित आहे कारण तिला वाटते तिच्या पहिल्या नवर्याला, नळाला जंगली प्राण्यांनी भक्ष्य केले असावे.
तो निरोप घेऊन ब्राह्मण सुदेव अयोध्येकडे निघतो.
अशारीतीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा साठावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकसष्ठावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व  सांगत असतात नळाची कथा युधिष्ठीराला, सुदेव अयोध्येत पोहोचतो व तेथील राजा ऋतुपर्णास भेटून दमयंतीचा निरोप सांगतो. ते ऐकल्यावर राजा आपल्या विश्वासू सारथ्याला, वाहुकाला प्रेमांने बोलावतो व सांगतो, "एक तातडीचे काम आहे, त्यासाठी तू मला घेऊन विदर्भात राजा भिमदेवाकडे जाणार आहेस. त्यासाठी रथ तयार करून ठेव". सारथी वाहुक कुतूहल जागृत झाल्यामुळें राजाला नम्रतापूर्वक विचारतो त्याचे कारण. तेव्हां ऋतुपर्ण त्याला सुवार्ता देतो किं, भिमाची कन्या तिचा दुसरा स्वयंवर करण्याचे योजत आहे व मला त्यासाठी अगत्याचे आमंत्रण आहे, म्हणून आपल्याला गेले पाहिजे. पुढे तो राजा निष्पाप बुद्धीने वाहुकाला बोलतो, अशी पत्नी मिळावयाला भाग्य लागते व जर मी भाग्यवान असेन तर ती माझ्या गळ्यात वरमाळा घालेल. हे बोलतांना राजा ऋतुपर्णा फार खूष असल्याचे वाहुक पहातो. पुढे राजा त्याला सांगतो किं, भिमदेवाला असें वाटते कीं, त्या आपत्तीच्या प्रसंगी बहुतेक करून वन्यप्राण्यानी नळाला भक्ष्य केले असावे. असे त्यांचे ब्राह्मण सांगत होता आणि म्हणून हा दुसरा स्वयंवर होणार आहे. युधिष्ठीरा ते ऐकून नळाचे हृदय फाटते कीं, काय अशी त्याची गत झाली. वाहुक विचार करू लागतो, असें कसें दमयंती करू शकते, कदाचित तिचे माझ्यावरील प्रेम संपुष्टात आले असावे कारण ज्या पद्धतीने मी तिचा त्याग केला ते निश्चेतच अक्षम्य होते. त्याचे पुरुषी मन त्याला सांगते बायकाच्या मनाचा ठाव घेता येत नाही. कदाचित तिला तिच्या ह्या निर्णयाचा पश्चात्ताप होईल सुद्धा पण तेव्हां वेळ गेलेली असेल. कदाचित दमयंतीचा हा मला शोधण्यासाठीचा प्रयत्न असेल. असें विविध विचार व प्रश्न त्याच्या मनात येत रहातात. अखेरीस नळ ठरवतो कीं, कोणताही अंदाज करत रहाण्यापेक्षा नेमके काय घडते ते धैर्याने पहात रहाणे हेंच सद्य परिस्थितीत रास्त ठरते. जर घाई न करता आपण ह्या परिस्थितीला सामोरी गेलो तर ते दोघांच्या हिताचे होईल असा विचार तो निश्चित करतो. वाहुक ऋतुपर्णाला हात जोडून नम्रपणे बोलतो किं तो ताबडतोब रथ जोडून तयार करत आहे व आपण एका दिवसांत विदर्भला सहजपणे जाऊ शकतो.

वाहुक तबेल्याच जातो व घोड्यांची पहाणी करू लागतो. तो चांगले घोडे निवडतो जे लांबच्या प्रवासासाठी योग्य असतात. ऋतुपर्ण तेथे येतो व पहातो किं, वाहुकांने निवडलेले घोडे जरा जास्त किरकोळ प्रकृतीचे आहेत, म्हणून तो त्याचा नाराजी सांगतो. परंतु, नंतर तो आपले विचार बदलतो व बोलतो किं, घोडे निवडण्याची जबाबदारी वाहुकाची आहे व त्यात हस्तक्षेप करणे अयोग्य होईल म्हणून नंतर तो वाहुकाला जे घोडे योग्य वाटतात ते घेण्याची परवानगी देतो. दुसरा सारथी वर्षनेय ते पहात असतो. वाहुक राजाला दाखवतो किं चांगले घोडे कसे निवडावे. उत्तम घोड्याची लक्षणं तो राजाला दाखवतो. त्याची घोड्यांबद्दलची कसब वाखाणण्यासारखी होती. त्याचे काम पाहून वर्षनेयाला सारखी त्याच्या जुन्या मालकाची नळाची आठवण येत असते. तो वाहुकाचे कसब पाहून कधी विचार करतो किं. हा इंद्राचा सारथी मताली तर रुपरंग बदलून आला आहे कां? तो असें घोडे निवडतो जे सिंधू प्रांतातून आलेले आहेत कारण त्या घोड्याच्या प्रजाती वार्यासारख्या धावतात. शेवटी नळ त्याच्या पसंतीचे घोडे जोडून रथ तयार करतो. ती तयारी पाहून अयोध्येचा राजा समाधान व्यक्त करतो. वर्षनेय रथ चालवण्यासाठी बसतो. रथाच्या चाकांचा कडकडाट ऐकून ऋतुपर्णा खूष होतो. सलीहोत्र ऋषींनी घोड्यांचे शास्त्र सांगितले तो स्वतः वाहुकाच्या रुपात आला आहे असें त्याला क्षभणभर वाटते. वर्षनेय समजून चुकतो किं, ह्या वाहुकाचे घोड्यांबद्दलचे ज्ञान त्याच्या जुन्या मालका इतकेच आहे. ते दोघे एकाच वयाचे आहेत. त्यांच्या इतर गोष्टीत सुद्धा भारी साम्य आहे. वर्षनेय विचार करतो, जाणकार लोक सांगतात, "भाग्य फिरल्याने माणसे वेगळी भासू लागतात, कदाचित् हा वाहुक नळच तर नाही नां"? कदाचित् दैव फिरल्यामुळें माणसें आपले रुप बदलून जगात वावरत असतात. असें विलक्षण विचार वर्षनेयाच्या मनात येत रहातात. अशारितीने तो नळाचा सारथी आपल्या विचारात मग्न होतो. ऋतुपर्णसुद्धा तशाच प्रकारच्या विचारात गुंतलेला दिसतो. आता तो रथ विदर्भाकडे निघतो. ऋतुपर्णा खूषीत असतो.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा एकसष्ठावा भाग संपला.

# वनपर्व भाग बासष्ठावा

## (नलोपाख्यान पर्व पुढे चालू)

वृहदस्व पुढे सांगतात, जसे एकादा पक्षी आकाशातून लिलया उडतो तसा ऋतुपर्णाचा रथ रस्यावरून वेगांने जात होता. वाटेत येणारे पर्वत, नद्या, वनं, तलाव, सरोवरं, अशा सगळ्या गोष्टींना पार करत तो रथ झपाट्याने विदर्भाकडे जात होता. त्या वेगामुळें ऋतुपर्णाच्या अंगावरील उपरणे हवेच्या झोक्यामुळें त्याच्या अंगावरून उडले व मागे राहिले, तर रथ वेगांने फार पुढे गेलेला असतो. ऋतुपर्णा वाहुकाला रथ थांबवण्यास सांगतो. वाहुक त्याला बोलतो, रथाच्या वेगामुळें आता पावेतो ते उपरणे एक योजनं लांब मागे राहिले आहे. त्यामुळें ते आणण्यास परत फिरण्याची आवश्यकता दिसत नाही. तरी ऋतुपर्ण वर्षनेयला मागे जाऊन ते उपरणे घेऊन येण्यास सांगतो. वाहुकाला सांगतो जोवर वर्षनेय परत येत नाही तोवर रथ थांबून ठेवेल. जेथे रथ थांबला होता तेथे एक विभितक वृक्ष असतो. वेळ घालवण्यासाठी ऋतुपर्ण व वाहूक त्या वृक्षाचे निरीक्षण करतात. राजा वाहुकाला सांगतो, माझे गणिताचे ज्ञान इतके चांगले आहे कीं मी त्या वृक्षास किती पांनं आहेत ते येथून सांगू शकतो. एवढेच नाही तर किती फळं लागली आहेत ते सुद्धा तंतोतंत सांगू शकतो. ह्यावरून माझी गणितातील ज्ञानाची तुला कल्पना येईल. सगळ्या लोंकांना असें सांगता येणार नाही. कोणीही सगळ्या शास्त्रात तज्ज्ञ होत नाही. पुढे राजा वाहुकाला खात्रीने सांगतो, ह्या झाडाची जमिनीवर पडलेली पानं झाडांवर असलेल्या पानांपेक्षा एकशेएक संख्येने जास्त आहेत. फक्त दोन फांद्यांवर दोन लाख पानं आहेत असें तो सांगतो. वाहुक बोलतो, ते खरे आहे कीं नाही ते पहाण्यासाठी पानं प्रत्यक्ष मोजावी लागतील. तरच तुमचे खरे कां नाही ते सिद्ध होईल. असें बोलल्यावर राजा त्याला त्या दोन फांद्या कापावयाची परवानगी देतो. त्या आधी वाहुकाने आधी जमिनीवर पडलेली पानं मोजलेली असतात. जेव्हा खरोखरच ती मोजली जातात तेव्हां राजाचा अंदाज खरा असल्याचे दिसते. फळं मोजावयाची राहिली होती, त्यासाठी वाहुक राजाला सांगतो वर्षनेयाला घोड्यांचे लगाम धरावयाला सांगतो. राजा वाहुकाला बोलतो, अरे त्यासाठी आपल्याला वेळ नाही. मला मोजावयाला थोडाच वेळ लागेल पण आपल्याला घाई असेल तर वर्षनेयाला रथ घेऊन जाऊद्या. मी मोजत बसतो. ते ऐकल्यावर ऋतुपर्ण त्याला

बोलतो, "अरे, तूच असा सारथी आहेस जो रथ अशा वेगांने घेऊन जाऊ शकतो. मी तुझ्या सम्मतीनेच विदर्भात जाण्याचे ठरवले. आता अडचण करू नकोस". ते ऐकल्यावर वाहुक राजाला सांगतो, काळजी नसावी, पानं व फळं मोजल्यावर मी रथ योग्य वेळी विदर्भात घेऊन जाण्याचे आश्वासन आपल्याला देतो. ते ऐकल्यावर नाराजीत ऋतुपर्ण त्याला पानं मोजण्याची परवानगी देतो. सगळी पानं मोजल्यावर जर तुझा माझ्या गणिताच्या ज्ञानावर विश्वास बसणार आहे तर मग तसें होऊदे. ते बोलणे झाल्यावर वाहुक रथातून उतरतो व त्या झाडाच्या दोन फांद्या छाटून त्याची पानं मोजू लागतो. झपाट्याने तो सगळी पानं मोजतो व सिद्ध होते कीं, राजाचे गणित बरोबर होते. ते समजल्यावर नळ वाहुकाच्या रुपातील, ऋतुपर्णाला विनंती करतो किं, त्याला ते गणित शिकावयाचे आहे. राजाला त्वरेने विदर्भात जावयाचे असल्याने तो वाहुकाला आश्वासन देतो कीं. जर ते वेळात तेथे पोहोचले तर राजा वाहुकाला ते गणित व द्युतविद्या दोनही शिकवेल. तेथे पोहोचण्या आधीच ऋतुपर्णा वाहुकाला ते गणित व द्युतविद्या शिकवतो. जसा नळ ती विद्या शिकून त्यात तरबेज होत जातो त्याच्या अंगात बसलेला कली वाहुकाच्या म्हणजेच नळाच्या तोंडातून विष बाहेर यावे असा ओकला जावू लागला. करकोटकाने दिलेल्या विषाचा तो परिणाम होता. कली नळाच्या शरीरातून बाहेर आल्याने त्याचा प्रभाव जो नळावर होत होता तोसुद्धा संपला. कलीने नळाला फार काळ पछाडले होते, त्यासाठी नळ कलीला शाप देऊ शकत होता, नळ प्रचंड रागावला होता व त्या भितीने कली नळाला बोलतो, "मला माफ कर, मी जे केले ते अक्षम्य होते त्या बदल्यात मी तुला तुझे वैभव, राज्य पुन्हा देऊन टाकीन. कली पुढे सांगतो, तुझ्या मुलाच्या आईने मला शाप दिला आहे त्यामुळे मी आधीच मोठ्या अडचणीत आहे आणखीन तुझा शाप नको". करकोटकाच्या विषामुळें मी रात्रंदिवस जळत आहे मला वाचव, जर तू मला माफ केलेस तर मी जाहिर करतो कीं, जे तुझी हि कथा सांगतील व ऐकतील त्यांना मी कधीही त्रास देणार नाही. कलीची वैशिष्ठ्ये ज्या दोषांने व्यक्त होतात ते असें आहेत, मतभेद, गैरसमज, गर्व, मत्सर, भांडणतंटा, कलागती, विश्वासघात, संशय हे त्या माणसास बाधणार नाहीत. ते ऐकल्यानंतर नळ त्याचा

क्रोध आवरतो. तसे होताच नळाच्या अंगातून बाहेर आलेला कली त्या पाडलेल्या विभितक झाडात घूसतो. कली नळाशी बोलत असतांना इतरांना मात्र दिसत नसतो. त्या समयात त्याने सगळी फळं मोजलेली होती. ती ऋतुपर्णाने सांगितलेली तितकीच होती. कली त्याच्या अंगातून निघून गेल्यामुळें मला एक विलक्षण सुख प्राप्त झाले होते. त्यानंतर मी रथात चढतो व आम्ही पुढे निघतो. कली त्या झाडात शिरल्यामुळें त्या काळापासून ते झाड अशुभ समजले जाऊ लागले. कली नळाच्या अंगातून गेल्यामुळें त्याचा जोर पूर्वीसारखा होतो व तो त्या रथाला आकाशात उंच उडवून प्रचंड वेगांने आम्ही विदर्भाकडे जाऊ लागतो. जरी तो त्या कलीच्या जाचातून मुक्त झाला असला तरी त्याचे रुप अजून वाहुकाचेच राहीलेले असते. त्यासाठी त्याला ती दोन दैवी वस्त्रं नेसावी लागणार असतात. नळ ती न घालताच पुढे जाण्याचे ठरवतो कारण, त्याला तिच्या ह्या दुसर्या स्वयंवराचे काय प्रकरण आहे ते पहावयाचे असते.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा बासष्ठावा भाग संपला.

## वनपर्व भाग त्रेसष्ठावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगतात, वाहुकांने दिलेल्या शब्दानुसार ते विदर्भात त्या संध्याकाळी पोहोचतात. भिमदेवाच्या नगरीत, कुंदिनपुरी ते येतात. भिमदेवाला त्याच्या आगमनाची वार्ता समजते. ते समजल्यावर भिमदेव ऋतुपर्णाला वाड्यात येण्याचे आमंत्रण देतो. त्या नगरातील सगळ्यांना नळाच्या रथाच्या आवाजाची सवय होती, तो आवाज ऐकू आल्याने वाड्यातील माणसें नळ राजा आला असें समजून बाहेर येतात. त्या रथाच्या आवाजाची इतकी सवय तेथील सगळ्यांना असते कीं त्यात तेथील आगाशीवर खेळणारे मोर, तबेल्यातील घोडे, हत्ती सगळे आनंदी झाल्या सारखे वातावरण होते. दमयंतीलासुद्धा तसेंच वाटते कीं, तिचा पति आला आहे. त्या आवाजाचा थेट संबंध ती तिच्या नवर्याच्या आगमनाशी जोडते व तिला विलक्षण असा संतोष मिळतो. त्या प्रवासामुळें वर्षनेयाला सुद्धा असें वाटते कीं वाहुक हांच नळ आहे. कारण, त्याचे रथ चालवणे, घोड्यांना पारखणे, त्याचा आवाज, त्याची मुद्दे मांडण्याची तर्हा, त्याचे चालणे सगळे हुबेहुब नळासाखे होते.

त्या रथाच्या कडकडाटाच्या आवाजामुळें दमयंतीला सुद्धा असें वाटते कीं, नळ राजा रथाने आला आहे. माझ्या कपाळावरील शुभलक्षणी कमळाच्या आकाराचा मसा जो पुसट झाला आहे तो कदाचित पुन्हा उठावदार होऊन दिसेल कीं काय असें तिला वाटू लागते. दमयंती नळ गेल्यापासून स्वताबद्दल निष्कळजी झाली होती. तिला असें वाटू लागले कीं, आता पुन्हा तिने चांगले सजले पाहिजे. तो कमळाच्या आकाराचा मसा तिच्या दोन भुवयांच्या मध्ये पूर्वी दिसत असें. त्या रथाच्या आवाजाने दमयंती समजते कीं, तिचा नळ आला आहे. ती सख्यांना सांगते, मी त्याला पाहिले नाही तर मरून जाईन, मला त्यांना पहावयाचे आहे. ती नळाच्या देखण्या रुपाची तारीफ करू लागते. ती नळाच्या अनेक चांगल्या सवईबद्दल बोलू लागते. मी आज माझ्या जीवलग्याच्या मिठीत गेले नाही तर जगू शकणार नाही. तो बुलंद आवाज असलेला माझा नळ माझ्याकडे आला नाही तर मी मरून जाईन. आता त्यांने माझ्या पुढे आलेंच पाहिजे नाहीतर मी स्वताला जाळून टाकीन असें कांहींतरी ती बडबडू लागते. त्याच्या अनेक उत्तम गुणांची मला आठवण येत आहे. त्याचे

पत्नीव्रत जीवन हा माझा मोठा ठेवा आहे. माझा राजा सगळ्या राजांत माझ्यासाठी श्रेष्ठ आहे. असें कांहीं बडबडत ती वाड्याच्या आगाशीत येते. तिला तिचा नळीला पहावयाचे असते. ती पहाते किं, ऋतुपर्णाचा रथ तेथे उभा होता. भिमदेवाला, समजते कीं, अयोध्येचा राजा आपल्याला भेटावयास आला आहे. राजाला आश्चर्य वाटते कारण, असें कोणतेही प्रयोजन आयोजिलेले नव्हते कीं, त्यांने यावे परंतु, एक राजा स्वतःहून येत आहे तेव्हां त्याचे यथोचित स्वागत झाले पाहिजे, ह्या न्यायाने ऋतुपर्णाच्या स्वागताची तयारी लगबगीने केली जाते. दमयंतीला आगाशीतून त्याचा रथ दिसतो व त्याचे दोन सारथी सामानांची बांधाबांध करत असतांना ती पहाते. त्यात ती वर्षनेयाला ओळखते. कारण तो तिच्याकडे निशादांच्या राज्यात सारथी होता व त्यांनेच तिच्या दोन मुलांना, वीरसेन आणि वीरसेना, आजोळी विदर्भात आणून सोडले होते. दुसर्याला ती ओळखत नाही. तेथे ऋतुपर्णाचे स्वागत भिमदेव स्वतः करतात. ऋतुपर्ण आजुबाजूला नजर फिरवतो, त्याला स्वयंवराची कोणतीही तयारी होत असलेली दिसत नाही. न कोणी राजा न कोणी ब्राह्मण तेथे दिसत नाहीत. त्याचे त्याला नवल वाटते. त्यात भिमदेवाच्या प्रश्नाने तो अयोध्येचा राजा जास्तच अचंबित होतो. भिमदेव त्याला आदरपूर्वक विचारतात, "आपले नेहमीच आमच्या कडे स्वागत होईल परंतु, आज आपले असें अचानक येणे कसे झाले"? ऋतुपर्ण सभोवार पहातो त्याला कोणी इतर राजेरजवाडे आल्यासारखी गजबज आढळत नाही ब्राह्मणांबरोबर येणार्या साध्यांची वर्दळ त्याला दिसत नाही. तेव्हां त्याला समजते कीं, कांहींतरी गडबड आहे. तशांत तो हजरजबाबी राजा बोलतो, "मी आपली याद आली म्हणून आपल्याला सहजपणे भेटण्यास आलो आहे". ते उत्तर ऐकून राजा भिमदेव आणखीनच गोंधळतो. दमयंतीचा डाव कोणालाही माहीत नव्हता. भिमदेव विचार करू लागतो, हा राजा शंभर योजने अंतर केवळ माझी याद आली म्हणून येतो हे कांहीं त्याला पटत नाही. त्याला वाटते कांहीं खाजगी मसलत कदाचित त्याला करावयाची असेल असें समजून तो त्याच्या रहाण्याची व्यवस्था करण्याबद्दल बोलतो. भिमदेव त्या अयोध्येच्या राजाला बोलतो कीं, आपण थकला असाल तरी थोडे विश्राम करा व नंतर आपण बैठक करू. त्याप्रमाणे राजा त्याला दिलेल्या कक्षात विश्राम करण्यासाठी जातो व त्याचे सारथी घोड्यांना सराव करण्यासाठी फिरवत असतात. दमयंती आगाशीतून तो सराव पहात

असते. तिची निराशा झालेली असते कारण, त्यात तिला तिचा नळ कोठेच दिसत नाही. ऋतुपर्णाबरोबर वर्षनेय जातो परंतु, वाहुक तेथेच घोड्यांच्या तबेल्यात घोड्यांबरोबर असतो. वाहुक घोड्यांना मर्दन करत असतो, त्यांचे पाय तो तेल लावून चोळत असतो. निराश झालेली दमयंती आश्चर्य करत असते, त्या रथाच्या आवाजाचे जो, तिला तिच्या पतिची आठवण करून देत होता. ती सगळी कडे पहाते पण कोठेही तिचा प्राणनाथ तिला दिसत नाही. जरी ती वाहुकाला तबेल्यात घोडे आवरतांना पहात होती, त्याच्या बदललेल्या रुपरंगामुळें ती नळाला ओळखत नाही. वाहुकसुद्धा त्याच्या कामात इतका रंगला होता किं, तो सुद्धा दमयंतिकडे पहात नाही. ती विचार करते, वर्षनेय कदाचित नळाकडून रथ चालवण्याचे शिकला असेल पण इतके साम्य! ती विचारमग्न झालेली येरझार्या घालत तबेल्यापाशी फिरत असते. ती समजते कदाचित ऋतुपर्ण नळाइतकांच त्या कलेत तरबेज असेल. धीर करून दमयंती तबल्यात जाते व तेथे असलेल्या तिच्या सेवकांस सांगते किं, त्याने त्या दुसर्या सारथ्याला विचारावे किं, ऋतुपर्ण रथ चालवत होतां कां? तो सेवक आत जाऊन ते विचारतो तेव्हां वाहुक त्याला सांगतो किं, रथ ऋतुपर्ण चालवत नव्हता. रथ सर्व वेळ वाहुक चालवत होता. त्या उत्तराने दमयंतीचा आणखीन गोंधळ होतो. शेवटी ती तिच्या खास विश्वासातील एका सेविकेला नळाला शोधण्यासाठी सांगते.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा त्रेसष्ठावा भाग संपला.

# वनपर्व भाग चौसष्ठावा

## (नलोपाख्यान पर्व पुढे चालू )

दमयंती बोलते, तिच्या सेविकेस, "अग केसिनी, जा आणि सगळी माहीती काढ तो कोण तबेल्यात बसलेला सारथी आहे त्याची आणि मला येऊन सांग". तो माणूस दिसायला कुरूप आहे तरी त्याची माहिती त्याला विचारून काढ, त्याला न दुखवता हे काम तुला चतुराईने करावयाचे आहे. तो कुरूप असल्यामुळें अशा लोकांना कांहीं संकोच असतो म्हणून त्याला वाईट वाटणार नाही अशा बेतांने ते काम करावयाचे आहे. तू अशा कामात म्हणजे, माहीती काढण्यात हुशार आहेस म्हणून मी तुला हे काम सांगत आहे. कारण जरी तो कुरुप दिसत असला तरी माझे मन मला सांगते की, तोच माझा नळ आहे व आपली ओळख कळू नये म्हणून कांहीं क्लुप्ती करून त्याने स्वताला कुरुप केले आहे असे माझे मन मला सांगते. "अग केसिनी, मला खूप भिती वाटते, मला तुझ्या हुशारीची गरज आहे, तरी ते कर". पुढे दमयंती केसिनीला बजावते, सगळी माहिती काढल्यानंतर तू परनादाचा उल्लेख कर. त्यावर तो काय बोलतो ते नीट समजून घे. जशी केसिनी जाते वाहुकापाशी धडधडत्या छातीनें ती विश्वसुंदरी तिची प्रतिक्षा करत बसते. तरी न राहून केसिनी वाहुकाला उद्देशून बोलते, "अहो सज्जन, आमच्या येथे तुमचे स्वागत असो. मी तुम्हाला आमच्या राजकन्येचा एक निरोप देण्यासाठी आले आहे. तरी तो समजून आपण घ्याल असें मी समजते. ती समजून घेऊ इच्छिते किं आपण सगळे तिघे येथे कोणत्या उद्देशाने आला अहात ते तिला सांगावे. ते ऐकल्यावर वाहुक तिला मोठ्याने त्याच्या बुलंद आवाजात सांगतो, "अहो, सुंदरी आपल्या येथून कोणी ब्राह्मण आमच्या राजाकडे काल आला होता. तो सांगत होता किं, आपल्या राजकन्येला दुसरा स्वयंवर करावयाचा आहे म्हणून त्या आमंत्रणा प्रित्यर्थ आमचे राजे आले आहेत. वेळ फारच कमी असल्यामुळें हे सर्वोत्कृष्ट अश्व मी निवडले व ते रथाला जोडून आम्ही येथे त्वरित आलो आहोत". केसिनी त्याला विचारते, "आपण कोठले व आपले पिता कोण? मला सांगा, आपण हे काम कोणाकडे शिकलात"? त्या प्रश्नांची झोड ऐकून वाहुक शांतपणे तिला उत्तरं देऊ लागतो. "दुसरा सारथी नळ राजाचा सारथी होता. त्याचे नांव वर्षनेय आहे. नळराजा त्याचे राज्य सोडून गेल्यावर वर्षनेय नळाची दोन मुलं घेऊन विदर्भात गेला त्यानंतर तो बराच काळ

बेकार होता, अखेरीस त्याला अयोध्या नरेश ऋतुपर्णा ह्यांनी कामाला लावले व त्या काळापासून तो तेथेच काम करत आहे. मीसुद्धा नोकरी शोधत अयोध्या नरेशांना भेटलो व त्यांना अश्वविद्या शिकावयाची असल्याने मला नोकरीला लावले, तेव्हां पासून मीसुद्धा त्यांच्या कडे काम करत आहे. मी उत्तम स्वयंपाक करू शकतो म्हणून मी ते काम सुद्धा ऋतुपर्णा कडे करत असतो". ते ऐकल्यावर केसिनी त्याला विचारते, "वर्षनेयाला नळ कोठे गेला ते माहित आहे कां"? केसिनी त्याला पुढे विचारते, "वर्षनेयांने तुला नळाबद्दल कांहीं सांगितले असेलच ते काय सांगितले ते मला सांग". वाहुक बोलतो, "माझ्या माहिती प्रमाणे त्याला नळाची कांहीं माहीती असेल असें वाटत नाही. कारण, माझ्या माहीतीप्रमाणे तो विदर्भात नळाच्या मुलांना सोडल्यानंतर परत निशाद देशी गेलाच नाही. त्याचा कांहींच संबंध त्या जागेशी राहिला नव्हता, पण त्याबद्दल जे खरे ते फक्त वर्षनेयच सांगू शकेल". ते ऐकल्यावर ती धूर्त केसिनी त्याला बोलते, "कदाचित नळ रुप बदलून दुसरे नांव घेऊन रहात असेल असें तुम्हाला वाटते कां"? वाहुक कांहीं कमी सावध नसतो, तो सांगतो, "ह्याबद्दल फक्त नळराजांच खरे काय ते सांगू शकतो"! केसिनी कांहीं कमी नव्हती, तिने तिचे तीर सोडावयाला सुरुवात केली, ती बोलली, "माझ्या माहितीप्रमाणे एक ब्राह्मण नांव परनाद सांगत होते किं, तू एकांतात रडत असतोस व असें कांहीं बोलत असतोस किं, तुझी व तुझ्या पत्नीची ताटातूट झाली आहे व त्या निमित्ताने तू कांहीं कवन गात असतोस. हा काय प्रकार आहे"? तू त्या कवनांत सांगतोस कीं, तू तुझ्या बायकोचे अर्धे वस्त्र नेसून निघाला होतास व तिच्या आठवणीने तू झुरत आहेस, हा काय प्रकार आहे तुझ्या जीवनातील ते सांग. तू असं सुद्धा दुसर्या कवनांत सांगतोस कीं, तिचे ते अर्धे वस्त्र तू अजून जपून ठेवले आहेस, हा काय प्रकार आहे"? "तुझ्या जीवनात ते जे प्रसंग घडले त्याची मला माहीती सांग"?. केसिनी वाहुकाला विचारत रहाते, "तू तुझ्या पत्नीला असें कसें सोडलेस, अशी कोणती परिस्थिती झाली म्हणून तू तसे केलेस. मला सांग आता तुझी पत्नी कोठे आहे"? केसिनी त्याला सांगते कीं, "आमच्या राजकन्येला तुझी सगळी कर्म कहाणी स्वतः तुझ्या तोंडून ऐकावयाची आहे तर तू त्याला तयार आहेस कां"? एवढ्याने त्या चतूर सेविकेचे समाधान झाले नाही, ती त्याला विचारते, "अहो वाहुक आपला आवाज व बोलण्याची भाषा सगळे आमच्या नळ राजा सारखे कसे आहे? इतके

साम्य कसें शक्य होईल? एक मुद्रा सोडली तर बाकी सगळे इतके कसे जुळते? तुमची उंची, आवाज, बोलण्याची ढब, शरीराच्या हालचाली, रथ हाकण्याची ढब, आपलें घोड्याचे ज्ञान व आपले पाककलेचे ज्ञान अशा सगळ्या गोष्टी दोघांच्या इतक्या कशा जुळतात"? म्हणून तुम्हाला आमची राजकन्या प्रत्यक्ष भेटू इच्छिते, त्याला आपला कांहीं आक्षेप आहे कां"?

वृहदस्व ऋषी युधिष्ठीराला सांगत असतात नळाची कथा, ते पुढे सांगतात किं, ती दमयंतीची सेविका वाहुकाच्या चेहर्यावरील बारीक सारीक भाव टीपत असते. नळाच्या गोष्टी तिने सुरु केल्या व त्याच्यांतील व वाहुकातील साम्यावर ती भाष्य करते तेव्हां नळाला त्याच्या भावना आवरता येत नाहीत. त्याच्या डोळ्यात अश्रू येतात व ते तो आवरू शकत नाही. ते अश्रू केसिनी पहाते. वाहुक त्याची ती कवन पुन्हा गाऊ लागतो, "ती पतिव्रता, दुःखाने चिंब भिजली तरी स्वताचा तोल जाऊ देत नाही. त्यामुळें तिचे स्वर्गात जाणे निश्चित आहे, ती पतिव्रता जिला तिच्या पतिने तिच्या नकळत सोडले तरी ती त्याच्यावर रागावली नाही, आणि आपले पवित्र जीवन जगत राहीली, अशारितीने टाकलेली बाई भ्रष्ट होते पण ती पूर्ण पवित्रच राहिली, खरेतर ती त्या पतिवर रागावली पाहिजे पण ती त्याच्यावरील प्रेमामुळें त्याला क्षमा करते, त्याचे कपडे पक्षांनी नेले म्हणून जो पत्नीच्या कपड्यात वावरू लागला तो त्या अवस्थेत तो कपडा फाडून निघून जातो तरी ती पवित्र पतिव्रता त्याच्यवर रागवत नाहीस, कारण तिला माहीत आहे की, तो आधीच त्याचे सर्वस्व हरवून बसलेला, उपासमारीने व तहानेने बेजार झालेला असा आहे त्याच्यावर काय रागवावयाचे"?

त्याचे ते कवन सगळे स्पष्ट करत असते. तो रडू लागतो. ते पाहून केसिनी दमयंतीला जाऊन ते जे घडले ते सविस्तरपणे सांगते, त्याच्या ओक्साबोक्शी रडण्याचे सुद्धा सांगते. अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा चौसष्ठावा भाग संपला.

# वनपर्व भाग पासष्ठावा

## ( नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व पुढे सांगतात, केसिनी जसें ते वाहुकाचे बोलणे व कवन दमयंतीला सांगते तशी ती पतिव्रता आणखीन एका दुःखाच्या आवेगात जाते. ती स्वतःला थांबवू शकत नाही, तरी आणखीन जास्त माहिती मिळवण्याची आवश्यकता आहे असें तिचे मन सांगते. दमयंतीला आता बहुतेक खात्री होते कीं, तिचा नळासाठीचा शोध शेवटच्या अवस्थेत आहे. आणखीन कांहीं गोष्टी निश्चित व्हावयाच्या होत्या. ती केसिनीला बोलते, अग केसिनी, तू पुष्कळ मोठे काम केले आहेस तरी आणखीन खात्री करण्यासाठा तुला त्याच्याशी दोस्ती करून त्याच्या सगळ्या सवयी निरखाव्या लागतील. त्या कोणत्या सवयी ते सांगत्ये, जेव्हां तो पाणी अथवा अग्नी पुजेसाठी मागील तेव्हां ते चटकन देऊ नकोस, त्याची त्यामुळें कोणती प्रतिक्रिया होते ते पहा व मला येऊन सांग. त्याच्या हालचालीत कांहीं मानवी अथवा दैवी प्रभाव दिसेल त्याचे चांगले निरीक्षण करून ते मला सांग. अशारितीने केसिनीने त्याच्या प्रत्येक हालचालीचे बारीक निरीक्षण केले व ते दमयंतीला सविस्तरपणे सांगितले. केसिनी दमयंतीला सांगते कीं त्या माणसाचा स्वतः वरील संयम विलक्षण आहे. तिला कांहीं गोष्टींचे विशेष आश्चर्य वाटते, ती सांगते किं, जेव्हा रस्त्यावरून रथ तो नेत असतो तेव्हां तो रस्ता त्याच्या गरजेनुसार आपले स्वरूप बदलत असतो. कांहीं वेळा अरुंद रस्ता त्याचा रथ आला किं, रुंद होतो म्हणजे त्याचा रथ आरामात जाऊ शकेल. केसिनी आणखीन कांहीं सांगते, भिमदेवांनी त्या पाहूण्यांसाठी विविध प्राण्याचे मांस दिले होते. त्याला स्वच्छ करण्यासाठी पाण्याची भांडी होती, ती सांगते, वाहुकाने त्या भांड्यांकडे नुसते पाहिले तरी ती भांडी पाण्याने भरत असत. जेव्हां चुल पेटवायची तर त्यासाठी वाहुक गवताची जुडी सूर्याच्या किरणात पकडत असें व त्याबरोबर ती जुडी पेट घेत असे. ते पाहून केसिनी आश्चर्यचकीत झाली. जरी गवत पेटले तरी त्याच्या हाताला कांहीं इजा होत नव्हती. आणखीन एक चमत्कार तिने दमयंतीला सांगितला, वाहुक सुगंधी फुल हातांने चुरगळतो, तेव्हा ती कोमेजत नव्हती तर उलट आणखीन जास्त सुगंधी होत होती. त्याचे रथ चालवणेसुद्धा तसेंच चमत्कारीक होते कारण, त्याचा रथ हवेत उडत असें.

वृहदस्व पुढे सांगतात, वाहुकाच्या त्या करामती समजल्यावर दमयंतीला खात्री होते कीं, वाहुक हांच तिचा पति नळ आहे. पण त्याच्या चेहर्याचे काय झाले? तरी आणखीन एक चाचणी दमयंती करू इच्छिते, ती केसिनीला सांगते किं, त्यांच्या स्वयंपाक घरात जा आणि वाहुकांने शिजवलेली मांसाची रजडी (तुकडा) घेऊन ये. केसिनी त्वरीत त्यांच्या स्वयंपाकघरात जाते व एक ताजा शिजलेला मांसाचा तुकडा घेऊन दमयंतीकडे येते. ते मांस दमयंती खाते व आता तिची पूर्ण खात्री होते कीं, वाहुक हांच नळ आहे. माझा नळ इतका जवळ असूनही मी त्याला आलिंगन देऊ शकत नाही ह्या कल्पनेने दमयंती आणखीनच कष्टी होते. ती मोठ्याने रडावयाला लागते. दमयंती भावनाविवश झालेली तिच्या दोन बछड्यांना बोलावते व सांगते जा तुमच्या वडलांच्या पाया पडून या. आणि केसिनीला सांगते किं, ती त्या दोन मुलांना वीरसेन व वीरसेना ह्यांना घेऊन वाहुकाकडे जा आणि त्यांना पाया पडावयाला सांग. जसें ती छोटी मुलं वाहुकाकडे जातात, तो त्यांचा बाप त्यांना ओळखतो व अनावर झालेल्या भावूकतेने तो त्यांना उचलून घेतो व त्याची चुंबन घेऊ लागतो. आता सगळे स्पष्ट झाले होते. नळाचा शोध पूर्ण झाला होता. परंतु, अजून त्या विचित्र चेहर्याचा प्रश्न उरला होता. त्या दोनही बालकांना आपल्या मांडीवर घेऊन तो राजा अनावर झाल्यासारखा मोठ्या मोठ्याने रडू लागतो जसे सहसा पुरुष रडत नाहीत. तो पुन्हा पुन्हा त्याच्या मुलांना वेगांने मिठ्या मारत रहातो. दुसरीकडे दमयंतीला ते मिलन अनावर होते व तीसुद्धा मोठ्याने हंबरडा फोडून ओक्साबोक्षी रडत रहाते. सगळे वाड्यातील मंडळी हे काय होत आहे ते चटकन न समजल्यामुळें गोंधळून जातात. जो तो आपापल्या कक्षातून बाहेर येऊन काय झाले म्हणून विचारत सुटतात. वाहुक खाली तबेल्याच्या जवळ असतो व दमयंती तिच्या सज्जात असते असें ते दोघे एकमेकांपासून दूर असूनही अगदी जवळ असल्यासारखे एका आवाजात रडत असतात. थोड्या वेळानंतर वाहुक स्वताला सावरतो व केसिनीला समजावण्याच्या सुरात बोलतो, अहो, ही मुल अगदी माझ्या मुलांसारखी दिसत असल्यामुळें मी माझी मर्यादा विसरलो आम्ही परदेशातून आलो आहोत तरी मला क्षमा करावी. येथील लोकांचा कांहीं गैर समज होईल म्हणून मी आपली माफी मांगतो पण मी खरोखरच सांगतो, माझी मुलं अगदी अशीच व एवढीच आहेत, परंतु, ती कोठे आहेत ते मात्र मला ठाऊक नाही. असें बोलत

तो राजा स्वताचे डोळे पुसत मुलांना खाली ठेवतो व आत तबेल्यात घोड्यांकडे जात हात जोडून बोलतो, "कृपया, तुम्ही मला आणखीन कांही विचारू नका, तुमच्या चौकशांमुळें माझ्या जखमा पुनः उघडल्या गेल्या, ज्या मी मिटवण्याचा प्रयत्न करत असतो. अशी विनंती नळ केसिनीस करतो. मुलांकडे पहात तो त्यांना दुवा करतो किं, त्यांचे पिता त्यांना लवकरच भेटोत. ते जशी दमयंती पहाते तिला आपल्या पतिच्या असहायतेची जाणीव होते व त्यामुळें तिला ऊर भरून येते, काय करावे अशा परिस्थितीत ते तिला समजत नाही.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा पासष्ठावा भाग संपला.

## वनपर्व भाग सहाशष्ठावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगत असतात, नळाची ती केविलवाणी अवस्था पाहून केसिनी दमयंतीकडे जाते. ती सगळे सांगते जे दमयंतीने स्वतःच्या डोळ्याने पाहिलेले असते. दमयंती केसिनीला आपल्या मातोश्रीकडे एक निरोप घेऊन पाठवते. ती त्या निरोपात मातेला सांगते किं, ऋतुपर्णाचा दुसरा सारथी म्हणून जो आला आहे तोच माझा नळ आहे. मी त्याबद्दल हरप्रकारे चाचणी केली आहे. तरी कांहीतरी करावे व मला माझा प्राणनाथ मिळवून द्यावा. एक त्याच्या चेहर्याचाच प्रश्न आहे पण त्याबद्दल आपण आणखीन चाचपण्या करू शकतो. कांहीं करणाने माझ्या पतिने त्याचे सुंदर रुप लपवले आहे. ते कारण शोधावे लागेल व ते त्यांनाच सांगता येईल पण त्यासाठी प्रथम आपण वाहुकाला तो नळ आहे हे आम्हाला मान्य आहे असें सांगावे लागेल कारण तो फार व्यथित आहे. त्याच्या मनाला फार त्रास न होईल अशाप्रकरे ती चौकशी झाली पाहिजे. त्यासाठी तुला माझी मदत करावा लागेल कारण फक्त जर आम्ही एकमेकांना भेटलो व बोललो तरच त्याचा उलगडा होईल, एरव्ही नाही. म्हणून आपल्या बाबांना कळणार नाही अशा प्रकारे माझी व त्याची भेट घडवून तू आण, एक तर त्याला वाड्यात येण्याची परवानगी द्यावी किंवा मला त्याच्याकडे जाण्याची मुभा द्यावी. बाकी सगळे मी सांभाळून घेईन, माझ्यावर विश्वास ठेव हा माझ्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. केसिनी तो निरोप दमयंतीच्या मातेस व पित्यास असें दोघाना देते कारण त्याशिवाय ते होणार नव्हते. ते ऐकल्यावर शांत चित्त विवेकी राजा भिमदेव व त्याची पत्नी दोघे ठरवतात कीं, वाड्यात जास्त बभ्रा होणार नाही अशा प्रकारे वाहुकाला दमयंतीच्या दालनात प्रवेश द्यावा. त्या प्रमाणे राजाचे खास विश्वासातले दोन कारभारी रात्री वाहुकाला घेऊन दमयंतीच्या दालनात जातात. नळ तिला पाहतो व त्याचा तोल जातो, अनेक महीन्याचा उमाळा बांध फुटावा असा बाहेर येतो. तिच्या कडे तो बराच वेळ नुसता पहात रहातो व असहायतेने फक्त आपली मान हलवत असतो. दमयंतीला आता पूर्ण खात्री होते किं, हांच तिचा पति व ती त्याला मिठी मारते. तो प्रसंग अहो युधिष्ठीर, मोठा हृदय हलवणारा होता. थरथरत्या हातांने तो नळ आपल्या दुरावलेल्या पत्नीस प्रथमच स्पर्श करतो. तो स्पर्श दमयंतीला माहीत होता. तोंच तो स्पर्श

असतो. तिने नळाला आवेगांने घट्ट मिठी मारली. तरी आता वाहुकाची तिला तिच्या पद्धतीने पत्नीच्या हक्काने खरडपट्टी करावयाची असते ते ती सुरु करते, कित्येक दिवसांचा आपल्या पतिवरील रोष आता बाहेर येऊ लागतो. जेथे प्रेम असतें तेथेच हक्क असतो व तेथे हक्क असतो तेथेच क्रोध करता येतो. ह्या न्यायांने दमयंती तिचा राग नळावर काढण्यास सुरुवात करते. ती विचारते, "अहो वाहुक, आपण कधी असा इसम पाहिला आहे कां, ज्यांने आपल्या पत्नीचे, ती वनात झोपलेली असतांना वस्त्र कापून काढून घेऊन व तिला तसेंच झोपलेल्या अवस्थेत ठेवून परागंदा झाला आहे. तिच्या कोणत्या अपराधासाठी तो असा वागू शकतो ते तुम्ही मला सांगाल कां"? मला त्याचे हे वागणे विशेष आक्षेपार्ह वाटले कारण, जेव्हां सगळ्यांनी त्याला त्याच्या अपयशा करता सोडून दिले तेव्हां मी मात्र माझा पतिव्रता धर्म निभावण्यासाठी त्याच्या बरोबर जंगलात गेले, हे त्याला चांगलेच ज्ञात असूनही तो मला अशा अवस्थेत म्हणजे, बहुतेक अर्धनग्न अवस्थेत टाकून जातो म्हणजे काय? मी जर ठरवले असते तर माझ्या पित्याच्या घरी जाऊ शकले असते पण मी ते केले नाही व त्याच्याशी एकनिष्ठ राहिले, त्याची तो मला शिक्षा करत होतास काय? तुला चांगलेच ज्ञात आहे किं माझ्या स्वयंवराच्या निमित्ताने लोकपाल चार देव आले असतांना त्यांना विनम्रपणे नाकारून तुला स्वीकारले त्याची तू मला शिक्षा करत होतास कां"? असें बोलावयाचे कारण, तू त्यावेळी मला सांगत होतास किं, देवांना नाकारून एका माणसाशी लग्न करण्याचे वाईट परिणाम होऊ शकतात. अरे वाहुका, तू माझा नळच आहेस हे मला माहित आहे तरी मी तुला तुझ्या ह्या नांवांने बोलते कारण मला पटेल असे उत्तर जर दिलेस तरच मी तुला माझा तो नळ म्हणून स्वीकारीन. तरी तू आता मला उत्तर दे". मला सोडतांना आपल्या लहान लेकरांचासुद्धा तुला विचार आला नाही, हे कसे झाले, तू असा नव्हतास, मला माहित आहे, तू एक तत्त्वशिल, सत्वशिल असा राजा अशा रितीने कसा वागू शकतो, तेंच मला समजत नाही! विषण्ण मनाने दमयंती त्याच्यापुढे तिचे प्रश्न मांडत होती आणि वाहुक एकही शब्द न बोलता गुपचुप तिच्यापुढे उभा होता. तिच्या दोनही नेत्रांतून अश्रूच्या धारा वहात होत्या. एक मन सांगत होते अशारितीने प्रश्नांवर प्रश्न विचारून त्याला भंडावून सोडलेस तर हाताशी आलेला हा तुझा नवरा पुनः परागंदा झाला तर तू काय करणार? दुसरे मन सांगत होते ते

कांहीं असो, ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे त्याला द्यावीच लागतील. नंतर थोडा वेळ थांबल्यावर ती मानिनी आपल्या चेहरा बदललेल्या पतिकडे दृष्टी टाकत विचारते, "अहो महाशय, मला सांगा, हे विचित्र रुप आपण केव्हां व कां घेतले आहे ते समजेल कां मला"?

एवढी प्रश्नांची सरबत्ती झाल्यावर ती नळाची राणी उत्तराची अपेक्षा करत त्याच्या कडे न पहाता प्रतिक्षा करत असते. आता वाहुकाला बोलणे भाग होते. दमयंतीच्या बोलण्याच्या काळात नळ तिच्यापुढे एकाद्या अपराध्यासारखी उभा होता व त्याच्या डोळ्यांतून सारख्या अश्रूच्या धारा वहात होत्या. दोघे रडत होते. अखेरीस नळ तिला सांगू लागतो. तो प्रथम बोलतो, "तू माझ्या सांगण्यावर जर विश्वास ठेवणार असशिल तरच माझे कांहीं सांगणे योग्य होईल परंतु तू जर विश्वास ठेवणार नसशिल तर माझ्या बोलण्यात कांहींच तथ्य उरणार नाही". असें बोलून, तो राजा तिच्या प्रतिक्रियेची प्रतिक्षा करत रहातो. दमयंती मृदू सुरात विनतीवजा त्याला बोलते कीं, "मी फक्त तुमच्याच बोलण्यावर विश्वास आजवर करत आली आहे, मग आता कां नाही करणार"?

नळ सांगू लागतो. "दमयंती, तुझा विश्वास बसणार नाही अशाच एक एक घटना घडत होत्या, म्हणून मी हे बोललो. अगदी आपल्या स्वयंवराच्या काळापासूनचे मला सांगावे लागेल ते ऐक.

आपल्या स्वयंवराला जसें ते चार लोकपाल आले होते तसेंच कली सुद्धा येत होता. तू मला निवडलेस ते कलीली आवडले नाही. त्याचा वृतांत जसा घडला तसा मी तुला जशाच्या जसा निवेदन करतो म्हणजे काय व कसे धडले त्याची तुला कल्पना येईल व तुझे सगळे गैरसमज संपतील. असें बोलून नळ म्हणजेच आताचा वाहुक स्वयंवरापासूनचे जे घडले ज्यामुळें कली त्याला पछाडून त्याला व दमयंतीला बरबाद करण्याचे कार्य कसे करत होता ते समजेल.

वृहदस्व पुढे तो वृतांत जशाच तसा निवेदन करतात तो अरे, युधिष्ठीरा, तो ऐक,

दमयंतीने एका मनुष्याला देव सोडून निवडले ते कलीला आवडत नाही. जो मद व मत्सराचा काळ असा कली एकदम भडकतो. ते ऐकून इंद्र त्याना सागतो, तो विवाह आम्हा चारही लोकपालांच्या सम्मतीने संपन्न झाला आहे, त्यात वाईट वाटण्या सारखे

कांहीं नाही. ते ऐकूनही कलीचा राग कमी होत नाही. तो बोलतो, देवांच्या पुढे ह्या माणसाला निवडले हे अयोग्य झाले आहे. त्या दमयंतीला फार मोठे नुकसान भोगावे लागले पाहिजे. अरे पण तो विवाह आमच्या संम्मतीने झाला आहे त्याचे कारण, दमयंतीचे नळावर खरे प्रेम आहे. म्हणून तू तो विषय तुझ्या मनातून काढून टाक. असें ते चार देव कलीला समजावण्याचा प्रयत्न करतात. इंद्र कलीला सागतो, अरे तो राजा सत्त्वशिल व्रतस्थ असा आहे. तो सगळ्या देवांचे यज्ञ यथासांग पार पाडत असतो, कोठेही तक्रार करावयाला वाव नाही. त्याचा वेदांचा व पुराणांचा अभ्यास झालेला आहे. तो त्याचे प्रजाहिताचे कार्य प्रामाणिकपणे करत आहे. तो  सर्व प्राणिमात्रांसाठी चांगला आहे. त्याचे कार्य असे आहे किं, तो साक्षात मानवी लोकपाल झालेला आहे. त्याला आम्ही आशिर्वाद दिले आहेत ज्यामुळे तो त्याचे वैराग्यपूर्ण, सत्वशिल, पुण्यप्रत जीवन जगत आहे. त्याचा आत्मा चिरशातीत असतो. तो संयमी आहे. जो कोणी अशा खर्या राजास त्रास देण्याच्या गोष्टी करील तोच मोठ्या अडचणीत सांपडू शकतो. म्हणून अरे कली तू तो अविचार सोडून दे. नाहीतर तूंच तळ नसलेल्या महानरकात जाऊन पडशिल. असें बोलून ते चार लोकपाल त्यांच्या ठिकाणी निघून जातात. परंतु, कलीचा राग शमलेला नसतो. तो द्वापारला सांगतो, "मला हे सगळे आवडलेले नाही. माझा क्रोध कमी होत नाही. त्या नळाला आणि दमयंतीला कांहीं अद्दल घडवल्याशिवाय मला सुचायचे नाही. मी असें करतो, त्याला पछाडतो व त्याच्या सात्त्विक मनात शिरून त्याची बुद्धी भ्रष्ट करतो मग बघ काय होते ते. त्यांचे राज्य गेले पाहिजे व तो रस्त्यावर आला पाहिजे. त्यासाठी एकच गोष्ट त्याच्या कडून मी करून घेईन व ती म्हणजे त्याला द्युत खेळण्याचा नाद लावावयाचा. तसें झाले किं ती दमयंती त्याला सोडून जाईल. त्यासाठी द्वापारा तुला मात्र माझी मदत करावा लागेल". द्वापार त्याला आठवण करून देतो किं, "अरे कली, आज त्रेताचे चालते. मीसुद्धा अजून पुरेशाप्रमाणात कार्यरत झालेलो नाही. अशा परिस्थितीत तू कांहीं केलेस तर त्यासाठी तुला शिक्षा होईल अशी लोकपालांनी तुला ताकीद सुद्धा दिली आहे. मी तुला त्या कारणांने कोणत्याही प्रकारचे सहकर्य करणार नाही, फक्त बघ्याची भूमिका करीन.

अशाप्रकारचा कट कली करतो द्वापाराच्या बरोबर, नंतर राजा नळाच्या घरी कली जातो. नळाच्या कारभारात कोठे कांहीं खोट मिळते कां ते तो पहात असतो. त्याला कांहीं खोट

मिळत नाही. त्यासाठी कली निशादाच्या राज्यात बरीच वर्षे फिरत असतो. अशी बारा वर्षे जातात. सरते शेवटी कलीला एक खोट सांपडते. ते असें होते, एके दिवशी राजा नळ त्याचे प्रातःकाळचे शौंच मुखमार्जन केल्यानंतर तो निशादांचा राजा अर्घ्य देण्यासाठी पहाटेची प्रार्थना करण्या ऐवजी चुकून संध्याकाळची प्रार्थना करतो. आणि ते सुद्धा हातपाय न धुता ती करतो, कदाचित तो त्याच्या कारभाराच्या गरजेनुसार तसे करतो. तेवढी खोट कलीला पुरेशी असते. तो नळाच्या शरीरात प्रवेश करतो व थेट मेंदूचा ताबा घेतो. आता नळाला माहीत नसते किं, कलीने त्याला पछाडलेला आहे.

ते केल्यानंतर कली नळाचा लोभी भाऊ, पुष्कराकडे ब्राह्मणाचे रुप घेऊन जातो व त्याला सांगतो कीं, नळराजाला द्युत खेळण्याची इच्छा झाली आहे. कली पुढे त्याला सांगतो, माझ्या कृपेमुळें तू नळाला द्युतात हरवशील. त्या नळाला हरवल्यावर तू त्याचे सगळे राज्य त्याच्या कडून काढून घेशिल जेथे तो राजा नळ राज्य करत आहे. कली पुष्कराला आग्रह करतो म्हणून, तो पुष्कर नळाला भेटतो व द्युत खेळण्याचे आमंत्रण देतो. त्याच्या बरोबर द्वापारसुद्धा काय होते ते पहाण्यासाठी तेथे जातो व स्वतः फासा बनतो, ज्याचे नांव वृष असते. पुष्कर नळाला त्याच्या पत्नीसमक्ष आव्हान देतो किं, तो पुष्कराला हरवू शकणार नाही. कलीच्या बुद्धीप्रवेशामुळें नळाच्या मनात गर्विष्ठपणा उत्पन्न झालेला असतो व त्या भरात तो ते आव्हान स्वीकारतो. द्युत खेळण्याची वेळ ठरते. खेळ सुरु होतो व नळ कलीच्या प्रभावामुळें प्रत्येक खेळ हरू लागतो. नळाचे दरबारी, कारभारी असें सगळे त्याला द्युत खेळण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयास करतात परंतु, तुझ्या सारखा तो दुर्बुद्धीने भ्रष्ट झाला होता कारण कली त्याच्या डोक्यात जाऊन बसला होता. जसा नळ हरत होता त्याची दुर्बुद्धी त्याला आणखीन खेळण्यास प्रवृत्त करत होती. त्याचा सारथी दमयंतीच्या कडे जातो व तिला सांगतो किं वेड लागल्यागत नळ द्युतात एका मागोमाग एक राज्ये हरत आहे. तरी त्याला द्युत खेळण्यापासून परावृत्त करण्यात दरबारी अयशस्वी झाले आहे. म्हणून आपण स्वतः येऊन त्याला द्युत खेळण्याचे थांबवावे असें सांगावे. तो तिला सांगतो अशाने नळ सगळे वैभव घालवून बसेल, असा गुणी राजा द्युतांने अशाप्रकारे बरबाद होत आहे हे त्याच्या प्रजाजनांना पहावत नाही. त्याचे द्युत खेळणे पाहून हांच का तो न्यायी राजा असा प्रश्न पडत आहे सगळ्यांना. त्याची बुद्धी अशी कशी फिरली म्हणून

सगळे चिंता करत आहेत. भिमाची कन्या दमयंती ते पाहून दुःखाने व्यथीत झालेली नळाला सांगते, "अहो आता हा द्युत खेळणे थांबवा. तुमचे प्रजाजन तुम्हाला आज्ञा करत आहेत किं, तुम्ही अशारितीने द्युत खेळून राज्याचे नुकसान करू शकणार नाही, तो तुम्हाला हक्क नाही. हे राज्य तुमच्या मालकीचे नाही. ब्रह्माच्या आदेशाप्रमाणे राजा हा प्रजेचा विश्वस्थ असतो, मालक नाही. प्रजेला जे मंजूर नाही ते तो करू शकणार नाही हे नैतिकतेचे तत्त्व आपण कसें विसरलात"? परंतु, कलीच्या प्रभावाखाली गेलेला नळ तिच्या बोलण्याकडे लक्ष न देता द्युतात आणखीन राज्य व संपत्ती घालवत रहातो. राजाचे राणीवरील प्रेम सगळ्यांना माहीत होते, तशात तो राजा तिचे ऐकत नव्हता. ते पाहून सगळे हताश झाले व आपापल्या घरी निघून गेले. अशी रितीने द्युताचे व्यसन लागल्या सारखा तो एरव्ही सत्वशिल असलेला नळ कलीच्या प्रभावाखाली पुरता भ्रष्ट झाल्यासारखा कित्येक सप्ताह द्युत खेळत होता व प्रत्येक वेळी हरत होता.

एवढे सांगितल्यानंतर वाहुक तिला तो तिला सोडून कसा जातो ते सांगतो. अहो दमयंती, आपल्याला झोपलेले पाहून माझ्या मनात विचार येत होते किं, जर मी तुला सोडले तर तू तुझ्या पित्याकडे जाशिल व तुझा वनवास संपेल परंतु, मी तुला सोडून जाऊ शकत नव्हतो. शेवटी कदाचित असेल कलीच्या प्रभावाखाली मी आपले वस्त्र तेथे पडलेल्या तलवारीने कापून तुझ्यापासून मला मोकळे केले. नंतर करकोटकांने मला सांगितले किं, ती मायावी तलवारसुद्धा कलीनेच तेथे उपलब्ध केली होती म्हणजे आपण मोकळे होऊ शकू. भारावलेल्या सारखा मी तुला सोडून दूर जात असतांना त्या वनात खूप आत पोहोचलो. तेथे एक वणवा पेटलेला होता. तो पहात असतांना मला कांही बोलण्याचा आवाज येऊ लागला. कोणातरी मला माझे नांव घेऊन बोलावत होते.

"अहो दयाळू नळ राजे मला वाचवा". ते ऐकून पुढचा मागचा कसलाच विचार न करता मी त्या वणव्यात घुसलो. तेथे तो पहातो कीं, एक भलामोठा नाग वेटोळे करून पडला आहे. नळाला पाहिल्यावर तो नाग हात जोडून नळाला विनंती करतो, "अहो धनी, मी एक साप आहे, माझे नांव आहे, करकोटक, मी ऋषी नारदांला फसवले होते, त्यामुळें त्यांनी मला शाप दिला आहे. तो शाप असा होता किं, तू करकोटका येथेच असाच वेटोळ्यात अडकून पडून रहाशिल, जो पर्यंत राजा नळ तुला ह्यातून वाचवत नाही. जेव्हां तो राजा नळ तुला

उचलून येथून नेईल तेव्हां तू माझ्या शापातून मुक्त होशिल. त्या शापामुळें मी अजिबात हालचाल करू शकत नाही. मला जर तू सोडवलेस तर मी तुझ्या भल्याच्या गोष्टी तुला सांगेन. मी तुझा मित्र असेन माझ्यासारखा नाग दुसरा नाही. माझे तुला वजन जाणवणार नाही. मला उचलून ह्या वणव्यातून बाहेर काढ. मग आपण वेगांने ह्या आगीपासून दूर जाऊ". एवढे बोलल्यावर करकोटक आंगठ्या एवढा लहान होतो. त्याला उचलून नळ त्या वणव्यापासून दूर जातो. तेथे आग नसल्याने नळ त्या सापाला तेथे जमिनीवर टाकणार एवढ्या पुन्हा करकोटक नळाला बोलतो, "अरे निशादांच्या राज्या, आणखीन कांहीं तुझी पावले मोजत टाकून चाल म्हणजे त्या वेळांत मी तुझे चांगले करू शकेन. राजा त्याप्रमाणें त्याची पावले मोजत असतो तर दहाव्या पावलाला करकोटक नळाला चांवतो व त्यामुळें तो नाग नळाच्या हातून पडतो. खाली पडणार्या त्या सापाचे स्वरुप झपाट्याने बदलू लागते, ते पाहून नळ आश्चर्यचकीत होतो. करकोटक त्याच्या मुळ आकाराचा होत असतो. मी भयचकीत झालेला पाहून तो नाग मला सांगतो, "घाबरू नकोस, मी तुला वेगळे रुप दिले आहे. त्यामुळें तुला कोणीही ओळखणार नाही. त्याशिवाय मी तुला वचन देतो कीं ज्याने तुला फसवले त्याला मी आत्ताच चांवलो आहे. त्यामुळे तो सदैव तडफडत राहिल. कारण तुला बरबाद करणारा कली तुझ्यात अडकला आहे. ह्यापुढे तू सदैव अजिंक्य रहाशिल व तुझे गेलेले वैभव तुला पुन्हा प्राप्त होईल. तो कली ज्यांने तुम्हा पतिपत्नीना वेगळे केले तो सतत तडफडत राहिल. त्या कलीने तुला मत्सरभावांने प्रेरीत होऊन बरबाद केले आहे. आता ह्यापुढे तो तुला कांहींही करू शकणार नाही. त्याला दमयंती पाहिजे होती परंतु, तू तिला तुझ्या गुणांनी जिंकले होतेस ते त्याला पहावले नाही म्हणून तो तुमच्या उभयतांच्या पाठी लागला होता. पण आता तो तुला कांहीं इजा करू शकणार नाही. माझे वीष तुझ्या नसां नसांत भिनले आहे त्यामुळे तुला कोणही साप, नाग त्रास देऊ शकणार नाही. तसेंच वेदाचार्य ब्राह्मणसुद्धा तुला शाप देऊ शकणार नाहीत. लक्षात असू दे, तुझ्या पत्नीनेसुद्धा तुला बरबाद करणार्याला म्हणजे त्या कलीला शाप दिला आहे त्यामुळें माझ्या विषाची ताकद अनेकपट वाढली आहे. माझ्या विषाचा तुला व तुझ्या पत्नीला कांहीं त्रास होणार नाही". त्यानंतर तो साप बोलला, "आता तू अरे राजा, अयोध्येला जा व ऋतुपर्णाला भेट, जो द्युतात हुशार आहे. त्याला तू तुझी ओळख करून

दे कीं, तू एक सारथी आहेस, आणि तुझे नांव वाहुक आहे. तो ऋतुपर्ण तुला द्युत शिकवेल त्याच्या बदल्यात तू त्याला घोडेस्वारी शिकवशिल जे त्याला जमत नाही. ऋतुपर्णा इश्वाकू घराण्याचा वारस आहे. त्याच्याशी दोस्ती करण्याने तुझा खूप फायदा होईल. त्याच्या कडून द्युत शिकल्यावर तुला तुझी सगळी संपत्ती व राज्य परत मिळवता येईल. तू तुझ्या पत्नीला व मुलांना भेटशिल. त्यानंतर तू सांगशिल तू कोण आहेस ते. आता तू होऊन गेलेल्या प्रसंगांना आठवून उगाचच चिंता करू नकोस. असें सांगितल्यानंतर करकोटक मला कांहीं वस्त्र देतो आणि सांगतो, जेव्हां हे वस्त्र तू नेसशील तेव्हां तू तुझ्या खर्या रुपात दिसू लागशिल व हे विचित्र स्वरुप कायमचे जाईल. असें बोलून तो साप मला दोन दैवी वस्त्र देतो. एवढे सांगितल्या नंतर तो नागांचा राजा अदृष्य होतो.

पुढे नळ दमयंतीला सागत असतो व त्यामुळें तिच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडत जातो कीं, हे कसे होत होते व त्यापाठील कर्ता कोण होता. दमयंतीला आठवते कीं, ज्याने त्यांना त्या नष्टचर्यात ढकलले त्याला तिने शाप दिला होता, ज्याचा उल्लेख करकोटकांने केला होता. दमयंतीला समजते किं, कली ह्या सगळ्या पाठी आहे व त्याला तिच्या शापामुळें अतिपीडा होत आहेत.

पुढे नळ तिला नंतर काय झाले ते सांगतो. तुझ्या आमंत्रणामुळें राजा ऋतुपर्णा मला व वर्षनेयाला घेऊन तुझ्या घरी येण्यास निघालो. वाटेत ऋतुपर्णाचे उपरणे हवेत उडून मागे रहाते. ते घेण्यासाठी राजा वर्षनेयाला पाठी पाठवतो. तो येई पर्यंत आम्ही जेथे रथ थांबला होता तेथे एक विभितक वृक्ष असतो. वेळ घालवण्यासाठी ऋतुपर्ण व मी त्या वृक्षाचे निरीक्षण करत होतो. राजा मला सांगतो, त्याचे गणिताचे ज्ञान इतके चांगले आहे कीं तो त्या वृक्षास किती पांनं आहेत ते येथून सांगू शकतो. एवढेच नाही तर किती फळं लागली आहेत ते सुद्धा तंतोतंत सांगू शकतो. ह्यावरून माझी गणितातील ज्ञानाची तुला कल्पना येईल. सगळ्या लोकांना असें सांगता येणार नाही. कोणीही सगळ्या शास्त्रात तज्ज्ञ होत नाही. पुढे ऋतुपर्ण मला खात्रीने सांगतो, ह्या झाडाची जमिनीवर पडलेली पानं झाडांवर असलेल्या पानांपेक्षा एकशेएक संख्येने जास्त आहेत. फक्त दोन फांद्यांवर दोन लाख पानं आहेत असें तो सांगतो. मी त्याला बोलतो, ते खरे आहे कीं नाही ते पहाण्यासाठी पानं प्रत्यक्ष मोजावी लागतील. तरच तुमचे खरे कां नाही ते सिद्ध होईल. असें बोलल्यावर

ऋतुपर्ण मला त्या दोन फांद्या कापावयाची परवानगी देतो. त्या आधी मी आधी जमिनीवर पडलेली पानं मोजलेली असतात. जेव्हां खरोखरच ती मोजली जातात तेव्हां राजाचा अंदाज खरा असल्याचे दिसते. फळं मोजावयाची राहिली होती, त्यासाठी मी राजाला सांगतो वर्षनेयाला घोड्यांचे लगाम धरावयाला सांगा. त्यावर ऋतुपर्ण मला बोलतो, अरे त्यासाठी आपल्याला वेळ नाही. मला मोजावयाला थोडाच वेळ लागेल पण आपल्याला घाई असेल तर वर्षनेयाला रथ घेऊन जाऊद्या. मी मोजत बसतो. ते ऐकल्यावर ऋतुपर्ण मला बोलतो, "अरे, तूच असा सारथी आहेस जो रथ अशा वेगांने वार्यावरून घेऊन जाऊ शकतोस. मी तुझ्या सम्मतीनेच विदर्भात जाण्याचे ठरवले. आता अडचण करू नकोस". ते ऐकल्यावर मी राजाला सांगितले, काळजी नसावी, पानं व फळं मोजल्यावर मी रथ योग्य वेळी विदर्भात घेऊन जाण्याचे आश्वासन आपल्याला देतो. ते ऐकल्यावर नाराजीत ऋतुपर्ण त्याला पानं मोजण्याची परवानगी देतो. सगळी पानं मोजल्यावर जर तुझा माझ्या गणिताच्या ज्ञानावर विश्वास बसणार आहे तर मग तसें होऊदे. ते बोलणे झाल्यावर मी रथातून उतरलो व त्या झाडाच्या दोन फांद्या छाटून त्याची पानं मोजू लागलो. झपाट्याने तो सगळी पानं मोजली व सिद्ध होते कीं, राजाचे गणित बरोबर होते. ते समजल्यावर मी, ऋतुपर्णाला विनंती केली किं, मला ते गणित शिकावयाचे आहे. राजाला त्वरेने विदर्भात जावयाचे असल्याने तो मला आश्वासन देतो कीं. जर ते वेळात तेथे पोहोचले तर राजा मला ते गणित व द्युतविद्या दोनही शिकवेल. तेथे पोहोचण्या आधीच ऋतुपर्णा मला ते गणित व द्युतविद्या शिकवतो. जसा मी ती विद्या शिकून त्यात तरबेज होत गेलो, माझ्या अंगात बसलेला कली माझ्या तोंडातून विष बाहेर यावे असा ओकला जावू लागला. करकोटकाने दिलेल्या विषाचा तो परिणाम होता. कली माझ्या शरीरातून बाहेर आल्याने त्याचा प्रभाव जो माझ्यावर होत होता, तोसुद्धा संपला. कलीने मला फार काळ पछाडले होते, त्यासाठी मी कलीला शाप देऊ शकत होतो, मी प्रचंड रागावलो होतो व त्या भितीने कली मला बोलला, "मला माफ कर, मी जे केले ते अक्षम्य होते त्या बदल्यात मी तुला तुझे वैभव, राज्य पुन्हा देऊन टाकीन. कली पुढे सांगतो, तुझ्या मुलाच्या आईने मला शाप दिला आहे त्यामुळे मी आधीच मोठ्या अडचणीत आहे आणखीन तुझा शाप नको". करकोटकाच्या विषामुळें मी रात्रंदिवस जळत आहे मला वाचव, जर तू मला माफ केलेस

तर मी जाहिर करतो कीं, जे तुझी हि कथा माझ्या युगात सांगतील व ऐकतील त्यांना मी कधीही त्रास देणार नाही. कलीची वैशिष्ठ्ये ज्या दोषांने व्यक्त होतात ते असें आहेत, मतभेद, गैरसमज, गर्व, मत्सर, भांडणतंटा, कलागती, विश्वासघात, संशय हे त्या माणसास बाधणार नाहीत. ते ऐकल्यानंतर मी माझा क्रोध आवरला तसे होताच माझ्या अंगातून बाहेर आलेला कली त्या पाडलेल्या विभितक झाडात घूसतो. कली माझ्याशी बोलत असतांना इतरांना मात्र दिसत नसतो. त्या समयात त्याने सगळी फळं मोजलेली होती. ती ऋतुपर्णाने सांगितलेली तितकीच होती. कली माझ्या अंगातून निघून गेलेला असल्यामुळें मला एका विलक्षण सुखाचा अनुभव येत होता. त्यानंतर मी रथात चढतो व आम्ही पुढे निघतो. कली त्या झाडात शिरल्यामुळें त्या काळापासून ते झाड अशुभ समजले जाऊ लागले. कली त्याच्या अंगातून गेल्यामुळें माझा जोर पूर्वीसारखा होतो व तो त्या रथाला आकाशात उंच उडवून प्रचंड वेगांने ते विदर्भाकडे जाऊ लागतात. आम्ही तेथून गेल्यानंतर थोड्याच वेळांत कलीसुद्धा त्याच्या ठिकाणी निघून जातो. जरी मी त्या कलीच्या जाचातून मुक्त झालेलो असलो तरी माझे रुप अजून वाहुकाचेच आहे. त्यासाठी मला ती दोन दैवी वस्त्रं नेसावी लागणार असते. कलीच्या तावडीतून आपण सुटलो कारण आपले, म्हणजे तुझी व माझी पवित्र जीवन शैली, एरव्ही त्याच्या तावडीतून सुटणे केवळ अशक्य होते.

एवढे ऐकल्यावर दमयंतीचे समाधान होते व ती निवातपणे स्मित करू लागते, तिची कांती पुन्हा एकदा उजळून निघते. आता नळाची पाळी असते दमयंतीची हजेरी घेण्याची जसें सगळ्या पतिपत्नींत नेहमी होत असते. तो थोडे संशयाचे सोंग घेत दमयंतीला विचारतो, "भाग्यवान, मला सांग तू दुसरा स्वयंवर करण्याचे कसे ठरवलेस ते सांगशिल कां"?

ते ऐकल्यावर दमयंती मोठ्याने खदखदून हसते. ती नळाला सांगते, "कृपया कसलाही चुकीचा अर्थ काढू नका माझे धनी. हा एक डाव होता माझा तुम्हाला येथवर आणण्याचा. एरव्ही तुम्ही सांगा, तुम्ही येथे कसे येऊ शकला असता व आपले मिलन कसे झाले असते"? ते बोलतांना दमयंती थोडी घाबरल्यासारखी झाली होती. आपण जाणता मी तुम्हाला देवांच्या ऐवजी पसंत केले होते त्याचा विसर पडू देऊ नका. परनादाने आणलेली माहीती व त्यानंतर सुदेवांने केलेले कार्य ह्या सगळ्या मागे तुमचा शोध घेणे हांच एकमेव

उद्देश होता, हे समजून घ्या. माझ्यावर विश्वास ठेवा, मी कधीही कोणा दुसर्या व्यक्तीचा साधा विचारसुद्धा केलेला नाही. मी कोणत्याही प्रकारचे पाप केलेले नाही. जर मी खोटे बोलत असेल तर आकाशातील सूर्य मला जाळून टाको. त्यावेळी आकाशातून लोकपालांची आकाशवाणी होते, "दमयंतीवर विश्वास ठेव ती अतिशुद्ध आहे. त्याबद्दल निश्चिंत हो. तू आमच्यावर भरवसा करू शकतोस कारण आम्ही सगळ्यांना आतून व बाहेरून असें संपूर्ण न्याहाळत असतो. कोणीही आम्हाला फसवू शकत नाही. तुला खेचून आणण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग होतां कां"? वायूदेवाच्या त्या आश्वासक विधाना नंतर आकाशातून सुगंधी फुलांचा वर्षाव सुरु होतो. नगारे वाजू लागतात. त्या नंतर नळाला कोणतीही शंका दमयंती बद्दल उरत नाही. त्यानंतर वाहुक आपल्या पोतड्यातून ती दोन दैवी वस्त्र बाहेर काढतो व नेसतो. त्याबरोबर वाहुक जाऊन त्या जागी नळ उभा रहातो. त्याला त्याच्या तेजात पाहून दमयंतीच्या आनंदाला पारावार रहात नाही. ते उभयता एकमेकाच्या घट्ट मिठीत बराच काळ रहातात. त्यांना एकमेकांना सोडण्याची इच्छा होत नाही. दमयंतीचे आई व बाप त्यांना तसेच सोडतात. भिमदेव सांगतात किं, उद्या ही वार्ता आपण जाहीर करावयाची, आता नळाला आरामाची गरज आहे. त्यानंतर ते दोघे विदर्भात भिमदेवाच्या कडे राहू लागतात. दुसर्या दिवशी राजा भिम ऋतुपर्णाला सगळे समजावून सांगतो. ते ऐकल्यावर ऋतुपर्णाला एकादी परी कथा ऐकल्यासारखे वाटते. एक वर्षभर नळ एक सम्राट माझ्याकडे सारथी म्हणून होता त्याचे त्याला नवल वाटते, सगळा दैवाचा खेळ. नळ त्याला द्युतविद्या व गणित शास्त्र शिकवल्याबद्दल आभार मानतो व ऋतुपर्ण अश्वविद्या शिकवल्याबद्दल त्याचे आभार मानतो. शुभ मुहूर्त पाहून ऋतुपर्ण आपल्या देशाला वर्षनेया बरोबर निघून जातो. ऋतुपर्ण व नळ एकमेकांचे चांगसे मित्र होतात.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा सहाशष्ठावा भाग संपला.

## वनपर्व भाग सदुसष्ठावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी पुढे सांगतात, ती रात्र शांतपणे दोघांनी घालवल्यानंतर दुसर्या दिवशी राजा नळ उत्तम कपडे नेसून भिमदेवापुढे सादर होतात. भर दरबारात नळ आपल्या सासर्यांना लवून अभिवादन करतो. त्याच्या बरोबर उभी असलेली भिमाची मुलगी आपल्या पित्यास रिवाजानुसार वंदन करते. त्या दोघांनी केलेले अभिवादन स्वीकार केल्यानंतर राजा त्याच्या जावयांस त्याची नेमणूक काय ते सांगतो. नळाला पाहून सगळे दरबारी आनंद व्यक्त करतात. त्या राजधानीच्या नगरीतील प्रजाजन त्यांचा आनंद एक मोठा जल्लोष करून व्यक्त करतात. ठिकठिकाणी ध्वज उभारले जातात आणि पताका लावल्या जातात. फुलांच्या पानांच्या माळा रस्त्यावर लावल्या जातात अशारितीने सगळी नगरी सजवली जाते. देवळे व मंदीरे, संतांचे आश्रम असें सगळे जे पवित्र असते तेसुद्धा त्या कारणा प्रित्यर्थ सुंदर आरास करून सजवले जातात. ऋतुपर्णा त्या सोहळ्यात आनंदाने सामील होतो, त्याला खरे काय घडले त्याची कल्पना वर्षनेयाने दिल्यामुळे त्याला खूप आनंद होतो व तो दाखवण्यासाठी तो मोठी भेटवस्तु त्या पुनर्मिलन झालेल्या दांपत्यास त्याच्या शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी सादर करतो. नळ त्याला खरे न सांगता त्याच्याकडे चाकरी करण्यास राहिला त्यासाठी ऋतुपर्णाची क्षमा मांगतो, त्यावेळी ऋतूपर्ण त्याला बोलतो कि, "प्रथम मला माफ कर कारण मी तुला माझा सारथी केला, मला जर माहित असते तर मी तसे करून तुझा उपमर्द केला नसता". पुढे तो सांगतो, "माझे महद्भाग्य किं तुझ्यासारखा विक्रमी राजा माझा सारथी झाला व त्याच्या कडून मी सारथ्याची शिक्षण घेतले". ते ऐकल्यावर नळ उत्तरादाखल बोलतो, "मलासुद्धा तुझ्याकडून ते दैवी गणित आणि मला पुढे उपयोगी येणारी द्युतविद्या शिकण्याचा योग आला म्हणून तो विधात्याचे आभार मानतो. अरे अयोध्येच्या नरेशा, हे विधीलिखीत होते म्हणून तू माझा उपमर्द केला असें मी अजिबात समजत नाही. उलट ते घडले म्हणून मला माझी पत्नी मिळाली आहे, त्यासाठी मी तुझे आभार मानतो". अशारितीने त्यांच्यात एक नित्यस्वरुपाचा सलोखा होतो. सगळे आनंदमय होते. एवढे झाल्यावर नळ ऋतुपर्णाला सारथ्याची विद्या अर्पण करतो विधीपूर्वक. त्यानंतर तो अयोध्येचा राजा आपल्या ठिकाणी प्रयाण करतो, नळ

थोडे दिवस सासरी रहातो व नंतर तोसुद्धा भिमाची कुंडीलापुरी आपल्या परिवारासह सोडतो. त्याला त्याचे राज्य पुन्हा पुष्कराकडून काढून घ्यावयाचे असते.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा सदुसष्ठावा भाग संपला.

# वनपर्व भाग अडुसष्ठावा

## (नलोपाख्यान  पर्व पुढे चालू)

वृहदस्व ऋषी युधिष्ठीराला पुढे सांगतात, अरे कुंती पुत्रा , तो निशादांचा राजा आपल्या सासर्याचा पाहूणचार एक महीना घेतो व नंतर त्याच्या सासर्याची व सासूची परवानगी घेऊन आपल्या निशाद देशाकडे कुच करतो. त्याच्या बरोबर एक शुभ्र रंगाचा रथ असतो, त्याशिवाय सोळा हत्ती, पन्नास घोडे आणि सहाशे सैनिक असा फौजफाटा असतो. त्यांच्या जाण्याने पृथ्वी थरथरू लागते.

नळ आपल्या फोजे सह त्याच्या राज्यात प्रवेश करतो. तेथे गेल्यावर नळ फार क्रोधीत असा त्याच्या भावाला भेटतो. आणि त्याला द्युत खेळण्याचे आव्हान देतो. "मी खूप संपत्ती घेऊन आलो आहे. आता आपण पुन्हा द्युत खेळू या. चल माझी बोली आहे माझी बायको व माझी संपत्ती व त्याच्या बदल्यात तू हे माझे राज्य लावावेस".

चला द्युताचा खेळ सुरु करू. तुला द्युताचे नियम माहीत आहेत, त्याप्रमाणे जर हरलेला बिडू पुन्हा खेळण्यास आला तर त्याच्या बरोबर जिंकणार्याला पुन्हा खेळलेच पाहिजे. त्या न्यायांने तू माझ्या बरोबर खेळावयास तयार हो. असें नळ त्याच्या भावास आव्हान देतो. तो पुढे सांगतो, असें सिद्ध ज्ञानी ऋषींनी केलेले नियम आहेत". त्यानंतर नळ त्याला दुसरा पर्याय सांगतो, जर तुला द्युत खेळावयाचा नसेल तर लढाईला तयार हो. त्यात तुझा जीव गेला तर त्याची संपूर्ण जबाबदारी तुझी असेल. जो जिंकेल तो राज्य घेईल".

नळाचे ते बोलणे ऐकल्यावर त्याचा स्वार्थी भाऊ पुष्कर हसत हसत बोलू लागतो, "चांगले झाले कीं, तू जीवंत आहेस, तुझ्याकडे नवीन कमावलेली संपत्ती आहे व तुझा रत्नासारखी पत्नी सुद्धा जीवंत आहे. माझी द्युत खेळण्याची इच्छा अजून आहे, कारण मी फालतु लोकांबरोबर द्युत खेळून कंटाळलो आहे. जर द्युतात खेळून मला दमयंती सारखी दासी मिळाली तर सोन्याबरोबर सुख अशी माझी मजेशीर स्थिती होईल, ते माझ्यासाठी चांगलेच असेल. तुला काय सांगू, नळा मी दररोज तुझी आठवण करत होतो. कीं, तू पुन्हा माझ्याशी खेण्यास येशिल. आणि आज तो शुभ दिवस आहे, तू माझ्याकडे तुझी पत्नी पणाला लावावयास आला आहेस. मी स्वतःला खुषनशीब समजतो कारण खरे सांगतो, दमयंती मला फार आवडते. ती माझीच असणार म्हणून तुला माझ्याशी द्युत खेळण्याची

दुर्बुद्धी होत आहे. मी तुझ्याबरोबर खेळण्यास तयार आहे. त्या हरामखोर भावाचे ते उद्गार ऐकल्यावर नळाला वाटले कीं, तत्क्षणी पुष्कराचे मुंडके तलवारीने छाटून टाकावे. परंतु, नळ त्याचा राग आवरतो व पुन्हा द्युत खेण्याचे आव्हान देतो. नळ त्याला ताकीद देतो किं, प्रथम द्युतात पुष्कराने जिंकून दाखवावे व नंतर अशा गोष्टी कराव्यात. एवढे बोलणे झाल्यावर ते दोघे द्युत खेळण्यास सुरुवात करतात. ऋतुपर्णाच्या युक्त्या वापरून नळ खेळू लागतो व पहिल्याच डावात तो त्याचे राज्य जिंकतो. त्यात पुष्कारेने त्याचा जीवसुद्धा लावलेला होता कारण नळाने दमयंती पावली होती. नळ आता स्मित करत पुष्काराला सांगतो, "हे सगळे राज्य त्याच्या सिंहासना शिवाय माझे झाले आहे". कारण, पुष्कराने सिंहासन पणात लावलेले नव्हते. नंतर नळ बोलतो, "ह्यापुढे तू ह्या विदर्भाच्या राजकन्येचे स्वप्न सुद्धा पाहू शकणार नाहीस. कारण तू व तुझे कुटूंब आता माझे गुलाम झाले अहात. तुला माहीत नाही कीं, त्यावेळी चार वर्षापूर्वी तू जिंकलास कारण तुला कलीची मदत होती, ती आता तुला नाही मिळाली. हे मी जाणत असल्याने एक न्यायी राजा म्हणून मी तुला त्या गुन्ह्याबद्दल शिक्षा करणार नाही. कारण तुझ्या माध्यमातून कली आम्हाला पिडा देण्याचा प्रयत्न करत होता. कलीचा दमयंतीवर विशेष रोष होता त्यासाठी त्यांने हे सगळे कारस्थान घडवून आणले होते, त्यात तू फक्त एक प्यादा होतास. म्हणून तुला मी सजा करणार नाही व तुझ्यावर राग सुद्धा धरणार नाही. तुला मी जीवनदान देतो व तू तुला जसे पाहिजे तसे कोठेही जाऊन राहू शकतोस. मी तुला वारसा हक्काचा जो भाग आहे तो देण्यास तयार आहे. माझा तुझ्यावर राग नाही व तुझ्या परिवारावर सुद्धा रोष नाही. एक मोठा भाऊ म्हणून माझे तुझ्यावरील प्रेम तसेंच असेल. मी देवांकडे प्रार्थना करतो कीं, तू शंभर वर्षे जगो. पुष्कर नळाच्या कृपाप्रसादाने कृतज्ञ झाल्याचे सांगतो. दोघे एकमेकांना आलिंगन देतात. त्यानंतर हात जोडून पुष्कर नळाला बोलतो, तुझे राज्य आणखीन वृद्धिंगत होत जावो. तुझी किर्ती वाढत जावो, त्यानंतर कारभाराच्या गोष्टी समजून घेण्यासाठी पुष्कर दोन महिने नळाबरोबर रहातो व सगळे कारभाराचे व्यवस्थापन नीट झाल्यावर पुष्कर आपल्या जमिनदारीकडे निघून जातो.

पुष्कराचे प्रयाण झाल्यावर नळ त्याच्या मुलाबाळांबरोबर त्या राज्यात सुखासमाधानात अनेक वर्षे राज्य करतो. त्याचे प्रजाजन त्याच्या कारभारामुळें संतुष्ट असतात. कलीच्या

कोणत्याही दोषाचा (मतभेद, गैरसमज, गर्व, मत्सर, भांडणतंटा, कलागती, विश्वासघात, संशय) लवलेशसुद्धा निशादांच्या राज्यात आढळत नाही. निशादाची जनता सांगत रहाते किं, जसा देवांचा इंद्र तसा आमच्यासाठी नळ राजा आहे.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा अडूसष्ठावा भाग संपला.

# वनपर्व भाग एकोणसत्तरावा

## (नलोपाख्यान  पर्व संपले)

वृहदस्व ऋषी पुढे सांगतात, त्याचा नगरात मोठा सोहळा चालू होतो व त्यात समाविष्ट होण्यासाठी नळ त्याच्या पत्नीला व तिच्या मतापित्यांना त्यात येण्याचे आमंत्रण धाडतो. ते त्याची दोन लेकरे असा सगळा परिवार त्या आनंदात सामील होतो.

पुढे नळ त्याच्या परिवारासह त्या राज्यात इंद्राप्रमाणे राज्य करतो, सगळी सुख त्याच्या पायाशी लोळण घेऊन येतात. नळ त्या काळातील एक महान राजा म्हणून नावारुपाला येतो. समस्त जंभू द्विपातील सर्वश्रेष्ठ राज्य म्हणून निशादांचे राज्य ख्यातनाम होते. नळ त्या काळाच्या रिवाजानुसार अनेक यज्ञ करतो, ब्राह्मणांना दानं करत असतो.

वृहदस्व ऋषी युधिष्ठीराला सांगतात, जसें नळाचे झाले तसेंच तुझेसुद्धा होईल. नळाने स्वप्रयत्नाने त्याच्या दैवाचे फांसे उलटवले त्या ऐवजी तुझ्याबाबत तुझे बंधू व तुझे गुण तुमची परिस्थिती सुधारण्यास मदत करणार आहेत. तुझी स्थिती नळापेक्षा कितीतरी चांगली आहे. तुला तुझ्या कर्मवादी कर्तृत्ववान भावंडांचा आधार आहे. अरे पंडुच्या मुलां, तू नित्य ब्राह्मणांत बसलेला असतोस, तुला कशाचीही चिंता करण्याची आवश्यकता नाही.

हा जो इतिहास मी नळाचा, दमयंतीचा, करकोटकाचा, राजर्षी ऋतुपर्णाचा व कलीचा सांगितला तो ऐकल्याने, वाचल्याने व सांगितल्याने माणसावरील अनेक आपत्ती नष्ट होतात व ते करणारे आनंदमय जीवन जगू लागतात, म्हणून मी तो इतिहास तुला ऐकवला आहे. ज्यामुळें तुझे नशिब फुलून येईल, तुझी मनोवृत्ती सुधारेल व तू पुन्हा समृद्धी प्राप्त करशिल. म्हणून अरे कुंतूपुत्रा उगाचच सतत विचार करत बसू नकोस . मोठे लोक आपत्ती काळात जास्त शक्तीमान होतात, तुझ्यासारखे खचून जात नाहीत. मला जाणीव आहे तुला कशाची भिती वाटते म्हणूनच मी कृष्णद्वैपायनांच्या सांगण्यावरून तुला भेटण्यास आलो आहे. तुझी भिती आहे किं, पुन्हा तुला कौरव द्युताचे निमंत्रण देतील परंतु, ज्या अर्थी तुझ्याकडे हरण्यासाठी कांहीं नाहीं ते कौरव तुला पुन्हा तसले आमंत्रण देणार नाहीत हे समजून रहा. तरी तुझी भिती काढून टाकण्यासाठी मी द्युतविद्या तुला संपूर्ण शिकवण्यासाठी आलो आहे. ती जशी ऋतुपर्णाने नळाला शिकवली तशी मी तुला शिकवायला आलो आहे.

ते वृहदस्वाचे ऐकल्यावर युधिष्ठीर खुषीत होऊन त्यांना विनंती करतो किं, त्याला द्युतविद्या त्यांच्याकडून शिकावयाची आहे. त्यानंतर वृहदस्व ऋषी पंडुच्या मोठ्या मुलांस द्युतविद्येचे संस्कार देतात. त्यमुळें आता तो पांडव द्युताचे कोणतेही आव्हान घेण्यास लायक होतो. ते त्याला शिकवल्यावर तो ऋषी हयशिर्ष नांवाच्या तीर्थक्षेत्री स्नान करण्यासाठी निघून जातो. त्या समाधानात असतांना त्याला ठिकठिकणच्या तीर्थक्षेत्रांतून येणारे ब्राह्मणा अर्जुनाच्या घोर तपस्येची वार्ता देत असतात. युधिष्ठीराला समजते किं, त्याचा भाऊ फार मोठे तप करत बसला आहे. त्याच्या त्या तपश्चरणाच्या वार्तां आल्यामुळें इतर पांडव चिंतेत पडतात. त्यांना त्यांच्या भावाची फार काळजी वाटू लागते. द्रौपदीसुद्धा विशेष प्रकारे व्यथित होते. त्याकरता तो पांडव त्याच्या भोवती नेहमी असणार्या विविध शाखांचा अभ्यास केलेल्या ब्राह्मणांना त्यांचा विचार काय आहे ते समजून घेण्यासाठी बोलावून घेतो.

अशारितीने वनपर्वातील नलोपाख्यान पर्वाचा एकोणसत्तरावा भाग संपला.

**– महाभारत व नपर्व भाग दुसरा समाप्त –**

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चानें शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद